मुसलमानांचा धर्म पराभव पावून ख्रिस्तीधर्म वाढेल असा हिल्या अर्धांत आहे. उत्तरार्धांत असें आहे कीं, महंमद ज्या घोड्यावर बसत त्याचें नांव बुराक होतें, आणि येशू ख्रि त्यावर बसत असे; याजकरितां साहेबांचा हेतु कायम दर्शविलें आहे कीं, जरकरितां गाढव घोड्यापेक्षां वरिष्ठ तसेंही घडेल!! हें अर्ध पाहून लॉर्ड साहेबांनीं मौलवीस क्षीस दिलें!

१६५. इंग्रजी चितारी.

मिस्तर जेम्स वेल्स या नांवाचा एक तसविरी काढणारा हून हिंदुस्थानांत इ० स० १७९१ सालीं आला होता. त्यां बाजीराव, नाना फडणवीस व महादजी शिंदे या तिघांच्या काढून मुंबईच्या कौन्सिल बंगल्यांत ठेविल्या होत्या. पुढें तो कान्हेरीच्या लेण्यांच्या तसविरी काढण्याचे कामांत असतां मृत्यु पावला. याची धोरली मुलगी पुण्याचे रेसिदेंट सर चा

होती व तिचा मुलगा सर अलेक्झांडर म्यालेट. हे अ- म्यालेट मुंबई सरकारचे चीफ् सेक्रेटरी होते.

१६६. मुनसफाचा जवाब.

लियम साहेब व एक मुनसफ यांचें बोलणें चालतां साहेब म्हणूं लागले कीं, 'सरकार काळे लोकांस दोन दोनशें रुपये पगार देतें परंतु तेवढ्या पगारास ते लायक नाहींत.' म्हणाले, 'साहेब, ही गोष्ट सर्व काळाचे हातीं आहे. लोक यांजकडे आपणास जागा देण्याचें असतें तर नेटिव साहेब वाटतें कीं, आपणास सालाचे दोनशें तीनशेंही रुपये कारण कीं, सालास दोनशें रुपये देऊन एकादा गुमास्ता हिशेबी काम, व्यापार वगैरे सर्व संभाळून राखतो व तर आपले हातून कोणतें काम व्यावें? आपणांस नाहीं, लिहितां येत नाहीं, व कोणतीही माहितगारी सरकार आपणांस दोन हजार रुपये महिना पगार देत चमत्कार नव्हे कां?' हें ऐकून साहेब उगीच बसले!!

१६७. फॉर्ब्स् साहेब.

फॉर्ब्स् हे गुजरायेत अहमदाबादेस जज होते, तेव्हां अज्ञान पाहून १८४८ सालीं एक छापखाना काढला. एक वर्तमानपत्र काढीत. हेंच वर्तमानपत्र प्रथमतः समाचाराचें. पुढें त्यांनीं उद्योग करून जुनीं पुस्तकें संग्रह तयार करावीं, भाषा सुधारावी, आणि लोकांस ज्ञान 'नेटिव्ह लिटरेचर सोसायटी' स्थापन करून मुंबईत 'ट्रान्सले- स्थापिली. शिवाय, त्यांनीं दलपतराम शाह्याभाई या संग्रह करून त्याजकडून बहुत कविता करविल्या व ब- लिहविले. नंतर त्यांनीं अनेक शोध करून इंग्रजींत 'रास- एक गुजराथचा इतिहास लिहिला. त्याचा तर्जुमा गुज- झाला आहे. हे साहेब लोकहिताचे कामीं फारच तत्पर होते. लोकांकडून त्यांनीं पुष्कळ हकीकती मिळविल्या करून 'भूतनिबंध' वगैरे ग्रंथ केले. याचप्रमाणें सद-

रील सोसायटीकरितां पुष्कळ द्रव्य जमा करून ती क
नये असें केलें. व त्याप्रमाणें तियें कामही फार चांगलें चा
सारांश, असे साहेब लोक विरळा या देशांत येतात. याचप्र
कॉपेंटरसारख्या मडमा विलायतेंतही क्वचित् होतात. हीं मा
थोर समजावयाचीं व ह्मणून नेटिव लोकांस त्यांच्याविषयीं
द्धिही फार आहे.

१६८. माल्कम् साहेब व जगन्नाथ शंकरशेट यांचें संभाषण.

सन १८२८ सालीं गव्हरनर माल्कम् साहेब यांस जगन्
शंकरशेट यांनीं मेजवानी केली; तिचा थाट फार मोठा केला
परंतु शंकरशेट यांनीं इंग्रजांचे थोरपणानें टिपूचे लढाईत वगै
करून जें बहुत द्रव्य मिळविलें होतें, तें जगन्नाथ शंकरशेट
आलें होतें. तेव्हां, माल्कम् साहेब यांनीं विचारलें कीं, '
द्रव्य तुह्मीं कधीं मिळविलें ?' त्यावरून त्यांनीं त्यांस उत्तर
'हें द्रव्य आमच्या वडिलांनीं मिळविलें.' तेव्हां साहेब ह्म
'तुह्मीं त्यांपैकी कांहीं तरी मिळविलें आहे काय?' नाना ह्मणाले
हें ऐकून साहेब ह्मणाले कीं, 'असें मला माहीत असतें तर
जवानीस आलोंच नसतों. कारण, मी तर, तुह्मीं का
केलें आहे तें पाहावयास इच्छितों. आणि तुह्मी तर, कां
ह्मणतां—!' याप्रमाणें त्यांचीं प्रश्नोत्तरें झालीं.

१६९. आपला न्याय आणि कारभार.

आपला न्याय व आपला कारभार गैरमाहीत लोकांचे
सणें फार वाईट आहे असें इंग्रज लोकांत समजतात व
त्यांनी आपले स्वज्ञातीचे न्याय परकीय लोकांचे हातीं ठेविले
आतां नेटिव लोकांचे न्याय परकीयांचे हातीं आहेत या
केवळ त्यांची नालायकीच आहे. स्वदेशांतील लोक अति
अवस्थेंत आले, आणि त्यांमध्यें वाईट धर्मशास्त्रांची प्रवृत्ति
तेव्हां सर्वांस परकीयांवर प्रीति ठेवणें भाग पडलें. कारण,
पल्या देशाचे हितकर्ते व ह्मणून राजवर्ग यांवर ठेवणें हीच

लोकांस वाटणें हें स्वाभाविक आहे. असेंही मन्वंतर येतें,
यांतील प्रस्तुत सर्व हिंदुस्थानाचीं झाली आहे!

१७०. आपले राजे.

आमचे जुने राजे होते व आहेत. परंतु त्यांस बुद्धि नाहीं.
या देशाची ऐश्वर्यवृद्धि, बलवृद्धि, आरोग्यवृद्धि, यशवृद्धि, वि-
द्यावृद्धि यांजवर अगदीं नजर दिली नाहीं. पहा! गा-
यकवाडचे शेंबर वगैरे राज्य करितात, माळव्यांत होळकर क-
रीत असलेले शेंदे यांनीं केलें, लखनौस वजीरांनीं केलें व
हे मिळून करितात. परंतु इंग्रज सरकारचे अमलांत पन्नास
वर्षांनंतर, विद्यावृद्धि व बंदोबस्त झाला तो यापूर्वी ३००
वर्षांतही एकदांही झाला नाही! यावरूनच त्यांच्या
ची कल्पना करावी!

१७१. प्रीतीस पात्र होणें.

हे पात्र होण्यास मुख्य लागतात. ह्मणून देशावर प्रीति हो-
ण्यासारीख लोकांमध्यें कायदे, कानू, लोकांची रीतभात,
वर्तन, व्यवहार, कौशल्य आणि लोकांस स्वातंत्र्य व व्यवहारिक
ही सर्व असतीं तर या देशाची महती वाढून त्याजवर भक्ति
असती.

१७२. इंग्लंडचे प्रधान.

इ० सं० १८०१ पासून परवांच्या पार्लमेंट सभेच्या
पर्यंत हुए लिहिल्याप्रमाणें प्रधान नेमले गेले:—

	तारीख.		महिने.	सन.
—	...	७	मार्च	१८०१.
—	...	१२	मे	१८०४.
—	...	८	जानेवारी	१८०६.
...		१३	मार्च	१८०७.
—	...	२३	जून	१८१०.
	...	८	जून	१८१२.

जी. कर्गानिग्	११	एप्रिल ५	१८२०
व्हायकौंट् गॉडरिच्	१०	आगस्ट ४	१८२३
ड्यूक ऑफ् वेलिंग्टन्	११	जानेवारी	१८२८
अर्ल ग्रे	१२	नोवेंबर ११	१८३०
व्हायकौंट् मेलबोर्न्	१४	जुलै ७	१८३४
सर आर्. पील्	१५	डिसेंबर १२	१८३४
व्हायकौंट् मेलबोर्न्	१८	एप्रिल	१८३५
सर आर्. पील्	३१	आगष्ट	१८४१
लॉर्ड जे. रसेल्	६	जुलै	१८४६
अर्ल ऑफ् डार्बी	२७	फेब्रुवारी २	१८५२
अर्ल ऑफ् अबरडीन् ...	२८	डिसेंबर	१८५२
व्हायकौंट् पामर्स्टन् ...	२६	फेब्रुवारी	१८५५
अर्ल ऑफ् डार्बी... ...	२६	फेब्रुवारी	१८५८
व्हायकौंट् पामर्स्टन् ...	१८	जून	१८५९
अर्ल रसेल्	२	आक्टोबर १०	१८६५
अर्ल ऑफ् डार्बी ...	८	जुलै	१८६६
बी. डिझ्राइली	२७	फेब्रुवारी	१८६८
डब्ल्यू. ई. ग्ल्याड्स्टन्	९	डिसेंबर	१८६८
मार्क्विस् बी० डिझ्राइली (अर्ल बीकन्सफील्ड)	२१	फेब्रुवारी	१८७४
डब्ल्यू. ई. ग्ल्याड्स्टन्... ...		एप्रिल	१८८०
मार्क्विस् सालिसबरी	१८	जून	१८८५

शिंदेशाहींतील गोष्टी.

१७३. शिंदेसरकारचा वंश.

इसवी सन १७०० च्या आरंभीं महाराष्ट्र देशांत मोठी गडबड चालली होती. अवरंगजेब बादशाह याची स्वारी मोठी फौज बराबर घेऊन दक्षिणेंत फिरत होती, मराठे लोक मोठा शूरपणा दाखवून आपलें स्वतंत्र राज्य उभारण्याच्या बेतांत गुंतले होते. अशा समयीं शिपाई

लोकांची फार गरज याकरितां गांवोगांवचे हुशार मराठे व पाटील लोकांतून प्रत्येक आपल्याजवळ दोन चार हत्यारें व घोडी बाळगून होता. तेव्हां जेव्हां प्रसंग येई तेव्हां तेव्हां ते शिपायाच्या नात्यानें आपल्या अधिकाऱ्याच्या बराबर जाऊन चाकरी करीत. आणि काम संपलें म्हणजे आपले गांवीं परत येऊन राहत. या समयीं अर्धे शिपाई व अर्धे शेतकरी असे दोन भाग होऊन शिपायांस शिलेदार असें म्हणत.

सातान्यापासून पूर्वेस ६ कोसांवर कोरेगांव तालुक्यांत कण्हेर-वेढ म्हणून एक गांव आहे. त्या गांवचे पाटील राणोजी शिंदे हे शिलेदारीच्या वाण्यानें राहत होते. ते शाहू महाराज यांचे कारकिर्दीत थोरले बाजीराव पेशवे यांचे बराबर उत्तर हिंदुस्थान व माळवा यांत स्वाऱ्या करण्यास जात असत. कोणी म्हणतात कीं, हे त्यांचे बराबर कांहीं दिवस खिसमतगारीचे कामावर होते. पुढें सन १७३० चे सुमारास राणोजी शिंदे हे मोठे फौजबंद सरदार झाले. आणि बाजीराव साहेब यांचे फौजेंत मल्हारराव होळकर, पिलाजी जाधव वगैरे जे नामांकित सरदार होते त्यांमध्ये यांची गणना झाली. तेव्हां निजाम उलमुलख हा दिल्लीच्या बादशाहाच्या पक्षानें मोठ्या फौजेनिशीं बाजीराव साहेबाशीं भांडत असे, त्याचा पराभव करून मराठे सरदारांनी माळवा प्रांत आपले हस्तगत करून घेतला, त्या मसलतींत हे शिंदे मुख्य होते. यानंतर सन १७४३ सालीं निजाम उलमुलख आणि बाजीराव पेशवे यांचा तह झाला. त्यांत कराबद्दल पेशवे यांजकडून तीन जामीन घेतले. त्यांतील शिंदे हे एक होते. या गोष्टीवरून यांचा प्राणिकपणा व वजन चांगलें होतें असें दिसतें. हे सन १७५० सालीं मरण पावले.

या सरदारास जयाजी, जनकोजी आणि दत्ताजी असे तीन औरस पुत्र व महादजी आणि तुकोजी असे दोन दासीपुत्र होते. यांपैकीं तुकोजी हे अपघातानें मरण पावले.

जयाजी हे वडील पुत्र सबब त्यांजकडे हिंदुस्थानांतील सरमजाम व कारभार चालावा असें पेशव्यांनीं ठरविलें. सन १७५५ सालीं राघोबादादा पेशवे यांनीं मुसलमानांपासून अहमदाबाद घेतली. या प्रसंगी

जयाजी हे आपले फौजेसुद्धां त्यांबराबर होते. पुढें जोधपूरचा राजा विजीसिंग याजबराबर लढाई चालली असतां त्यानें आपले हेरांस जयाजी असतां मारेकऱ्याकडून त्यास ठार मारविलें. ह्याचा सूड घेण्याकरितां महादजी शिंदे यांनीं त्याचें पारिपत्य करून त्याचा मुलूख वगैरे मुलूख घेतला.

जयाजीचा मुलगा जनकोजी व त्याचे चुलते जनकोजी व दशाजी व महादजी हे सर्व पानपतचे स्वारींत होते. पैकीं दोघे चुलते ठार झाले व जनकोजी हा अबदालीचे हातीं सांपडल्यावरून तोही प्राणास मुकला. महादजी यांचा तोफेच्या गोळ्यानें पाय उडाला. आणि लंगडे होऊन ते मात्र दक्षिणेंत परत आले.

जे तिघे कैलासवासी झाले त्यांच्या बायकांकडे चोळीलुगड्याबद्दल पेशव्यांनीं चौदा लक्षांचा मुलूख चालविला. याशिवाय पन्नास लक्षांचा सरंजामही त्यांकडे ठेविला. परंतु गादी चालविण्यास कोणी पाहिजे याकरितां औरस वंशापैकीं मानाजी फांकडे यांस शाहू दत्तक देऊन त्याचे नांवानें दौलत चालावी असा बेत चालला होता. इतक्यांत पुण्यास नारायणराव पेशवे मारले गेले. त्या प्रसंगीं नाना व बारभाई यांचे मसलतीस महादजी शिंदे अनुकूल झाले. सबब मागील सर्व बेत राहून यांसच गादीचे मालक केलें.

हा पुरुष मोठा शहाणा, मसलती व बुद्धिमान् होता. पुढें इंग्रजांशी व याच्याशीं वैर पडून बडगांवावर लढाई झाली. तींत कवायती शिकविलेल्या पलटणींचें मोठें शौर्य दिसून आलें. त्यावरून त्यांनीं फ्रेंच लोकांस चाकरीस ठेऊन त्यांजकडून कवायती पलटणें व तोफखाना तयार करविला. आणि इंग्लिशांचा मोड करून त्यांनीं भडोच, अंतर्वेद वगैरे मुलूख घेतला होता तो त्यांपासून परत घेतला. त्या कवायती फौजेच्या योगानें महादजी शिंदे यांचा चोहोंकडे डंका गाजून ते अजिंक्य होऊन गेले. त्यांनीं दिल्ली, आग्रा, व रजपूतस्थान एथील राजे काबीज केलीं. व बादशाहाकडून दिवाणगिरी घेतली. पुण्याचे कारभारांत हे मुख्य झाले. व हैदरअल्ली देखील यांस भिऊं लागला. सन १७८३ या सालीं साल्ब्याचा तहनामा झाला. त्यांत महादजी शिंदे, इंग्रज व

पेशवे या उभयतांकडून तहाप्रमाणें वर्तणूक होण्याविषयीं जामीन झाले म्हणून लिहिलें आहे. याजवरून यांची वजनदारी किती होती हें सर्वांचे लक्षांत येईल.

महादजी शिंदे यांनीं पूर्वापेक्षां हिंदुस्थानांत चांगला अंमल बसविला. आणि जेव्हां हे सन १७९४ या सालीं पुण्यास आले तेव्हां त्यांचे बरोबर ५०० तोफा, कवायत शिकलेलीं ७५ पलटणें व ५०००० स्वार एवढी फौज होती. तेच वेळीं हे वानवडी येथें मरण पावले. हा प्रसिद्ध पुरुषाचें सर्व आयुष्य लढाईत व फौज तयार करण्याचे कामांत गेलें. याची मसलत मोठी खोल असे.

यांचे मरणानंतर याचे पुतणे दौलतराव हे बारा वर्षांचे असतां, यांस दत्तक देऊन गादीवर बसविलें. आणि सखाराम घाडगे सर्जेराव यांची मुलगी बायजाबाई ही फार लावण्यवती म्हणून दौलतराव यांस दिली. त्या योगानें जांवई लहान म्हणून हे शिंद्याचे दिवाण झाले. यांचा स्वभाव फार क्रूर व निर्दय असे यामुळें अर्थातच यांच्या कारकिर्दींत जे अन्याय व क्रूर कर्में घडून आलीं तीं उघडकीस आणणें यापेक्षां विसरून जावें हें फार बरें. पुढें शिंदे व होळकर यांच्याशीं अपसांत कलह लागून पुण्यावर मोठी लढाई झाली. तींत शिंदे यांचा पराभव होऊन पुणे होळकरांनीं घेतलें. तेव्हां बाजीराव साहेब पळून गेले. मग सन १८०३ या सालीं इंग्रजांनीं त्यांस फौज देऊन पुण्यास परत आणिलें. अशा प्रसंगी शिंदे यांस दक्षिणेंतून काढून देणें जरूर पडलें. सबब वसली साहेब यांनीं त्यांचीं नगर वगैरे ठाणीं घेत घेत त्यांस अजंटा घाटांत गांठिलें. तेव्हां दौलतराव यांजबरोबर कवाईत शिकलेलीं ५० पलटणें, ५०००० स्वार, व ५०० तोफा, शिवाय भोंसले यांची फौज एवढा सरंजाम होता. वसली साहेब यांची १०००० फौज, बापू गोखले यांजबरोबर पेशवे यांची फौज, आणि निजाम सरकारची फौज इतक्यानिशीं वसली साहेब यांणीं शिंदे यांचा मोड केला. याच वेळीं इंग्लिशांची व शिंद्यांची हिंदुस्थानांत लढाई चाललीच होती.

पुढें अंजनगांवीं जो तह झाला त्यांत इंग्रजांनीं निम्मे मुलूख घेतला.

त्यांत रजपूतस्थान येथील राजांच्या खंडण्या भडोच व यमुना आणि गंगा या नद्यांमधील काश्मीरपर्यंत मुलूख, खानदेश, व दक्षिणेतील गांवें हे सर्व शिंद्यांकडून गेलें. तोंपैकीं कांहीं पेशव्यांस व कांहीं निजामास देऊन बाकी सर्व इंग्रजांनीं घेतलें. तहांत असें ठरलें होतें की कारण पडेल तेव्हां शिंद्यांनीं १०००० फौज इंग्रजांस द्यावी. व इंग्रजांनीं ६ पलटणें द्यावीं; परंतु सर्जेराव यांनीं त्याप्रमाणें वर्तणूक न करितां रेसिडन्ट साहेबांच्या बंगल्यावर हल्ला केला. यास्तव सन १८०५ त अंजनगांवचे तहनाम्याचे पुरवणींत ठरल्याप्रमाणें जोतपूर व अंतर्वेद वगैरे पूर्वी घेतलेला मुलूख कायम करून चंबल नदीची हद्द ठरविली. तिजपलीकडे इंग्रजांचा अंमल, त्यांत शिंदेसरकारास जाण्याचे कारण नाहीं. फक्त महादजी यांची कन्या बाळाबाई व बायजाबाई यांची मुलगी चिमाबाई यांजकडे मिळून तीन लाखांचा मुलूख ठेविला. याप्रमाणें बंदोबस्त झाला; तेव्हां वसूल कमी होऊन एक कोट चाळीस लक्षांचा मुलूख राहिला. परंतु दोन कोट रुपयांचा खर्च होता. तो कमी केला नाहीं. फौजेस महाल तोडून दिले. आणि मक्तेदारानें माल्लती देत गेल्यामुळें मुलखांत जुलूम होऊन रयत लुटली गेली; व कित्येक गांव ओसाड पडले; दौलतीस कर्ज झालें. याप्रमाणें दौलतीच्या कारकीर्दीत अवस्था झाली. हे सन १८२७ तारीख २१ मार्च रोजीं मरण पावले. तेव्हां दत्तक घेण्याकरितां पांच मुलगे आणिले होते. त्यांपैकीं बायजाबाईनीं मुकुटराव ह्मणून एक १२ वर्षांचा मुलगा होता. त्यास जनकोजी या नांवानें दत्तक घेतलें. त्यांचें दाभाड्यांचे मुलीबरोबर लग्न झालें.

मुलगा लहान होता तोंपर्यंत बाईकडेसच कारभार होता. पुढें तो मोठा झाल्यावर बाईचें व त्याचें वैमनस्य पडून इंग्रज सरकारांत फिर्याद गेली. तेव्हां बाईस ६ लक्षांची नेमणूक होऊन ती स्वतंत्र राहूं लागली. नंतर जनकोजी कारभार पाहूं लागले. या वेळीं शिंद्यांची फौज स्वार १००००, पायदळ १५०००, तोफा २५० इतकी होती. जनकोजी हें सन १८४२ चे सालीं वारले. नंतर त्यांचे चुलते जयाजीराव यांस दत्तक घेतलें. सन १८४३ सालीं लॉर्ड अलीम्बरो

ग्वाल्हेरीस येत असतां त्यांचे लष्करावर विघडलेले फौजेनें हल्ला केला. तेव्हां महाराजपूर येथें लढाई होऊन नवा तहनामा झाला. त्याजवरून जिनसी कारखाना व फरासिसांची कवायती फौज दूर केली. आणि इंग्रज सरकारचीं ६ पलटणें कायम केलीं. शिवाय मानकरी मिळून १०००० फौज राखिली. कांहीं मुलूख इंग्रज सरकारास दिला.

पुढें सन १८५७ सालीं इंग्रजी फौजेंत दंगा झाला; त्या प्रसंगीं ग्वाल्हेर गेली होती; पण सर ह्यू रोज् यांनीं जयाजीराव यांची पुनः गादीवर स्थापना केली. हे सन १८८६ च्या जून महिन्याच्या २० व्या तारिखेस वारले. त्यांचे गादीवर त्याचे पुत्र माधवराव शिंदे हे हल्ली आहेत. औरस पुत्र नसला तरी दत्तक देऊन राज्य निरंतर चालावें असा ठराव लॉर्ड क्यानिंग् यांनीं केला, याजकरितां राज्यांत सुधारणा करून रयतेचें कल्याण करावें असें हल्लीचे अधिकारी करतील असें आह्मी इच्छितों. सर्व देशाची पैमाषी करून धारे ठरवावे; वारंवार कमजास्त वसूल देण्याचा अक्तयार मामलेदारांस देऊं नये; इन्साफाचा बंदोबस्त चांगला ठेवावा; राज्यांत अधिकाराची व्यवस्था चांगली करावी; विद्या वाढविण्याकरितां गांवोगांवीं मोठमोठ्या शाळा घालाव्या; राज्यकारभार चांगला चालवण्याकरितां कौंसल नेमून कायदे ठरवावे; चांगल्या विद्वान् व हुशार मनुष्यांचा संग्रह करावा; ह्मणजे वर सांगितलेले सर्व प्रकार साहजिक घडून येतील. आपले राज्यांत हजारों मनुष्यें आहेत त्यांचे कल्याणाकडे दृष्टि असावी. हा राजाचा मुख्य धर्म होय, आह्मी लिहिलेल्या गोष्टीकडे आमचे राजे लोक व जहागिरदार लक्ष देतील असें आह्मी इच्छितों.

१७४. मानाजी फांकडे.

मानाजी फांकडे ह्मणून शिंद्याचे वंशांतील एक मोठा शूर सरदार, त्याचे अंगावर ५० जखमा होत्या, त्यास राणोजी शिंदे यांस दत्तक देण्याचा दादासाहेबांचा आग्रह होता; परंतु नारायणराव पडल्यावर महादजी शिंदे नानास अनुकूल झाले त्यावरून त्यास मुकर केलें.

१७५. महादजी शिंदे यांची अक्कल.

तळेगांवची लढाई झाली त्यांत महादजी शिंदे होते. ते पुण्यास

आल्यावर त्यांनीं नानास सांगितलें कीं, 'या लढाईत इंग्रजी पांच हजार मनुष्यें व आपली दीड लाख फौज असतां ला इंग्रजी फौजेनें पंधरा दिवस आपल्यास दाद दिल्ही नाहीं. जेव्हां तिची पोटगी सरली तेव्हां ती निरुपायानें थकली. तर हा कवायतीचा पराक्रम आहे. याकरितां मी हिंदुस्थानांत जाऊन फरांशिस (फ्रेंच) लोकांस आणितों व त्यांचीं पलटणें ठेवितों. इंग्रजास बोलवावयाचें नाहीं; कारण ते राघोबा दादाचे पक्षांत आहेत.' याप्रमाणें बेत ठरल्यावर ते हिंदुस्थानांत गेले व जान बत्तीस आणि पेरु वगैरेस आणून ५० कवायती पलटणें उभीं केलीं आणि इतके पराक्रमी झाले कीं, त्यांनीं आठ कोटीचें राज्य व खंडण्या मिळविल्या. जेथें पलटणें जात तेथें त्यांचि फत्तेच होई. त्यामुळें दिल्ली, आग्रा, रजपुताना वगैरे मुलूखही काबीज करण्यास फारशी पंचाईत पडली नाहीं.

१७६. महादजी शिंदे यांची नानाबरोबर मसलत.

महादजी शिंदे यांची नजर इंग्रजांवर फार होती. ते नाना फडनविसाशीं मसलत घाटींत होते कीं, 'हिंदुस्थानांत आपणास मुख्य शत्रु आतां इंग्रज आहेत. दुसरा कोणी अटकेपर्यंत नाहीं. याकरितां इंग्रजांचे तीन ठिकाणीं असलेले ठाण्यांपैकीं कर्नाटकाचे बंदोबस्ताचें काम टिपू सुलतानास सांगावें, तुम्ही मुंबई सांभाळावी व मी आणि सेनासाहेब नागपूरकर भोसले मिळून बंगाला घेतों.' पण ही इंग्रजांस काढण्याची मसलत, शिंदे जबरदस्त होतील या भीतीनें नानास पसंत न पडून त्यानें टिपूवर स्वारी करण्याकरितां इंग्रजांस मदत देण्याचें कबूल केलें व इंग्रजांचा स्नेह संपादन केला. पुढें शिंदे मेल्यावर सर्व घोटाळा झाला.

१७७. सदाशिव नाईक वानवळे.

सदाशिव नाईक वानवळे यांचे महादजी शिंदे यांजवर पन्नास लक्ष रुपये कर्ज येणें होतें. म्हणून त्यांनीं पैठणास शिंदे आले असतां त्यांचा तगादा केला; तेव्हां पाटीलबोवा बोलले कीं, 'तुमच्यानें धर्म तर होत नाहीं, मग रुपयांचा तगादा करून रुपये वसूल करून घेऊन काय करणार?' तेव्हां नाईक बोलले कीं, 'जितके रुपये घ्याल तितका मी

धर्म करतों!' त्याजवरून शिंदे यांणीं एकदम वीस लक्ष रुपये पाठविले आणि नाईक हे बोलल्याप्रमाणें करितात किंवा नाहीं तें पहावें म्हणून त्यांणीं तेथेंच मुक्काम केला, दुसरें दिवशीं नाईकांनीं यज्ञमंडप उभारला व कुंडें घालून विष्णुयागास आरंभ केला. आणि पंधरा दिवस होम करून सर्व रुपये ब्राह्मणांस वांटून दिले. त्या यागाची ख्याति पैठणांतीं अद्यापि आहे. या सदाशिव नाईकांचे पुत्र रंगनाथ नाईक, यांजवर पुण्यास हुकूमनामे होऊन जप्ती झाली व त्यामुळें त्यांची सर्व मिळकत नाहींशी झाली. ही जप्ती पुण्यांत सन १८३६ सालीं येऊन साडेसात लक्ष असतां झाली ती प्रसिद्ध आहे. यावरून कालचक्र कांहीं विलक्षण आहे!

१७८. शिंदे.

महादजी शिंदे १७९४ सालीं वानवडीस मेले. दौलतराव शिंदे उर्फ हे सन १८२७ च्या मार्च महिन्यांत मेले. व जनकोजी शिंदे ता० ७ फेब्रुवारी सन १८४३ रोजीं मेले. तेव्हां त्यांची विधवा ताराबाई इणें बाबाजी शिंदे यांचा पुत्र जयाजीराव शिंदे हा ८ वर्षांचा असतां दत्तक घेतला. जयाजीराव यांचे कारकीर्दीत रियासतींत (शिंदेत) फिसाद झाली त्याजवरून त्यांचीं पलटणें वगैरे सर्व कमी करून हलीं आहे तितकी म्हणजे दहा हजार फौज व तीस तोफा ठेवण्या म्हणून ठराव झाला. पूर्वी शिंद्यांचीं ५२ पलटणें होतीं असें म्हणतात!

१७९. यशवंतराव घोरपडे.

यशवंतराव घोरपडे हे दौलतराव शिंदे यांशीं वसली साहेबांनीं तह केला त्या प्रकरणांत मध्यस्थ होते म्हणून इंग्रजांनीं त्यांस हजार रुपये नेमून देऊन पुण्यास ठेविलें होतें. त्यांचे पुत्रांस जहागीर होती, व त्यांच्या नाटकशाळेचे पुत्र दाजीबा, आणि पिराजी घोरपडे होते; त्यांस रिसाल्यावर ठेविलें होतें. त्यांस पांचशें रुपये पगार असे. शिवाय मालकम् साहेबांनीं त्यांस शिवापूर इनाम दिलें होतें.

१८०. फत्तेसिंग माने व एक शिलेदार.

फत्तेसिंग माने यांनीं शिंद्याचे बायांचें बंड झाले त्यावेळेस बंड उभें

केलें होतें. तो एका शिलेदाराच्या घरीं गेला आणि ह्मणाला की, 'तुमचा घोडा फार चांगला आहे तो आह्मास द्यावा.' तेव्हां कणेरखेडचा शिंदा होता त्यानें सांगितलें कीं, 'फत्तेसिंगबाबा, तुमच्यासारखा मागणार असला तर नाहीं कोणीं ह्मणावें? परंतु त्याची खोगीर घालून जरा खुबी तर पहा.' असें ह्मणून खोगीर घालून लगाम देऊन वरतीं बसला, आणि फत्तेसिंगास ह्मणतो, 'बुवा, राम राम आतां! सामर्थ्य असेल तर आमचा घोडा घ्यावा.' असें ह्मणून घोडा हाकला तो दहा कोस निघून गेला. तो हातीं लागला नाहीं!

होळकरशाहींतील गोष्टी.

१८१. होळकरसरकारचा वंश.

पुणें प्रांतांत निरानदीचे कांठीं मौजे होळ ह्मणून गांव आहे. त्या गांवचा धनगर मल्हारराव ह्मणून होता. त्याच गांवावरून हल्लीचे होळकर यांचें होळकर असें नांव पडलें आहे. मल्हारराव यांचा बाप मेंढ्या राखून धोंगड्या विणीत असे. हें काम यास न आवडून ते खानदेशांत कंठाजी कदम बांडे म्हणून नंदुरबारास एक सरदार होते, त्यापाशीं शिपाईगिरीचे कामावर राहिले, पुढें सेनापति दाभाडे व कदम हे सैन्यानिशीं गुजराथेंत शिरले तेव्हां मल्हारराव त्या बराबर पंचवीस घोड्यांचें पदक घेऊन होता. एके वेळीं हे तापीनदीचे तीरीं असतां थोरले बाजीराव यांची फौज माळव्यांत जात होती. त्या फौजेचा कंठाजी कदम यांचे लोकांशीं कज्जा लागला. त्या समयीं मल्हारराव हा व शाहाणे असें बाजीराव यांचे लक्षांत आल्यावरून त्यांनीं त्यास आपले जवळ ठेऊन घेतलें. परंतु आपले धन्याची बांडें ह्मणजे काळे व पांढरे पट्ट्याचें निशाण व आबदागीर ही मूळची खूण ह्मणून ते तीं तशींच आपले बराबर बाळगीत असत. ती अद्याप तशींच चालत आहे.

याप्रमाणें सन १७२४ इसवी सालीं शंभर स्वारांचे पताकासुद्धां मल्हारराव हे पेशवे यांजपाशीं राहिले. पुढें बरेच वाढतवाढत ते मोठे सरदार झाले. नंतर बाजीराव यांनीं मोगलाशीं लढाई करून सन १७३१ त माळवाप्रांत आपले हस्तगत करून घेतला. त्या लढाईत मल्हारराव

फार उपयोगी पडले. सबब त्यांस इंदुर वगैरे माळव्यापैकीं बराच भाग जमजामाकरितां ह्मणून दिल्हा व नर्मदेच्या पलीकडे पेशव्यांच्या मुलखांचा कारभार त्यांजकडे देऊन पेशवे दक्षिणेंत परत आले. पुढें स० १७३८ सालीं निजाम उल्मुल्ख याजबराबर लढाई झाली. तींत मल्हारराव विजयी होऊन चंबेलपर्यंत मोंगलाचा अंमल दूर झाला. पुढें १७३९ सालीं चिमणाजी बल्लाळ पेशवे, बाजीराव यांचे धाकटे बंधु, यांनी पोर्तुगाल लोकांकडून वसईचा किल्ला घेतला. तेथें मल्हारराव होळकर त्या हल्ल्यांत होते. पुढें नादिरशाहा दिल्लीवर आला. तेव्हां ते परत हिंदुस्थानांत गेले. व तो मराठ्यांशीं तंटा न करितां परत गेला. सन १७५१ सालीं रोहिले व बादशाहाचे वजीर यांचा कलह लागला. त्यांत वजिराचे तर्फेस मल्हारराव होते. पुढें ते चाळीस हजार फौजेनिशीं दादासाहेब यांजबराबर दिल्लीस गेले नंतर सन १७६१ सालीं सदाशिव चिमणाजी, बाजीराव साहेबांचे पुतण्ये, यांनीं अहमदशहा अबदाली काबूलचा राजा हा दिल्लीवर आला तेव्हां त्याजबराबर पानपतची लढाई केली. तींत मल्हारराव होळकर होते. परंतु त्यांची मसलत सदाशिव भाऊंनीं ऐकली नाहीं. याजमुळें तेथें मराठ्यांचा मोठाच नाश झाला. कांहीं सरदार बचावून परत आले. त्यांत विंचूरकर, जेवाहादर, व होळकर हे होते. पुढें सन १७६५ सालीं मल्हारराव वारले. त्यांपूर्वी यांनीं लष्करचें काम सतत चाळीस वर्षे केलें. त्या काळीं ज्या लढाया झाल्या त्यांत हे हजीर होते. व त्या वेळेस कोट रुपयांचा मुलूख त्यांचे ताब्यांत होता. खेरीज त्यांपाशीं सोळा कोट रुपये शिलक होती. त्यांचे चिरंजीव खंडेराव हे अगोदरच वारले होते. त्यांची स्त्री अहिल्याबाई व मुलगा मालेराव होता. मालेरावाचे नांवानें पेशव्यांनीं वस्त्रें दिलीं. परंतु तो लवकरच मेला. तेव्हां त्याची बाई, अहिल्याबाई इजकडेच राज्यकारभार आला. या बाईस एक मुलगी होती. ती जुन्नरकर रेवजी बापू पाडसे गांवडे धनगर यांस दिली होती. तिचा नवरा मेल्यामुळें ती सती गेली.

अहिल्याबाई ही केवळ न्याय आणि करुणा यांची प्रत्यक्ष मूर्तीच होती. ही बाई चाळीस वर्षे कारभार करून सन १७८५ सालीं मरण

पावली. तिचे सद्गुणांचें स्मरण जोंपर्यंत सद्गुणाचा स्तव लोकांमध्ये आहे तोंपर्यंत जाणार नाहीं. सर्व लोकांचा प्रतिपाळ तिनें आईप्रमाणें केला. व धर्मखात्याकडे बहुत पैसा खर्च केला. त्याची कीर्ति वर्णन करावयास नको. सर्व आबालवृद्धांत प्रसिद्ध आहे.

दौलतीचें काम बाई स्वतां दरबारांत बसून नियमानें करीत असे, व लष्करचें काम तिचा सरदार तुकोजी ह्मणून होता त्याजकडे दिलें होतें तो तिचा पुत्र असें लोक समजत व तिच्या आणि त्याच्या मध्यें तसाच सुहृद्भाव होता. हाही मोठा पराक्रमी पुरुष होता. सन १७८० सालीं इंग्रजांशीं व मराठ्यांशीं युद्ध चाललें होतें तेव्हां गुजराथेंत टिपूबराबर सन १७८६ त तुकोजी होळकर लढत होते. यांनीं फ्रेंचांसांची कवायत शिकवून कांहीं कवायती फौज तयार केली. परंतु ही कवायती फौज मराठ्यांनीं उभी केल्यापासून त्यांचा पूर्वीचा सांघदाय पळत लढण्याचा होता तो सुटून सुस्तपणा झाला. आणि यांचें राज्यें अशक्त झालीं असेंही कोणी ह्मणतात. हे तुकोजी सन १७९७ सालीं मरण पावले. तेव्हां यांचे औरस पुत्र काशीराव व मल्हारराव व दासीपुत्र यशवंतराव, मल्हारराव व विठोजीराव, पैकीं काशीराव वडील परंतु ते वेडसर व स्वभावानें दुष्ट असे होते तरी त्यांचा पक्ष दौलतराव शिंदे यांनीं पुणें मुक्कामीं धरला आणि दंगा करून रात्रीं मल्हारराव यांजवर हल्ला केला; त्यांत ते मरण पावले. त्यांचा लहान मुलगा खंडेराव ह्मणून होता; त्यास शिंद्यांनीं धरून कैदेंत ठेविलें. विठोजी व यशवंतराव पळून गेले होते, पैकीं विठोजी दंग्यांत सामील होता असा त्याजवर आरोप येऊन शिंदे व बाळोजी कुंजर व सर्जेराव घाटगे यांनी मिळून बाजीराव पेशवे यांचे संमतानें त्यास हत्तीच्या पायीं बांधून पुणें शहरांत बुधवारपेठेंत रस्त्यावर मारिलें. बाकी यशवंतराव राहिले त्यांनीं आपलें बुडालेलें घर ऊर्जित दशेस आणावें ह्मणून बहुत प्रयत्न केले. त्यामुळें सर्व जुनी फौज काशीरावास सोडून त्यास मिळाली. खंडेराव शिंद्यांचे कैदेंत होते. ह्मणून यशवंतराव हे मुकत्यारीनें राज्यकारभार करूं लागले. आणि त्यांनीं पुष्कळ फौज ठेऊन मुलूख लुटण्याचा सपाटा चालविला. शिंद्यांच्या मुलखांची फार खराबी झाली.

ह्मणून त्यांनीं होळकराशीं युद्ध करण्याकरितां मोठी फौज पाठविली. या दोघांची इंदुरानजीक मोठी लढाई झाली. त्या लढाईत यशवंतराव याचा पराजय झाला. यामुळें सर्जेराव यांनीं इंदुर लुटून तेथील सकळ माणसें ठार मारिलीं. इकडे यशवंतराव हे अजमीर वगैरे प्रांत लुटून खानदेशांत उतरले व तेथून पुण्यास आले. तेथें सन १८०२ सालीं यांची व शिंद्यांची लढाई झाली. त्या लढाईत यशवंतराव यांनीं मोठे पराक्रमानें जय संपादन केला. या समयीं बाजीराव साहेब हे पुणें सोडून वसईस पळून गेले. होळकरांनीं विनायक अमृत यांस पेशवाईचे गादीवर बसविलें. व पुढें शिंदे होळकर यांचा परस्पर तह होऊन खंडेराव यांस शिंद्यांनीं होळकरांचे हवालीं केलें. नंतर होळकर व इंग्रज या दोघांत वैरभाव उत्पन्न झाल्यामुळें कर्नल मॉन्सन हा फौज घेऊन माळव्यांत होळकरांच्या पाठीवर गेला. परंतु तेथें त्याचा पराभव झाला. होळकर वीस हजार फौज घेऊन कंपनी सरकारचे मुलखांत शिरला. लॉर्ड लेक यांचें सैन्य त्यांच्या पाठीवर होतें त्यानें त्यास सोडून शीक राज्यांत घालविलें, परंतु पुढें त्या दोघांचा रामघांटांत तह झाला. त्यांत परस्परांनीं परस्परांचे मुलूख परत देण्याचें ठरविलें; सन १८०६ त यशवंतराव यांनीं औरस पुत्र काशीराव व त्यांची गरोदर बायको या दोघांस मारेकरी पाठऊन ठार मारविलें. व त्याप्रमाणेंच आपला पुतण्या खंडेराव हा अकरा वर्षांचा असतां त्यास विष घालून मारविलें. नंतर यशवंतराव इंग्रजांचा मोड करण्याकरितां कवायती फौज तयार करीत होते. परंतु त्या कामात मेहनतीनें त्यांस वेड लागलें. त्यांचे कारभारी लोक यांनीं त्यांस कैदेंत ठेऊन त्यांची तुळसाबाई ह्मणून दासी होती तिचे नांवानें ते कारभार करूं लागले. या बाईनें मल्हारराव नांवाचा एक मुलगा होता. त्यास दत्तक घेतलें; परंतु सरदार आणि कारभारी यांची आपसांत फाटाफूट होऊन दंगा सुरू झाला. कोणी पाहिजे त्यानें पाहिजे तो मुलूख बळकाविला; पेंढारी माजले, चोहोंकडे बंडें उद्भवलीं आणि अहिल्याबाईचे वेळचे सर्व सुखावर पाणी पडलें. शेवटीं पठाणांनीं तुळसाबाईस क्षिप्रानदीवर नेऊन ठार मारिलें. पुढें पेशव्यांची लढाई सुरू झाली त्या वेळेस गणपतराव रांडो-

कर वगैरे होळकरांचे सरदार होते त्यांची आणि माल्कम साहेब यांचे लष्कराची महद येथें लढाई झाली. तींत होळकरांचा अगदीं मोड झाला तेव्हां अमीरखान व गफुरखान यांस कांहीं जहागीर ठेऊन व पंधरा वीस लक्षांचा मुलूख मल्हारराव यांजकडे ठेऊन बाकी सर्व मुलूख इंग्रजांनीं घेतला. मग तेथील सर्व लष्करी दंगा मोडून जिकडे तिकडे स्वस्थता झाली. याप्रमाणें अहिल्याबाई मेल्यापासून सन १८१८ पर्यंत एकसारखा दंगा चालला होता. पुढें मल्हारराव सन १८३० साली मरण पावले. तेव्हां हरजीराव यांस दत्तक दिलें आणि राज्यकारभार चालला. ते सन १८४२ त मेल्यावर तुकोजीराव होळकर यांस दत्तक देऊन राज्यकारभारास आरंभ झाला. हे सुज्ञ व शाहणे होते व यांनीं प्रवास करून अनेक देश पाहिले होते, त्यामुळें यांचे अंगीं विशेष हुशारी येऊन यांनीं राज्यकारभार चांगल्या रीतीनें चालविला होता. हे सन १८८६ च्या जून महिन्याच्या १७ व्या तारिखेस वारले. त्यांच्या गादीवर त्यांचे पुत्र शिवाजीराव हे सध्यां आहेत. या प्रमाणें या खानदानीची स्थिति आहे. आह्मीं असें इच्छितों कीं प्रस्तुतचे महाराज इंग्रजांच्या राज्यरीतीकडे विशेष लक्ष देऊन त्याप्रमाणें आपल्या राज्यांत होण्यासारखे असतील असे सुधारणुकीचे उपाय योजितील आणि आपल्या कीर्तीचा सुवास चोहोंकडे पसरेल अशी तजवीज करतील.

१८२. होळकर.

होळकर यांचा मूळपुरुष मल्हारराव, त्यांचे पुत्र खंडेराव, त्यांची विधवा स्त्री प्रसिद्ध अहिल्याबाई, त्यांचे पुत्र माळेराव, ते मेल्यावर अहिल्याबाईनें तुकोजीराव यांस दत्तक घेतलें; तुकोजीरावास काशीराव व मल्हारराव खासे हे दोन व कृष्णाबाई ह्मणून राख होती तिचे यशवंतराव व विठोजी हे दोन असे चार पुत्र होते. पैकीं विठोजी यांस पुण्यांत बाजीरावानें बुधवारच्या वाड्यापुढें हत्तीचे पायाशीं दिलें त्या अदावतीवरून पुढें यशवंतरावांनीं पुणें लुटलें. यशवंतराव यांचे पुत्र मल्हारराव, त्यांचे हरजीराव आणि त्यांचे तुकोजीराव, आणि त्यांचे शिवाजीराव; हे हल्ली इंदुरास आहेत.

१८३. मल्हारराव होळकर.

मल्हारजी होळकर हे, निरेचे कांठीं होळगांव ह्मणून आहे तेथील धनगर होते. ते कंठाजी कदम बांडे जे नंदुरबारास राहत होते, त्यांच्या शीं मेंढरें चारण्याकरितां राहिले होते. ते एके दिवशीं कुरणांत मेंढरें चारीत असतां बाजीराव बल्लाळ यांची स्वारी त्या आंगानें आली आणि यांचे कुरणांतून जाऊं लागली. तेव्हां मल्हारजी स्वारांचे आड होऊन त्यांस ह्मणाले कीं, 'मी तुह्मांस कुरणांतून जाऊं देणार नाहीं.' तेव्हां स्वार ह्मणूं लागले कीं, 'मागाहून श्रीमंत येत आहेत याकरितां तूं भांडूं नको.' तेव्हां ते ह्मणाले कीं, 'मी तुह्मांस जाऊं देणार नाहीं. मजी असेल तर मला मारा व मग जा.' तेव्हां बिनीवाले यांनीं ही गोष्ट श्रीमंत बाजीराव यांच्या कानावर घातली. त्यावरून ते पुढें येऊन त्यांनीं त्यांस विचारिलें, तरी त्यानें आपली स्वामिसेवा एकनिष्ठ राखविली. त्यावरून बाजीरावांनीं सांची मजल्यांखून फौज दुसरीकडून नेली आणि नंतर बांडे यांस पत्र लिहून मल्हारराव यांस आपणाकडे बोलाविलें आणि त्यांस शिलेदार केलें व पुढें माळवा प्रांत घेतल्यावर तेथील सुभ्याचें काम सांगितलें.

१८४. अहिल्याबाई.

थोरले मल्हारराव यांची सून अहिल्याबाई होळकरीण ही विधवा असतां तिनें सन १७६८ पासून १७९६ इसवीपर्यंत एकछत्री राज्य केलें. हिची न्यायाची व रयतेस सुख देण्याची इतकी कांहीं चमत्कारिक खुबी होती कीं, अद्याप तिच्या पदरचेच नाहीं, पण राज्यांतील भिल्ल वगैरे लोक तिचे पवाडे गात आहेत. ती स्वतः न्यासनावर बसून धर्मराजाप्रमाणें कारभार करीत असे. तिचा धर्मही मोठा असल्यामुळें हिंदुस्थानांतील कोणतेही लांबचे प्रदेशांत तिचें नांव सांपडणार नाहीं असा देशच नसेल. त्याप्रमाणेंच तिनें उच्छेद झालेल्या अनेक धर्मांच्याही स्थापना केल्या होत्या.

१८५ अहिल्याबाई होळकरीण.

मल्हारजी होळकर मेल्यावर अहिल्याबाई यांचे हातीं बहुत द्रव्य होतें, तें अजमासें १६ कोट रुपयांचें होतें. राघोबा दादासाहेब यांची

स्वारी माळव्यांत आली तेव्हां त्यांनीं बाईस सांगून पाठविलें कीं, 'आह्मास लष्कराकरतां द्रव्याची फार जरूरी आहे.' बाईनें सांगितलें कीं, 'मी सर्व द्रव्य धर्म करण्याचे हेतूनें ठेविलें आहे. तुह्मी ब्राह्मण आहांत, मीं तुळशीपत्र व उदक तुमचे हातावर घालीन. मग सर्व खजीना घ्यावा.' तें दादासाहेब यांचे मनास आलें नाहीं. तेव्हां दादासाहेब यांनीं असें सांगून पाठविलें कीं, 'ती गोष्ट आह्मास कबूल नाहीं. आमच्या ह्मणण्याप्रमाणें द्रव्य न द्याल तर लढाई होईल.' त्याचें उत्तर बाईनें असें केलें कीं, 'हें द्रव्य धर्मादायाखेरीज मला द्यावयाचें नाहीं. लढाई होण्याचा बेत मला कबूल आहे, लढाईत मी पडल्यावर आपण द्रव्य न्यावें.' याप्रमाणें उत्तर आल्यावर दुसरे दिवशीं लढाईची तयारी झाली. इकडे बाईसाहेबांनीं सर्वांस सांगितलें कीं, 'आपली कांहीं तयारी करावयाची नाहीं. फक्त सर्व कुळंबिणी व दासी यांस मात्र हत्यारें देऊन माझा घोडा तयार करून ठेवा.' इकडे सकाळीं उठून पेशव्यांची फौज तयार होऊन पुढें आली. तें बाई घोड्यावर बसून पुढें पांचशें हत्यारबंद कुळंबिणींसह समोर आली. तेव्हां दादासाहेबांचे सरदारांनीं सांगितलें कीं, 'बायकांशीं लढण्याचा क्षत्रियांचा धर्म नाहीं. कारण भीष्माचार्यांसारख्या महायोद्ध्यांनींहि असें आचरण केलें आहे. युद्धांत जेव्हां शिखंडी भीष्माचार्यांवर आला तेव्हां भीष्मांनीं लागलाच धनुष्यबाण खालीं ठेविला! ह्मणून आह्मी तुमचेवरावर ह्या स्त्रियांवर हत्यार उपसणार नाहीं.' तेव्हां दादासाहेब पुढें येऊन बाईस ह्मणाले कीं, 'तुमची फौज कोठें आहे?' तिनें सांगितलें कीं, 'मी पेशव्यांची चाकर आहें. मी बायको राज्य करीत आहें. माझी हींच फौज आणि या फौजेशीं तुह्मी लढून मी मेलें ह्मणजे तुह्मी माझें द्रव्य घ्यावें. मला जास्ती फौज आणून तुह्मांशीं बेत करणें नाहीं. माझी धर्म करण्याची इच्छा आहे, ती मी मेल्यावर व्यर्थ होईलच.' असा जबाब ऐकून राघोबास असें वाटलें कीं, आपला हा प्रयत्न व्यर्थ आहे. शेवटीं बाईचें समाधान करून व माफी मागून दादासाहेब ह्मणाले कीं, 'आपण यथेच्छ धर्म करावा, आह्मी दुसरेंकडून द्रव्य मिळवूं.' असें सांगून चालते झाले!

१८६. अहिल्याबाईचें शहाणपण.

अहिल्याबाई राज्यावर असतां एक सावकार मेला. त्याचे बायकोची त्रयोदशीचे दिवशीं अशी अर्जी आली कीं, 'माझी दौलत फार असून त्याचा वारस करण्याकरितां दत्तक घेण्याची मला परवानगी द्यावी.' तेव्हां अहिल्याबाईजवळ चार कारभारी बसले होते; त्यांनीं असें बोलणें सुरू केलें कीं, 'बाईच्या अर्जीप्रमाणें दत्तकाची परवानगी द्यावी, परंतु नजरेचा ठराव करून द्यावा. कारण, मयत सावकाराजवळ द्रव्य पुष्कळ आहे.' तें सर्व बोलणें ऐकून घेऊन बाईनें उत्तर दिलें कीं, 'दत्तकाची परवानगी द्यावी असें मला वाटतें, परंतु नजर कशाकरितां द्यावी हें माझे लक्षांत येत नाहीं. नवऱ्यानें मेहनत करून द्रव्य मिळविलें व तो मेला, तेव्हां त्याची बायको पुत्र घेण्याकरितां परवानगी मागते. याचें कारण इतकेंच कीं, शास्त्रमार्गे तिला पुत्र घेण्याचा अधिकार आहेच; परंतु आह्मी थोर व राजे, कदाचित् शास्त्र सोडून तिला आडवें लावूं कीं, तूं कोणास विचारून दत्तक घेतलास? या भयानें तिनें ही अर्जी केली. तर तिला अभय द्यावें कीं, तुह्मास शास्त्राप्रमाणें चालण्यास आमची कांहीं हरकत नाहीं, खुशाल पुत्र घेऊन दौलतीचा उपभोग द्यावा. असें सांगण्याचा आमचा धर्म आहे. आतां तिला असें सांगणेकरितां तिजजवळून हा नजररूप दंड घेतला तर तो ती देईल; परंतु, हें द्रव्य चोरीचें झालें अथवा जबरदस्तीनें संपादन केल्यासारखें झालें. याजकरितां नजर कांहीं घ्यावयाची नाहीं. तर या अर्जीचा जाब इतकाच लिहावा कीं, तुह्मी दत्तक घेणार हें ऐकून आह्मास फार संतोष झाला. पूर्वीपासून तुमचा लौकिक चालत आहे तो संभाळून चालावें, ह्मणजे सरकारास याहून अधिक संतोष होईल. व तुमचे द्रव्याचे तुह्मी मालक यास्तव आह्मी तुह्मापासून विनाकारण कांहीं एक नजर घेत नाहीं. अशा प्रकारें द्रव्य जमा करण्याची सरकारास कांहीं अडचण पडली नाहीं.' याप्रमाणें जाब लिहून दिला. याजवरून या बाईचें शहाणपण पहावें.

१८७. तुकोजी होळकर.

मल्हारराव होळकर वारले तेव्हां त्यांचा मुलगा खंडेराव, त्याची

विधवा स्त्री अहिल्याबाई यांस माळेराव म्हणून मुलगा होता. पुढें तोही मेला. तेव्हां रघुनाथराव पेशवे यांनीं अहिल्याबाईस दत्तक घेण्यास सांगितलें. त्यावेळेस गंगाधर यशवंत चंद्रचूड हे बाईचे दिवाण होते. परंतु १७६७ सालीं बाईनें असें सांगितलें कीं, 'दत्तक घेईन तर लहान मुलगा घेतला तर तो कसा निघेल याचा नियम नाहीं. याजकरितां आमचे घरांतील कोणी आप्त नसला तरी चिंता नाहीं. परंतु, दौलत संभाळील असा जाणता पुरुष पाहून तोच माझा दत्तक होईल.' असें ठरवून एक तुकोजी म्हणून शिलेदार होता त्यास वारीस केलें.

१८८. लाख्या बारगीर.

यशवंतराव पुण्यास येऊन शिंद्याचा मुकाम होता त्याजवर हल्ला करणार इतक्यांत त्यास एक बारगीर—ज्याचें नांव लाख्या बारगीर असें होतें तो—भेटला. तो खटावचा शिलेदार असून त्याचे जवळ एक घोडा होता. त्याची व याची कांहीं बोलाचाली झाल्यावर तो म्हणाला कीं, 'मला जो कोणी लाख रुपये देईल त्याचे जवळ मी राहणार असा माझा निश्चय आहे. मी या हेतूस्तव सर्व मराठे सरदारांकडे गेलों; परंतु माझ्या पगाराची आट कोणी कबूल करीत नाहीं.' तेव्हां यशवंतरावानें सांगितलें कीं, 'मला तुमच्यासारिख्या शिपायाचें फार गरज आहे, याकरितां लाख तर काय, पण मी सवा लाख रुपये पगार देईन.' असें म्हणून त्यानें त्यास ठेविला; पण पुढें आठ दिवसांनीं शिंद्याच्या फौजेवर हल्ला झाला त्यांत लाख्या बारगीर मल्हारराव होळकराबरोबर पुढेंच होता तो ठार पडला. या उभयतांची समाधि खडकीवर आहे.

१८९. यशवंतराव होळकर.

यशवंतराव होळकर हे पुणें लुटून परत जात असतां नाशकास उतरून गोदेवर स्नानास आले. स्नान करितांना ते उपाध्यायास म्हणाले कीं, 'भटजी, तुम्हास काय पाहिजे तें मागा.' तेव्हां भटजी म्हणाले, 'मला इतकेंच पाहिजे कीं, या गांवास अभय असावें! मागून फौजा येत आहेत त्या उपद्रव न करतील अशी व्यवस्था व्हावी!' तेव्हां यशवंतरावानें तें कबूल करून आपल्या लुटारू फौजांस ताकिदी दिल्या.

१९०. यशवंतराव होळकराचा शिक्का.

यशवंतराव होळकराकडून लोकांस मिळालेल्या शके १७२० साच्या सनदांवरील शिक्क्यांत असलेले श्लोक पाहिले; ते खालीं लिहिल्याप्रमाणें आहेत:—

इंद्रप्रस्थस्थितो राजा चक्रवर्ती भूमंडले ।
तत्प्रसादाङ्कृता मुद्रा लोकेऽस्मिन्वै विराजते ॥
लक्ष्मीकांतपदांभोजभ्रमरायितचेतसाम् ।
यशवंतस्य विख्याता मुद्रैषा पृथिवीतले ॥

१९१. होळकराची तसवीर.

यशवंतराव होळकर हा एका डोळ्यानें अंधळा होता. त्यानें एके दिवशीं चित्रकलेंत निपुण अशा एका चितार्‍यास बोलावून आणून त्यास सांगितलें कीं, 'माझी तसबीर काढ.' चितार्‍यानें 'तसबीर काढून आणतों' म्हणून कबूल केलें; परंतु त्याला असा विचार पडला कीं, 'याचा एक डोळा तर अंधळा आहे. तेव्हां अशी तसबीर काढली तर त्याचा अयत्न प्रसिद्ध होईल, आणि कदाचित् त्यास रागही येईल.' म्हणून त्यानें अशी योजना केली कीं, यशवंतराव घोड्यावर बसले आहेत आणि हातांत बंदुक धरून हरणाची शिकार करीत आहेत, आणि नेम धरण्याकरितां एक डोळा झांकला असून निशाण धरलें आहे. असें चित्र काढून अंधळेपणाचा अयत्न छपावून टाकिला. त्यानें जेव्हां ती तसबीर काढून आणली तेव्हां हें चातुर्य पाहून यशवंतराव यानें त्या चितार्‍यास पांच हजार रुपये बक्षीस दिले!

गायकवाडींतील गोष्टी.

१९२. गायकवाडसरकारचा वंश.

मराठ्यांनीं चौथाईची सनद घेतल्यावर ते आपला अंमल वाढविण्याविषयीं यत्न करूं लागले. मोंगलाई अंमल चोहींकडे कायम असून बडोदें, सुरत व अहमदाबाद या ठिकाणीं नवाब होते. त्यांच्या जवळ मोठी फौज होती, तथापि मराठ्यांनीं स्वारी करण्याची उमेद धरून

सेनापति खंडेराव दाभाडे हे मोठ्या फौजेनिशीं सन १७१० चे सुमारास गुजराथेंत उतरले. यांजबराबर दमाजी गाईकवाड होते ते पुढें १७२० सालीं मरण पावले. त्यांचे पुतणे पिलाजी गाईकवाड हे कंठाजी कदम बांडे यांचे दिमतीस होते. कंठाजी कदम हे सेनापतीचे सरदार होते. त्यांनीं मराठ्यांकरितां चौथाई व सर्व गुजराथ प्रांत काबीज केला. बुजायतखान व रोषनअल्ली यांजबराबर लढून खंबायत, भडोच वगैरे महाल घेतले. दाभाडे व पेशवे यांचें वांकडें पडून त्यांची डबईत्तर १७३१ सालीं लढाई झाली. तींत त्रिंबकराव दाभाडे मारले गेले, आणि पेशव्यांचा जय झाला. पुढें त्रिंबकरावांचा पुत्र यशवंतराव व त्याची मातोश्री उमाबाई यांजकडे कांहीं मुलूख राहिला. त्याचा कारभार पिलाजी गाईकवाड व कोंडाजी यांजकडे होता. पुढें दिल्लीसरकाराकडून जोधपूरचा राजा अभयसिंग यांजकडे गुजराथचा सुभा झाला. त्यानें मारेकरी घालून पिलाजीस १७३२ सालीं ठार मारिलें. तेव्हां त्याचा मुलगा दमाजी गाईकवाड यास सरदारी मिळाली. नंतर दाभाडे यांनीं कंठाजीस दूर केल्यामुळें गाईकवाड हे गुजराथेंत मुख्य झाले. पुढें त्यांनीं मोंगलाचे सरदार मोमिनखान व शेरखान बाबी यांपासून मोठ्या पराक्रमानें बडोदें घेतलें. आणि १७३३ त तींच राजधानी केली.

पुढें राघोबा दादा व दमाजी यांनीं मिळून जवामर्दखान बाबी याजपासून मोठ्या निकराच्या लढाईनें १७५५ सालीं अहमदाबाद घेतली. तेव्हांपासून गुजराथेंतील मोंगलाई अंमल अगदीं बुडाला. व हे गाईकवाड पाणपतचे लढाईत होते, तेथून मोठ्या युक्तीनें सन १७६१ सालीं परत आले.

दमाजी हे शाहूराजाचे भेटीस गेले, तेव्हां त्यांचे बराबर मोठी फौज होती. ती दूर करावी म्हणून राजानें सांगितलें. तेव्हां त्यांनी राजाचें वचन घेऊन फौज दूर केली. नंतर राजानें त्यास कैद करण्याविषयीं हुकूम केला. तेव्हां तो म्हणाला कीं, 'वचन मोडल्यामुळें ज्या हातावर वचन घेतलें त्या हातानें सलाम करणार नाहीं.' तेव्हांपासून गाईकवाडाचे वंशांत डाव्या हातानें रामराम करण्याची चाल पडली.

दमाजी हे १७६८ सालीं मरण पावले. त्यांस संताजी, फत्तेसिंग व गोविंदराव असे तीन मुलगे होते. त्यांपैकी संताजी हे भ्रमिष्ट होते; फत्तेसिंग यांनीं इंग्रजांची मदत घेतली. व गोविंदराव हे राघोबा दादाचे पक्षास मिळाले. राघोबा दादाचे मदतीस सैन्य गेलें, तेव्हां भडोच व नर्मदेच्या दक्षिणेकडचा मुलूख इंग्रजांस मिळाला. परंतु सन १७८२ सालीं सालप्याचा तहनामा झाला, तेव्हां त्यांतून कांहीं परत दिला. पुढें १७६२ सालीं गोविंदराव हे गादीवर आले. ते १८०० साली मरण पावले. त्यांस आनंदराव, फत्तेसिंग आणि सयाजी असे तीन पुत्र होते. व कांहीं दासीपुत्रही होते, आनंदराव भ्रमिष्ट असल्यामुळें फत्तेसिंग हे मुख्य कारभारी होते, त्यांचा व दासीपुत्र मानाजी यांचा कलह लागल्यामुळें इंग्रजांचीं तीन पलटणें चाकरीस देणें भाग पडलें. खेरीज अरबलोकांचा दंगा मोडण्यास इंग्रज सरकारचें कर्ज काढावें लागलें. व सावकारांचेही कर्जास इंग्रजसरकार जामीन झालें. आणि व्याजबट्टा व पलटणीचे खर्चाबद्दल निराळे मुलूख तोडून घेतलें. सारांश सर्व कारभार इंग्रिलशांचें वतीनें होऊं लागला. पुढें गंगाधर शास्त्री यांस बाजीराव यांनीं मारविलें. नंतर पेशवाई बुडून सुमारें दोन वर्षांनीं फत्तेसिंग व आनंदराव हे दोघेही मरण पावले. त्यांचे बंधु सयाजीराव हे सन १८१८ सालीं गादीवर आले. त्यावर १८२० त गव्हरनर साहेबांनीं बडोद्यास जाऊन कजाचा वगैरे निकाल करून घेतला.

सयाजीराव हे १८४९ सालीं मरण पावले. त्यांचे वडील पुत्र गणपतराव यांनीं सात वर्षे राज्य केलें. ते वारल्यावर त्यांचे बंधु खंडेराव आपासाहेब यांनीं राज्य केलें. हे सन १८७७ चा नोव्हेंबर महिन्याचे २८ वे तारिखेस वारले. नंतर त्यांचे गादीवर त्यांचे भाऊ मल्हारराव हे बसले. यांजवर त्या वेळचे बडोद्याचे रेसिडेन्ट कर्नेल फेर साहेब यांस विषप्रयोग केल्याच्या आरोपाच्या संशयावरून व राज्यांत फार अव्यवस्था असल्यावरून सन १८७५ ह्या वर्षी गादीवरून काढून मद्रासेस नेऊन ठेविलें. आणि खंडेरावांची स्त्री जमनाबाई साहेब यांस त्यांच्या कुळांतल्या एका लहानशा सयाजीराव नांवाच्या मुलास दत्तक देऊन

त्यास इंग्रजसरकारानें गादीवर बसविलें. हे महाराज हल्ली वयांत आले असून राज्यकारभार फार चांगल्या रीतीनें चालवितात. याप्रमाणें या वंशाची हकीकत आहे.

गाईकवाडसरकारचा मुलूख औरस चौरस बारा हजार कोश असून सर्व वसूल ७,०००,००० रुपये होतो. त्याचे राज्यांतील मनुष्यांची संख्या बीस लक्ष आहे. या सरकारानें आपल्या राज्याचे मामले केले आहेत आणि ते मक्त्यानें देतात. या कारणामुळें रयतेस फार उपद्रव होतो, आणि व्हावें तितकें उत्पन्नही होत नाहीं. याच प्रांताचे नजीक जे अहमदाबाद व खेडा इंग्रजी तालुके आहेत त्यांत लोक फार व पडीत जमीन नाहीं. यांचें कारण इंग्रजसरकार ज्याप्रमाणें वरचेवर पाहणी करून चौकशी ठेवितें, त्याप्रमाणें गाईकवाड सरकार ठेवीत नाहीं. यामुळें ओसाड जमीन राहून गेली आहे. इंग्रजी अमलांतील गुरें गाईकवाडी अमलांतील कुरणांत चारावयास घालतात. बडोदें हें शहर पूर्वी मुसलमानाकडे होतें. त्यांच्या कारकीर्दीत जी इमारती झाल्या त्यांची तुलना करण्यासारखी, इतकी वर्षें मराठे राज्य आहे तरी एकही इमारत नाहीं. पिंपळे, भावनगर, पोरबंदर वगैरे राज्यांतून या सरकारास खंडणीही मिळत असे.

१९३. गायकवाड.

गुजराथेंत मराठ्यांच्या प्रवेशास १६७० सालीं आरंभ झाला. याच सालीं शिवाजीनें सुरतेस वेढा देऊन खंडणी घेतली. नंतर १७०० चे सुमारास खंडोजी दाभाडे हे सेनापति झणून गुजराथ प्रांतीं जाऊं लागले. पुढें ते १७२१ सालीं मेले. त्यांचा मुलगा त्रिंबकराव याचे हाताखालीं दमाजी व पिलाजी गायकवाड हे असून त्यांस मुतालिक सेनापति झणत. पैकीं पिलाजी यास १७३१ त डाकोर येथें जोधपूरचा राजा अभयसिंग याणें मारेकरी घालून मारिलें. पिलाजी गायकवाडानें सरबुलंदखानाकडून चौथाई घेतली. पुढें पुण्याहून बाजीराव पेशवे मुख्य प्रधान येऊन त्यांनीं दाभाडे यांजपाशीं हिशेब मागितला असतां दाभाडे यांणीं उत्तर दिलें कीं, 'ब्राह्मणांस हिशेब मात्र मागतां येतो, परंतु मुलुख सर करण्यास किती खर्च लागतो हें सम-

त नाहीं.' त्याजवरून बाजीरावांनीं उत्तर दिलें कीं, 'तुह्मी इतके माजले आहांत तर उद्यां तयारी ठेवावी. झणजे ब्राह्मणांस लढाई ही देतां येते व हिशेबही घेतां येतो ह्या दोन्ही गोष्टी दृष्टीस पडतील.' त्याप्रमाणें १७३१ सालीं त्या उभयतांची डभईवर लढाई झाली. त्यांत बाजीरावांचे स्वार तीन हजार असून दाभाडे ह्यांची फौज फारच मोठी होती. तरी त्रिंबकराव पडले. तेव्हां त्यांचा मुलगा यशवंतराव दाभाडे हा असून त्याचें वय लहान होतें, झणून त्याचा कारभार पाहण्यास गायकवाडास नेमिलें. पुढें सरबुलंदखान यानें मराठ्यांशीं जो तह केला तो दिल्लीचे बादशाहानें पसंत केला नाहीं; त्याजवरून मोठे लोक मुलूख घेत चालले. नंतर मुलखाची वांटणी केली. ती अशी कीं, पेशव्यांनीं व गायकवाडांनीं निम्मे निम्मे वसूल घ्यावा. यामुळें तेव्हांपासून बहुतेक ठिकाणीं दोन मामलेदार राहूं लागले. अहमदाबादेंत दोन कचेऱ्या व दोन हवेल्या होत्या. पुढें दमाजी गायकवाड हा ताराबाईचे कारस्थानांत शिरला झणून त्यास बाळाजी बाजीराव यांनीं कैद केलें, आणि त्याजपासून खंडणी लिहून घेतली. नंतर १७५३ सालीं राघोबा, दमाजी, नारो शंकर राजेबहादर व विठ्ठल शिवदेव विंचूरकर असे येऊन त्यांनीं अहमदाबाद घेतली. पुढें पट्टण वगैरे अम्मल झाला व काठेवाडांत द्वारकेपर्यंत अम्मल बसवून खंडण्या येऊं लागल्या. बडोद्यापासून पश्चिमेस दहा कोस व दक्षिणेस नर्मदेचे थेपर्यंत शिंद्याचा अम्मल होऊन सर्व गुजराथेंत गायकवाडाचा अम्मल झाला. पुढें पानिपतची लढाई झाल्यावर दमाजीबोवा पंचत्व पावले. तेव्हां त्यांचे पुढें फत्तेसिंग राज्यावर बसले. त्यांचे कारकीर्दीतच राघोबा दादांचा दंगा झाला, व त्यास त्यांनीं मदत केली सबब नाना फडणविसांनीं तीन हजार स्वारांचा रोजमुरा व पांच लक्ष रुपये खंडणी अशी गायकवाडापासून घेण्याचा ठराव केला. इंग्रजांशीं गायकवाडाचा प्रथम तह इ० स० १७७० सालीं झाला व त्यानंतर १७८० त जनरल गाडर साहेबाचे विद्यमानें झाला. फत्तेसिंग ता० २१ डिसेंबर १७८९ सालीं मेले. त्यांचे गादीवर मानाजी गायकवाड बसले; ते ता० १० आगष्ट सन १७९३ सालीं वारले. पुढें गोविंदरा-

वांस वर्षें झालीं. त्यांचे कारकीर्दीत अहमदाबादेचे सुभे आबा शेलूकर यांनी दंगा केला व ते बाजीराव साहेब यांचा हुकूम मानीनात, सबब त्यांस कैद केलें. शेलूकर हे सातान्याजवळचे फलटूर येथील कुलकर्णी असून नाना फडणविसांचे ताब्यांत होते, व त्यांचे नांवाचा एक रस्ता पुण्यांत अद्यापि आहे. पुढें सन १८०० त, गोविंदराव गायकवाड मेले, तेव्हां त्यांचा मुलगा अन्याबा गायकवाड हा गादीवर बसला. तो अगदीं निक्षित होता. त्याचा कारभार रावजी आपाजी नांवाचे परभू दिवाण पहात होते. त्याचे कारकीर्दीत मल्हारराव व कान्होजी गायकवाड हे दंगा करून राज्याची वांटणी घेऊं असें झणूं लागले, व इकडे पुण्यांत तर बाजीरावी झाली त्यामुळें तेथें त्याचा बंदोबस्त करील असा कोणी राहिला नाहीं. सबब शेवटीं इंग्रजांची मदत घेऊन दोघांस कैद करून कान्होजीस मद्रासेस नेलें, व मल्हाररावास मुंबईस कैद करून ठेविलें. ते दोघेही तेथेंच वारले. या महत्कृत्याबद्दल गायकवाडाकडून इंग्रजांस खेडा गांव इनाम मिळाला व तेव्हांपासून बडोद्यास रेसिडेन्ट राहूं लागला. आनंदराव गायकवाड हे ता० २ आक्टोबर १८१९ रोजीं मेले. त्यांचा कारभार फत्तेसिंग बाबा करीत होते. नंतर आनंदरावांचे पुत्र सयाजीराव हे गादीवर बसले ते ता० १९ डिसेंबर १८४७ रोजीं वारले. त्यानंतर त्यांचे पुत्र गणपतराव यांनीं ता० १९ नवंबर १८५६ पर्यंत राज्य करून त्यांचे पश्चात त्यांचे भाऊ खंडेराव यांनीं बडोद्याचें राज्य केलें. खंडेराव महाराज हे चंपाषष्ठी शके १७९२ झणजे ता० २८ नवंबर १८७० रोजीं वारले. त्या वेळीं त्यांची पत्नी राणी जम्नाबाई ही गरोदर असल्यामुळें तिला पुत्र झाल्यास तो त्यांचे ठिकाणीं बसवावा असें ठरल्यावरून कांहीं दिवस वाट पाहावी असा ठराव झाला. परंतु कन्या झाली, झणून मल्हारराव त्यांस गादीवर बसविलें. त्या कन्येचें नांव अहिल्याबाई असें ठेवून 'ताराबाबा' या आवडत्या नांवानें तिचें आवहन करितात. मल्हाररावांची वर्तणूक बाईट असे चोहोंकडून लिहे झाले झणून त्यांस पदच्युत करून मद्रासेस पाठविलें व एक मुलगा राणी जम्नाबाईनीं दत्तक घेऊन त्यास सयाजीराव असें नांव देऊन त्यांचे जाग्यावर बसविलें. हे सयाजीराव हल्लीं राज्य करीत आहेत.

इंग्रज सरकारांनीं गायकवाडाकडून सती बंद केल्याबद्दल १८४० सालीं ठराव करून घेतला. कन्याविक्रयाबद्दल १८४९ सालीं करार करून घेतला; व गुलामगिरी न होऊं देण्याबद्दल १८५६ सालीं करार झाला. खंडेराव महाराज यांनीं १८५७ चे बंडांत इंग्रज सरकारास मदत केली, झणून त्या वेळेपर्यंत जो गायकवाडांपासून एक हजार स्वारांचा खर्च घेत होते तो इंग्रज सरकारांनीं माफ केला व गायकवाडांची कृतज्ञता स्मरून खंडेराव महाराजांस इंग्रज सरकारांनीं मोरचलें दिलीं व गायकवाडवंशांत दत्तक घेण्याची सनद दिली.

१९४. गायकवाड.

खंडेराव दाभाडे सेनापति हे गुजरायेंत चौथाई वसूल करण्याकरितां शिरले तेव्हां त्यांचेबरोबर दमाजी गायकगाड व कंठाजी कदम बांडे हे होते. दमाजी मेल्यावर त्यांचा पुतण्या पिलाजी हा सरदार झाला. पुढें जोधपूरच्या अभयसिंगानें त्यास डाकोर येथें मारेकरी घालून मारलें. पिलाजीचा मुलगा दमाजी हाही सरदारी करूं लागला होता परंतु त्यास बाळाजी बाजीराव यांनीं साताऱ्यास कैद केलें व पुढें खुलें केलें. दमाजीचा मुलगा गोविंदराव, त्याचा मुलगा आनंदराव व त्याचा मुलगा सयाजीराव हे १८४७ सालीं वारले. तेव्हां त्यांचे मागून त्यांचे पुत्र गणपतराव, त्यांचे मागून त्यांचे बंधु खंडेराव, आणि पुढें त्यांचे बंधु मल्हारराव बसले. शेवटीं मल्हारराव पदच्युत होऊन सयाजी महाराज हे श्री० जम्नाबाईच्या मांडीवर दत्तक होऊन राज्य चालवीत आहे. दमाजी गायकवाड यांनीं सन १७५५ सालीं अहमदाबाद घेऊन पुढें पटन व खैराळू वगैरे महाल घेतले.

१९५. गायकवाड सरकारचें निशाण बांडें कां?

सन १७२५ चे सुमारें गुजरायेंत पिलू व कंठा असे दोघे गनीम शिरले. त्यांनीं कुलिचखान वगैरेस जेर केलें असें झणतात. पिलू म्हणजे पिलाजीराव गायकवाड; डाकोरास मारिले ते. व कंठा झणजे कंठाजी कदम बांडे नंदुरबारकर. यांचे हाताखालीं मल्हारराव होळकर व पिलाजी गायकवाड होते, त्याजमुळें त्यांचीं निशाणें बांडीं आहेत.

कदम बांडें निशाण बाळगीत होते यास्तव त्यांचे सरदारांनीही बांडें निशाण घेतलें.

१९६. गायकवाडांच्या सनदेंतील शिक्का.

सन १७४६ सालच्या गायकवाडाच्या शिक्क्यांत हीं अक्षरें आहेत.

मार्तंडचरणीं तत्पर ।
पिलाजीसुत खंडेराव गायकवाड निरंतर ॥

पुढें १७९५ सालचे सनदेंत आहेत तीं:—

श्रीराजा शाहू छत्रपति अखिलप्रौढप्रतापपुरंदर ।
गोविंदराव गायकवाड सेनाखासखेल समशेर बाहादर ॥

पुढें सन १८२१ सालीं झालेल्या नव्या सनदेवरही तसाच मजकूर असून नांव मात्र सयाजी आहे. आणि त्यानंतर सन १८७२ सालीं झालेल्या सनदेवरही त्याचप्रमाणें असून नांव मात्र मल्हारराव असें बदललें आहे.

१९७. खंडेराव गायकवाडांचा विद्येविषयीं अभिप्राय.

खंडेराव महाराज यांस रेसिडेन्ट साहेबांनीं आपले राज्यांत विद्याभ्यासाची तजवीज करण्याविषयीं कळविलें. तेव्हां त्यांनीं असा जबाब दिला कीं, 'आह्मीं आपले प्रजेस शिकविण्याची तजवीज केली तर ते फार दांडगी होऊन त्यांच्या तक्रारी फार वाढतील, याजकरितां आज जें निमूटपणें काम चाललें आहे तें बरें आहे.' आतां ही गोष्ट कांहीं आश्चर्याची नाहीं. अशा विलायतेंतही कल्पना थोडे दिवसांवर होत्या आणि हिंदुस्थानांत तर शूद्रांस शिकविण्याची मनाई होतीच. पण इंग्रजी राज्यांत जे माहात्म्ये पुरुष आहेत त्यांस हिंदुस्थानच्या प्रजेस शिकवून शहाणें करावें असें वाटतें व त्यांचे जोरानेंच विद्याखातें चाललें आहे. परंतु शिकलेले लोक उद्दाम व दांडगे होतात म्हणून त्यांस शिकवूं नये अशी कुरकुर करणारेही त्यांजमध्यें आहेत. सारांश लोकांचे अज्ञानापासून आपल्यास लाभ असतात व ते जावे असें कोणास वाटत नाहीं!

१९८. मल्हारराव गायकवाडांचे स्नेही.

मल्हारराव गायकवाड राज्यावर असतां त्यांजजवळ मर्जीतील (खा-

मस्कऱ्ये) मंडळी बरीच असून त्या दरएकास सहाशें रुपये महिना नेमणूक होती. या नेमणुकांविषयीं कितीएकांचा दावा असा होता कीं, त्यांनीं त्यांस राज्यावर येण्याविषयीं मदत केली, कितीएकांनीं मल्हारराव महाराजांकडून मल्हारराबांसाठीं हाल भोगले, कोणी ह्मणत आह्मीं महाराज गादीवर येण्याकरितां तप केलें, कोणी ह्मणत आह्मी सकुन सांगितला, कोणी ह्मणत आह्मीं खटपट केली, कोणी ह्मणत आह्मी आप्त. याप्रमाणें अनेक सोंगांनीं अनेक लोक त्यांचे भोंवतीं जमले होते. या सर्वांचीं नांवें खालीं लिहिलीं आहेत—

१ व्यंकटराव गोविंद मास्तर, पटवर्धन.	१७ राजाराम जपे.
२ मुकुंदराव मामा.	१८ माधवराव घोपटकर.
३ खासेराव.	१९ रावजी आठवले.
४ रामराव. (मुकुंदरावाचा जांवई.)	२० गणपतराव आठवले.
५ चंद्रशेट सोनार.	२१ गणेश शास्त्री वैद्य.
६ शेखजी.	२२ दादा आंबीकर.
७ मलूकचंद खत्री.	२३ रामेश्वर स्वामी नारायण.
८ आत्माराम माधवजी.	२४ नारायण जोशी पाद्येकर.
९ विष्णुपंत नेने.	२५ पाटणकर.
१० दामोदरपंत नेने.	२६ गोविंददास बहिरागी.
११ नाना खानवेलकर.	२७ गोविंदजी नाईक.
१२ दाजी खानवेलकर.	२८ यशवंतराव येवले.
१३ गुजाबा खानवेलकर.	२९ कृष्णाजी त्रिंबक रानडे.
१४ नारायणराव डाक्तर.	३० लक्ष्मणराव भगवंत.
१५ बळवंतराव राहुरकर.	३१ अमरसिंग.
१६ गोपाळराव जपे.	३२ मोहनसिंग.

या सर्वांस नेमणुका असून शिवाय त्यांजकडे कामें असत तीं; कोणाकडे तफावतखातें, कोणाकडे शहरदुरुस्ती, कोणाकडे इमारतखातें, कोणाकडे दिवाणगिरी, कोणाकडे अनुष्ठानें, कोणाकडे वैद्यगिरी व कोणाकडे खुषमस्करीचा धंदा. या सर्वांनीं पांच वर्षे गोंधळ घातला; परंतु एकाचे हातूनही धडगत झाली नाहीं!

१९९. बडोद्याविषयीं व्यवस्था.

मल्हारराव यांस कैद केलें तेव्हां बडोद्याचें राज्याची काय व्यवस्था करावी याविषयीं बहुत विचार चालला होता. त्यावेळीं कोणाचें मत वारसास राज्य द्यावें, कोणाचें मत इंग्रज सरकारचा अम्मलदार नेमून कारभार चालवावा, कोणी ह्मणत कीं हिंदु मनुष्य नेमून त्याचे हातून कारभार करवावा, कोणी ह्मणत कीं हें राज्य असेंच देऊन सरकारानें पांच वर्षे जो शहाणा मनुष्य वाटेल त्यास नेमावें व त्याची पांच वर्षे झालीं ह्मणजे दुसरा कोणी नेमावा. येणेंकरून राडे दिनकररावांसारखे मोठे व अब्रूदार मनुष्य सरकारचे दोस्त असून त्यांस देण्यासारखें सरकाराजवळ कांहीं नसल्यामुळें तशा योग्य लोकांसही एक राज्य चालविण्याची मोठी जागा देण्यांत येईल. असे अनेक विचार चालतां चालतां असें ठरलें कीं, या देशांत दत्तक देण्याची चाल असून त्याप्रमाणें गायकवाडास सनदही झाली आहे व ती रीति लोकांस कबूल असल्यामुळें त्याप्रमाणें दत्तक देण्याचें ठरून सयाजीराव गायकवाड हा मुलगा गायकवाडीचा मालक झाला.

२००. गायकवाडांचे दिवाण.

इ० स० १८०२ सालीं गायकवाड सरकारचे दिवाण रावजी आपाजी परभू हे होते. तेव्हांपासून त्यांचे पुढें त्यांचे पुत्र सीताराम बोवा, आणि नंतर अनुक्रमें विठोबा देवाजी, वेणीराम भाई, गोपाळपंत दादा देवधर, भाऊ तांबेकर, गणेशपंत ओझे पळसपेकर, गोविंदराव रोडे, नारायणराव भाऊ शिंदे, गोपाळराव मैराळ जाहिर दिवाण व आंतून बळवंतराव राहुरकर, शिवाजी खानवेलकर आणि शेवटीं दादाभाई नौरोजी असे झाले. दादाभाईचे कारकीर्दीत मल्हारराव कैद होऊन सर टी. माधवराव हे दिवाण झाले. यांचे नंतर काजी शहाबुद्दीन, लक्ष्मण जगन्नाथ, मणिभाई जसभाई हे अनुक्रमें दिवाण झाले.

२०१. रामराव आपाजी परभू यांचा शहाणपणा.

गायकवाड यांचे राज्यांत मल्हाररावानें बंड केलें तेव्हां फत्तेसिंग यांचे दिवाण रामराव आपाजी परभू होते त्यांनी तें मोडण्याचा यत्न

केला; परंतु तो सिद्धीस जाईना. मल्हारराव कडीस किल्ला बांधून राहिला. पुढें रामराव आपाजी पुण्यास गेले, तों नाना फडणवीस बोलत होते. त्यांनी सांगितलें कीं, 'राज्यकारण सर्व बिघडलें आहे, आपले हातून कांहीं होणें नाहीं.' नंतर बाजीरावाकडे गेले. त्यांनीं तांसितलें कीं, 'पाहिजे असल्यास त्रिंबकजीस मदत देतों;' पण 'पाच वरीस शिंदे व होळकर आपसांत लढत होते यासाठीं त्रिंबकजीसारखे हलके व अप्रामाणिक माणसास आणून राज्य आजच बुडवावें यापेक्षां इंग्रज बरे; त्यांस कांहीं तरी प्रामाणिकपणा आहे,' असें रामरावास आपाजीस वाटून त्यानें इंग्रजांशीं बोलणें लावून वाकर साहेबास आणिलें, व त्याप्रमाणें इंग्रजांनीं मल्हाररावाचें बंड मोडून त्यास मुंबईस कैदेत पाठविला व कानोजीस धरून मद्रासेस पाठविला. नंतर हे उपद्व्याप तेथेंच नेले.

२०२. बडोद्याचे प्रसिद्ध तीन सावकार.

बडोद्याचे राज्यांत तीन पुरुष मोठे लौकिकवान् झाले असें लोक बोलतात. एक विठोबा देवाजी दिवाण, हरीभक्ती पारख व मैराळ भाऊ. या त्रयीचा लौकिक बडोद्याचे राज्यांत कोठें नाहीं असें नाहीं. यांनीं प्राचीन रीतीप्रमाणें बहुत धर्म केला, द्रव्यही पुष्कळ मिळविलें व नीतिमानही तसेच होते. काठेवाडांत, बडोदे प्रांतांत व नर्मदातीरीं यांचा धर्मादाय सर्वत्र दृष्टीस पडतो. दिवाणजींच्या मुलीचें लग्न झालें तसा समारंभ तर सवाई माधवराव यांचे लग्नापासून झाला नाहीं! मैराळ भाऊ यांचा मृत्यु ही एक मोठीच थाटाची गोष्ट झाली! यांनीं मरतेसमयीं लाखों रुपयांचीं खतें कुळांस फाडून दिलीं! व त्यांजबरोबर स्मशानांत जाण्यास इतके लोक आले होते कीं, रस्त्यामधून प्रेत नेलें परंतु दुतर्फा माणसें इतकीं गच्च भरलीं होतीं कीं, त्यांस चालण्यासही अवकाश नव्हता!

२०३. खा० ब० खरशेटजी सरन्यायाधीश, बडोदें.

माणिकजी वीरजी ऊर्फ माका वीरा हे सुरतेजवळ रान्देर गांवी सुखी राहात असून त्यांचे पुत्र कावसजी माणिकजी हे ठाण्यास राहाण्यास आले. त्यांचे पुत्र रुस्तुमजी वकील, यांनीं बहुत दिवस वकिलीचें काम

केलें. त्यांचे पुत्र खरशेटजी रुस्तमजी, हे कल्याणास मुन्सफ होते, व बडोद्यास वरिष्ट कोडताचे अधिकारी होते !

दक्षिणेंतील सरदारांच्या गोष्टी.

२०४. सातारचे छत्रपति यांचे प्रतिनिधि.

शिवाजी भोंसले छत्रपति यांनीं मराठे लोकांचें राज्य स्थापन केलें, आणि आपलें राजकीय काम उत्तम प्रकारें चालावें या हेतूनें अष्टप्रधान नेमिले. त्यांत रा० निराजीपंत यांस न्यायाधीश केले होते. त्यांचे चिरंजीव प्रल्हाद निराजी हे गोवळकोंडें येथील मुसलमानी दरबारांत छत्रपति यांचे मार्फत वकील होते, पुढें इकडे शिवाजी हे मरण पावले. त्यांचा मुलगा संभाजी हा स्वभावानें दुष्ट होता. त्यानें अवरंगजेब यानें सन १६७९ त पुण्याजवळ तुळापूर येथें ठार मारिले. आणि त्याचा पुत्र शाहू व स्त्री येसूबाई या उभयतांस बंदींत टाकिले. तेव्हां शंभू छत्रपति यांचा भाऊ राजाराम ह्मणून होता तो, दक्षिणेंत मुसलमानांपुढें टिकाव लागेना ह्मणून कर्नाटकांत शिवाजीचे महाल होते तिकडे इ० स० १६९० त पळून गेला. तो छपूनच राहिला होता. पुढें जिकडे तिकडे यवास्थित झाल्यावर प्रल्हाद निराजी यांनीं फारच मदत केल्यामुळें अष्टप्रधानांहून मोठी पदवी 'प्रतिनिधि' अशी कल्पून ती त्यास दिली. या पहिले प्रतिनिधीचा अष्टपैलू शिक्का खालीं लिहिल्याप्रमाणें आहे.

श्रीलक्ष्मीनृहरेः प्रीते मुद्रा नीराजिजन्मनः ।
राजारामप्रतिनिधेः प्रल्हादस्य विराजते ॥

पुढें सन १६९७ त प्रल्हाद निराजी हे चंदीवर मुसलमानांनी हल्ला केला त्यांत ठार मारले गेले. त्यांचे जागीं त्याच सालीं तिमाजी रघुनाथ यांस प्रतिनिधीचीं वस्त्रें मिळालीं. ती पदवी त्यांनी सन १७०० पर्यंत चालविली. हे पराक्रमी नाहींत असें दिसून आले होतें. यांची मुद्राः—

राजारामप्रतिनिधेर्लक्ष्मीकांतप्रसादतः ।
तिमाजीरघुनाथस्य मुद्रार्कोऽयं विराजते ॥

पुढें राजाराम छत्रपति सन १७०० ह्मणजे शके १६२२ फाल्गुन व ९ स पुण्याजवळ सिंहगडावर मरण पावले. त्यांची स्त्री हंसाजी मोहिते यांची कन्या ताराबाईसाहेब ही कारभार पाहूं लागली. राजश्री रामचंद्रपंत बावडेकर आमात्य हुकुमत, यांचे कारकून रा० परशराम त्र्यंबक किन्हयी येथील कुलकरणी, यांनीं पन्हाळा, सातारा, जिंजी, सतगड, व परळी हे किले मुसलमानांच्या गर्दीत संरक्षण केले. व राक्रमानें मोठे प्रसिद्धीसही आले तेव्हां त्यांची योजना ताराबाईसाहेब यांनीं प्रतिनिधीचे जाग्यावर केली. त्यांची मुद्रा प्राचीन कागदावरील अशी आहे.

श्री आई आदिपुरुष प्रसन्न
राजारामस्वामी कृपानिधि ।
तस्य परशुराम त्रिंबक प्रतिनिधि ॥

यांचे कागदाचे शेवटीं 'निदेशसमक्ष' अशीं अक्षरें असून श्रीकाराजवळ 'आई आदिपुरुष' अशीं अक्षरें आहेत.

यांनीं ही पदवी सन १७०८ पर्यंत चालविली. नंतर याच साली माघ महिन्यांत शंभू छत्रपति यांचा पुत्र शाहू (खरें नांव शिवाजी) हा मोंगलांचे कैदेंतून सुटून साताऱ्यास आला. तेव्हां ताराबाई व प्रतिनिधि यांनीं हा तोतया आहे असें ठरविलें. सातारचे गादीवर त्यास बसूं देईनात. तेव्हां शाहू छत्रपति यानें, किल्लेदार शेखमिरा यास फितूर करुन किला घेतला. नंतर शाहूराजानें माजी प्रतिनिधि प्रल्हाद निराजी यांचे पुत्र गदाधर व नारायण असे होते. पैकीं गदाधर यांस प्रतिनिधी नेमिलें. त्यांनीं ही पदवी २ वर्षें चालविली. यांची मुद्रा येणेंप्रमाणें:—

श्रीशंकर शाहू छत्रपति कृपानिधि ।
प्रल्हादसुत गदाधर प्रतिनिधि ॥

पुढें परशुरामपंडित प्रतिनिधि हे शाहू छत्रपतीस शेखमिऱ्याचे मार्फत शरण आल्यावरून त्यांस पुन्हा ती पदवी दिली. ती सन १७१० पर्यंत त्यांजकडे होती. इतक्यांत त्यांचा वडील पुत्र कृष्णराव यांस ताराबाईनीं कोल्हापुरास संस्थान करून तेथें ठेविलें होतें. त्यानें कांहीं

बंडावा केला यास्तव परशराम पंडित यांस काढून गदाधर यांचे बंधु नारायण प्रल्हाद यास प्रतिनिधींची जागा दिली. त्यांनी ती पदवी १ वर्षे चालविली, त्यांची मुद्रा:—

श्रीमत्र्यंबकभक्तस्य शाहुप्रतिनिधेर्मम ।
नारायणस्य मुद्रेयं प्रल्हादतनुजन्मने ॥

या समयीं राजश्री कृष्णराव राजा खटावकर या नांवाचा मोंगलांचा सरदार होता. त्यानें खानदेशांत बंड केलें म्हणून शाहू राजानें परशुराम पंडित यांचा तिसरा पुत्र श्रीनिवासराव यांस हें बंड मोडण्याकरितां पाठविलें. त्या उभयतांची आडेदाजवळ लढाई होऊन श्रीनिवासराव यांनीं खटावकर यांस कैद करून आणिलें. तेव्हां राजा प्रसन्न होऊन त्याचे बापास कैदेंतून मुक्त करून त्यास प्रतिनिधींची पदवी दिली. ती सन १७१२ पासून १६ पर्यंत त्यांनीं चालविली. त्यांची मुद्रा वर्णेप्रमाणें:—

श्रीआई आदिपुरुष
श्रीराजा शाहु छत्रपति स्वामी कृपानिधि ।
तस्य परशुराम त्र्यंबक प्रतिनिधि ॥

राजानें पत्र लिहिणें तर त्यांस 'रा० परशुराम पंडित' असें वर लिहून नेहमीं 'बहुत काय लिहिणें सुज्ञ असा' अशाप्रकारची चाल होती. या वेळेस शाहूराजाचे मुख्य प्रधान पेशवे बहिरो मोरेश्वर पिंगळे हे होते.

परशुरामपंत मेल्यावर त्यांचा तिसरा पुत्र श्रीनिवास परशुराम हा पराक्रमी असल्यामुळें त्यास ती पदवी मिळाली. यांस श्रीपतराव अथवा रावप्रतिनिधि असेंही म्हणत. यांनीं सन १७१७ पासून १७४० पर्यंत ही पदवी चालविली. प्रतिनिधीचे वंशांत हे पुरुष मोठे विख्यात व धार्मिक असे होऊन गेले. यांनीं १० लक्ष रुपयांच्या जमिनी व गांव मिळून लोकांस इनाम दिलें. व शाहूराजाजवळ मुख्य कारभारी हेच होते. यमाजी शिवदेव हे यांचे मुतालिक होते. यांनी कर्नाटकांत निजामाशीं लढाया दिल्या. कोकणांतील कांहीं किले घेतले. कोल्हापुरच्या राजाशीं लढाई देऊन जय मिळविला. अशा प्रकारें पराक्रम व धर्म या दोन स्तुत्य गुणांनीं यांनीं आपली कीर्ति चिरकाल

करून ठेविली. शाहूराजाचे कारकीर्दीत या पुरुषाचें नांव सर्वांस प्रिय होतें. पुढें जे अधिकारी झाले त्यांनीं यांनीं केलेला धर्म बुडविला. तथापि अद्याप बहुत चालू आहे. यांचा शिक्का बापाच्या मुद्रेप्रमाणेंच नांव मात्र बदलून तयार केला होता. यांची पत्नी राधाबाई. बहीण रखोदाबाई ही राजेश्री आपाजीराव कुळेकर देशपांडे यांस दिली होती. मुलगी राजसबाई हिला कडेगांवकर देशपांडे रा० नागोजीराव यांस दिली होती. यांचें मुख्यत्वेंकरून राहाणें कराडास होतें. परशुरामपंत यांचा बंधु माधवराव यास दत्तक दिला होता परंतु त्यास परत देऊन त्याचें श्रीनिवास परशुराम हेंच नांव चालविलें. बाजीराव बल्लाळ पेशवे यांचा उत्कर्ष यांचे कारकीर्दीत झाला. यांचा सन १७४७ त काळ झाला. तेव्हां त्यांचा कनिष्ठ बंधु जगजीवन परशराम यास ती पदवी दिली. जगजीवन यांस दादोबा असेंही म्हणत.

पुढें शाहू छत्रपति, सन १७४९ सालीं मार्गशीर्ष वद्य ३ स कैलासवासी झाले. त्यांजबराबर त्यांची पत्नी सगुणाबाई ही सती गेली. नाणे बाळाजी बाजीराव पेशवे यांनीं राजमंडळ तोडून टाकिलें. या समांत दादोबा हे हरकत करूं लागले. व त्यांनीं व त्यांच्या मुतालिकांनीं सांगोळे घेतले. तेव्हां भाऊसाहेबांनीं त्या उभयतांस कैदेच्या कैदेंत टाकिलें. पुढें दोन वर्षांनीं सर्व बंदोबस्त झाल्यावर सोडिलें. हे पुढें १७५१ सालीं मरण पावले. त्यांच्या स्त्रिया मैनाबाई व सुंदराबाई यांस विटें हें अग्रवस्त्राकरितां देऊन तेथें ठेविल्या होत्या.

जगजीवन पंडित मेल्यावर कृष्णाजी परशुराम यांचा नातु श्रीनिवास गंगाधर हा वडील घराण्यांतील सख्ख सन १७५१ सालीं वस्त्रें देऊन. त्यांनीं सन १७६२ पर्यंत ती पदवी चालविली. यांस भवानराव असेंही म्हणत. पुढें पानपतचे लढाईंत सदाशिव भाऊ पडले. व बाजीपंत नाना पेशवे हेही क्षयरोगानें पर्वतीस वारले. माधवराव बल्लाळ लहान यामुळें सर्व कारभार राघोबा दादा यांजकडे आला. तेव्हां यांचे कुपेंतील नारो शंकर राजेबाहादर यांस त्यांनीं प्रतिनिधीचीं वस्त्रें दिलीं आणि भवानराव यांस काढून टाकिलें. ही पदवी यांनीं १ वर्ष भोगिली.

नारो शंकर यांनीं रा० गोपाळराव मिरजकर यांशीं लढून मिरज घेतली तेव्हां भवानराव गोपाळराव हे बंड करीत करीत हैदराबादेस गेले. त्यांचे वरावर गमाजी यमाजी मुतालीक होते; हे निजामाचे दिवाण रा० विठ्ठल सुंदर यांचे व्याही, यामुळें त्यांनीं यांचा पक्ष धरून फौजेसह पेशव्यांवरावर ते लढण्यास आले. राक्षसभुवनावर लढाई होऊन पेशव्यांनीं त्यांचा पराभव केला. परंतु मिरजकर व भवानराव यांची समजूत करून त्यास परत आणिलें. त्यांची त्यास पदवी दिली. पुढें पेशवेसरकारचा आग्रह पडला कीं, प्रतिनिधींनीं पुण्यांत राहावें ती गोष्ट भवानराव यांनीं मान्य केली नाहीं. ह्मणून कृष्णरावाचा दुसरा नातु भगवंतराव त्रिंबक यांस प्रतिनिधीची वस्त्रें देऊन पुण्यांत ठेविलें. पुढें भवानराव राजी झाल्यावरून १७६८ त पुनः त्यांस वस्त्रें दिलीं. आणि भगवंतराव यांजकडे खानापूर वगैरे जहागीर ठेविली. भगवंतराव व भवानराव यांच्या नेहमीं खानापूर प्रांतीं लढाया व कलह होत यामुळें पेशव्यांनीं त्यास कांहीं जहागीर देऊन निराळा ठेविला. भगवंतराव सन १७७५ सालीं मरण पावले. त्यांच्या स्त्रिया राजसबाई व सकुवरबाई यांस दहा हजार रुपये नेमणूक करून दिव्यास ठेविलें.

सदरहूप्रमाणें भवानराव यांनीं सन १७६८ पासून पदवीचा निर्वेधपणें उपभोग केला. पुढें नारायणराव पेशवे यांस राघोबादादांनीं ठार मारलें. तेव्हां हे नाना फडणवीस यांस मिळाले. या कारणामुळें यांचें चांगलें वस्तान बसलें. पुढें हे ता० ३१ आगष्ट १७९९ या सालीं मरण पावले. तेव्हां त्यांच्या स्त्रिया यमुनाबाई व काशीबाई अशा दोन होत्या त्यांपैकीं काशीबाई ही भ्रतार मेला त्याच दिवशीं प्रसूत होऊन तिला पुत्र झाला. नंतर नाना फडणवीस यांनीं राजश्री कृष्णराव तात्या जोशी सातारकर यांस कारभारी नेमून बंदोबस्त केला. त्या पुत्राचें नांव परशराम. हा खर्ड्याचे स्वारींत होता. पुढें नानाची कारकीर्द सरली व कारभारी उठले आणि खासे मुकत्या झाले. इकडे पुण्यांत बाजीराव गादीवर आले. अशा कारणांनीं मुलगा फार दुर्वृत्त निघाला. आईशीं व बायकांशीं याचें फार वैर व-

दलें. रमा तेलीण इला जवळ ठेवून रामोशी चाकरीस ठेविले. मुलखांत दंगे दरवडे घालण्यास आरंभ केला. आईनें व तिचे कारभारी रावंतराव फडणीस यांनीं बहुत उपाय केले, परंतु त्याचें तें व्यसन जाईना. मांग फार व्यावी, मुलूख लुटून पैसा काढावा, वाटा मारावा. माणसांच्या नाकांत व कानांत दारू घालून माणसें मारावीं. इत्यादि कर्में चालविलीं. हलकीं माणसें जवळ असून गर्दी तमासगीर सतत सर्वकाळ वसावें. स्त्रिया लक्ष्मीबाई व रमाबाई ह्या पळून जाऊन विशाळगडावर राहिल्या. शेवटीं बाजीराव साहेब यांजकडे आईनें जेमाट नेल्यावर बापूजी गोखले यांस बंदोबस्ताकरितां नेमिलें. त्यांनीं फौजेसुद्धां जाऊन मसुरेवर लढाई दिली. तींत परशरामपंत यांचा हत्ती तुटून ते कैद झाले. त्यांस पुण्यास आणून ठेविल्यावर त्याची नाकशाळा रमा तेलीण हिनें दंगा करून वासोटा किल्ला लढविला. शेवटीं हिलाही आणून पुण्यास टाकिलें. सर्व मुलूख जप्त झाला. पैकीं इसवड वगैरे गोखल्यास दिले. कांहीं सरकारांत घेतले. याप्रमाणें सन १८०७ त झालें.

प्रतिनिधीकडे ३००० स्वारांचें पथक होतें. त्याकडे पुष्कळ किल्ले होते. सर्व मिळून १८ लक्षांचा मुलूख होता. हलींचा सर्व सातारा जिल्हा हा त्याजकडेस होता. दर महालांत शेकडा निम्मे रुपये प्रतिनिधि घेत असे कितीएक महाल होते. या प्रतिनिधींचे हिस्स्यास 'जिल्हेवार' असें नांव आहे. बाकी राहील त्यास 'हुजूर मामला.' ही नांवें अद्याप चालत आहेत.

प्रतिनिधीकडील मुख्य किल्ल्यांचीं नांवें:—

१ व्याघ्रगड।	८ वहिरवगड।
२ सुंदरगड।	९ वसंतगड
३ प्रतापगड।	१० सज्जनगड।
४ नांदगिरी उर्फ कल्याणगड	११ मंगलगड।
५ वर्धनगड।	१२ मकरंदगड
६ महिपतगड	१३ केजळा उर्फ मनमोहनगड
७ वारुगड।	१४ जंगली जयगड।

ऐ० गो० १. १२.

१५ भूषणगड
१६ महिमानगड
१७ महिमदनगड
१८ मोरगिरी उर्फ गुणवंतगड
१९ मछिंद्रगड
२० अवचितगड
२१ सुप्तेगड
२२ गंभीरगड
२३ गहनगड
२४ संतोषगड

प्रतिनिधीकडे महाल होते ते:—

१ कर्यात विटें
२ कसबें कासेगांव
३ सुभा सातारा
४ सुभा जावली
५ सुभा कऱ्हाड
६ सुभा वांई
७ कसबें आडंध
८ प्रांत खटाव
९ तालुके कोळे
१० तालुके किन्हई
११ कसबें भालवणी
१२ रुळी बुंदेलखंडांत
१३ कसबें निमसोड
१४ तर्फ वारूण
१५ हवेली विजापूर
१६ कर्यात अठपदी
१७ कसबें नाझरें
१८ कसबें वेळापूर
१९ नृसिंहगड
२० खानापूर
२१ पागेवाडी.

याखेरीज उत्तर हिंदुस्थानांत कांहीं किरकोळ गांव होते. पुढें सन १८१२ त बाजीरावानें असें ठरविलें कीं, प्रतिनिधीनें परत कऱ्हाडास जावें आणि त्यांस दोन लक्षांचा मुलूख मात्र द्यावा. मग वाईट साईट गांव देऊन दोन लक्षांची भरती केली ती:—

कऱ्हाडापैकीं १४ गांव व अंमल
कर्यात आडंध पैकीं १४ गांव व आडंध.
१ बावती विजापूरपैकीं.

इतक्यांचा वसूल हल्लीं ६०।७० हजार रुपये येत आहे.

याप्रमाणें सरमजाम मिळाल्यावर प्रतिनिधि परत कऱ्हाडास गेले. परंतु त्यांचे वृत्तीची सुधारणा न होतां तसाच घोळ चालला होता. पुढें १८१८ सालीं पेशव्यांचें राज्य बुडालें. तेव्हां प्रतिनिधि हे सातारचे छत्रपति यांचे निसबतीस दिलें तेव्हांपासून त्या पुरुषाची

गडबड राहिली. ते इंग्रज सरकारचे धाकानें गरिबीनें राहत असत, तथापि मरेपावेतों स्त्रियांची भेट नाहीं. त्या उभयतां मोठ्या साध्वी होत्या.

तारीख १० मे सन १८४८ वैशाख शुद्ध ८ शके १७७० या सालीं परशराम पंडित वारले, तेव्हां त्यांचे भाऊबंदांपैकीं एक मुलगा दत्तक दिला. तो छत्रपति व इंग्रजसरकार यांनीं मान्य केला. हल्लीं हे गादीचे अधिकारी आहेत. यांचें नांव प्रतिनिधि श्रीनिवास पंडित. यांचे कारकीर्दीत कांहीं दु अमली गांव होते ते सरकारांत घेतले. आणि दुसरे दिले. याखेरीज कांहीं लिहिण्याजोगें झालें नाहीं. यांस २ स्त्रिया आहेत. पैकीं एक रा० अंताजी नारायण मुतालीक यांची कन्या. हीं त्रिवर्ग गोडीनें आहेत.

प्रतिनिधि श्रीनिवास पंडित यांनीं गरिबी पाहिली आहे. व हल्लीं ते श्रीमंतीही भोगीत आहेत. तर यांनीं हल्लींच्या काळावर नजर देऊन आपला लौकीक वाढवावा. तलवार गाजवून लौकीक मिळविण्याचे दिवस निघून गेले. तर विद्यावृद्धि करून ज्ञान संपादन करणें हीच या कालांत तलवार आहे. याकरितां आपल्या प्रांतांत शाळा स्थापन करून प्रजेच्या कल्याणाकडे लक्ष द्यावें. हल्लीं इंग्लिश लोकांच्या संबंधानें नानातऱ्हेच्या विद्या व कलाकौशल्यें दृष्टोत्पत्तीस येत आहेत तर आपल्या लोकांस त्यांत गम्य नाहीं यास्तव त्यांचा यांत प्रवेश करून देणें हें किती अगत्याचें आहे याचा विचार करावा. आपल्या प्रांतांत नवीन रस्ते बांधणें, पडीत जमिनी असल्यास त्या कौलानें देणें, पाण्याची सोय करणें वगैरे उपायांनीं देशांतील उत्पन्न वाढविण्याकडे लक्ष दिलें पाहिजे. या उपायांनीं प्रजा सुखी होऊन आपलेंही उत्पन्न वाढतें. लौकीक होतो. फार काय सांगावें ? सर्व प्रकारें चांगलें होतें. तर अशा गोष्टीकडे दुर्लक्ष करणें हें सर्वथा अनुचित होय. या शील गोष्टीकडे विंचूरकर आणि जमखिंडीकर यांनीं चांगलें लक्ष पोंचविलें आहे तर त्यांस इंग्लिशसरकारही किती चाहातें हें सर्वांनीं लक्षांत आणावें. सातारचे राजमंडळांतील अष्टप्रधानांपैकीं मुख्य जे एक प्रतिनिधि त्यांनीं आपलीं वर लिहिल्याप्रमाणें क्रम सुरू केला आहे त्यांचा कित्ता दुसरेही घेतील यांत संशय नाहीं. हे तरुण आहेत

त्यापेक्षां यांनीं वरचेवर मोठा सरमजाम बराबर न घेतां मुंबईस देत जावें. व एकवार विलायतेचीही यात्रा करावी. हल्लींच्या काळांत त्या यात्रेपासून जितकें पुण्य आहे तितकें दुसऱ्या यात्रेपासून नाहीं. तरी त्यांनीं आमच्या लिहिण्याकडे दुर्लक्ष न करावें हीच त्यांस आमची प्रार्थना आहे.

२०५. प्रतिनिधि.

प्रतिनिधींचे पदाची माहिती अशी आहे कीं, शिवाजी महाराज यांजपाशीं निराजीपंत झणून न्यायाधीश होते. त्यांचे पुत्र प्रल्हाद निराजी हे गोवळकोंड्याचे बादशाहाकडे वकील होते. त्यांस प्रतिनिधि हें पद राजाराम छत्रपति, ज्यांची समाधि सिंहगडावर आहे, त्यांनीं इ० स० १६९० सालीं दिलें. त्यांचे पुढें नारो प्रल्हाद यास पद मिळालें; तो चंदीचे हल्ल्यांत मेला. त्यानंतर इ० स० १६९८ त तिमाजी रघुनाथ हणमंते यांस प्रतिनिधि केलें. परंतु पुढें त्यांस ताराबाईनीं कादून किन्हईकर परशुराम त्रिंबक यांस इ० स० १७०० मध्यें प्रतिनिधि केलें. त्यानंतर शाहू महाराज आल्यावर त्यांनीं १७०८ सालीं त्यास कैद करून नारो प्रल्हाद याचा भाऊ गदाधर प्रल्हाद यास प्रतिनिधि केलें. पुढें इ० स०१७१४ त परशुरामपंत यांस नेमलें. पुढें ते वारले तेव्हां १७२० त त्यांचे पुत्र श्रीनिवास परशुराम यांस प्रतिनिधि केलें. त्यापुढें जगजीवन प्रतिनिधि होते, त्यांस शाहू महाराज मेल्यावर पेशव्यांनीं कैद केलें. पुढें १७५१ सालीं श्रीनिवास गंगाधर ऊर्फ भवानराव यांस प्रतिनिधि नेमिलें. हे १७६३ सालीं बदलून नारो शंकर राजेबहादर यांस प्रतिनिधि केले. त्याजवर पुनः भवानराव यांस १७६८ सालीं नेमलें. त्यांचे पुत्र परशुराम व त्यांचे दत्तक श्रीनिवास परशुराम. यांची सर्व दौलत बाजीरावाचे कारकिर्दीतच जप्त होऊन परशरामपंत यांस कैद करून पुण्यास ठेविलें होतें. कारण, त्यांनीं वाई प्रांतांत रामोशी लोकांकडून दंगा करवून चोऱ्या, दरवडे वगैरे घातले त्याजवरून बापू गोखले यांस त्यांजवर पाठविलें व त्यांणीं त्यांस कैद केलें. परंतु पुढें

१ परशुरामपंत यांचा जन्म, त्यांचा बाप मेला त्याच दिवशीं झाला!

१८१२ त त्यांस लाख रुपयांचा सरमजाम देऊन परत पाठविलें. यांजकडील रमा तेलीण नांवाची स्त्री कारभारीण होती.

२०६. भोरच्या सचिवांची मुद्रा.

शंकराजी नारायण सचिवांचा शिक्का येणेंप्रमाणें होताः—

श्रीरामभजनासक्तनारायणजनेरियम् ।
शंकरस्य शुभा मुद्रा पूर्णेंदुरिव राजते ॥

२०७. सुमंत.

सांगोलेकर देशपांड्यांपैकीं ज्यांस सुमंत पदवी मिळाली त्यांचें नांव आनंदराव; त्यांचे पुत्र महिपतराव, त्यांचे जीवनराव, व त्यांस दोन पुत्र—गोपाळराव व महिपतराव असे होते. त्यांच्या विधवा वेणूबाई व कृष्णाबाई. त्या प्रत्येकीस १५०० रुपये पेन्शन होतें. त्या दोघींनीं अनुक्रमें रामचंद्र व अमृतराव हे मुलगे दत्तक घेतले. ते हल्लीं आहेत.

२०८. सेनापतींची मुद्रा.

धनाजी जाधव यांचा शिक्का असा होताः—

राजारामचरणीं दृढ भाव ।
सेनापति धनाजी जाधवराव ॥

२०९. पटवर्धनांचा वंश.

हरभट कोतवडेकर पटवर्धन हे पटवर्धन सरदारांचे मूळ पुरुष होते. त्यांचे पुत्र बाळंभट व त्यांचे पुत्र हरभट कोतवडेकर, पांडुरंगभट वाडवाडकर, व केशवभट असे तीन होते. पैकीं हरभट यांस ६ पुत्र होते तेः—कृष्णभट मंगळवेढेकर, बाळंभट, त्रिंबकपंत—यांत रामवद्द व कुरुंदवाडकर आहेत, गोविंदराव हरी—यांत सांगलीकर, मिरजकर व सोनईकर हे आहेत, रामचंद्रराव—यांत जमखिंडी, चिंचणी व तासगांव हे येतात, आणि भास्करराव नेरूरकर—यांतील कृष्णभटाचे बळवंतराव, त्यांचे गणेशपंत, त्यांचे पांडुरंग, त्यांचे रामचंद्र, व त्यांचे हरिहरराव हे आहेत. दुसरे बाळंभट, यांचे वंशांतील भाऊसाहेब हे सांगलीकरांकडे दत्तक झाले; तिसरे त्रिंबकपंत त्यांचे नीळकंठ, त्यांचे रघुनाथ, त्यांचे त्रिंबक, त्यांचे

केशव, व त्यांचे दादा साहेब कुरुंदवाडकर; चौथे गोविंदराव, त्यांचे पांडुरंग, त्यांचे चिंतामणराव आप्पा, त्यांचे दत्तक पुत्र भाऊसाहेब व औरस पुत्र धुंडिराज तात्या साहेब; पांडुरंगराव यांचे भाऊ गंगाधर, त्यांचे नारायणराव, त्यांचे गणपतराव आणि त्यांचे गंगाधर ऊर्फ बाळासाहेब, हे मिरज किल्ल्यांत राहतात; पांचवे रामचंद्रराव, त्यांचे परशुरामपंत भाऊ, त्यांचे रामचंद्र, त्यांचे गोपाळराव आणि त्यांचे दत्तक यादवाडकरांपैकीं रामचंद्रराव हे होते. हे पटवर्धन मोठे पराक्रमी ब्राह्मण सरदार असून कर्नाटकचे सरसुभे होते व हैदर नाईक व टिपुसुलतान यांस पुढें वाढूं न देण्याविषयीं मूळापासून कर्नाटक सरसुभ्यावर यांची योजना झाली होती. यांची फौज पट्टणचे स्वारींत इंग्रज सरकारचे मदतीस गेली होती. हे पटवर्धन नेहमीं बाळाजी बाजीराव पेशवे यांजबरोबर लष्कर घेऊन फिरत. यांची जहागीर तीन लाख रुपयांची होती. कर्नाटकांतील मुलूख यांनींच जिंकून घेतला. यांजमध्यें मोठे पराक्रमी पुरुष गोविंद हरि, परशुराम रामचंद्र व नीळकंठ त्रिवक्र हे होते.

२१०. रास्ते यांचा वंश.

रास्ते यांचा मूळ पुरुष शामजी असून त्यांचें उपनांव गोखले आहे. त्यांस एक सदाशिव नाईक व दुसरे भिकाजी नाईक असे दोन पुत्र होते. हे सातान्यास सावकारी करून असत. यांचें दुसरें नांव, ते रास्तपणानें वागत म्हणून 'रास्ते' असें पडलें. या दोन पुत्रांपैकीं सदाशिव नाइकांचा पुढें वंश नाहीं. भिकाजी नाईक यांस मात्र सात मुलगे होते ते येणेंप्रमाणें:—मल्हारराव, गणपतराव, आनंदराव, लक्ष्मणराव, गंगाधरराव, रामचंद्रराव, आणि जीवनराव. या पुत्रांपैकीं आनंदराव यांचे पुत्र माधवराव व माधवरावांचे बळवंतराव व गंगाधरराव. पैकीं गंगाधरराव यांचे खंडेराव हे पुत्र होते; ते मयत होऊन हल्लीं त्यांचे दत्तक आहेत. भिकाजी नाईक यांचीच मुलगी गोपिकाबाई, ही श्रीमंत बाळाजी बाजीराव ऊर्फ नाना साहेब यांस दिली होती. तिचे विश्वासराव, थोरले माधवराव व नारायणराव असे तिचे पुत्र होते. माधवराव रास्ते यांस

इ० स० १७६२ त सरदारी मिळाली; त्यांत पागलकोट, तालिकोट, कडेबळीत वगैरे माहाल त्यांजकडे सरंजामास होते.

२११. चंद्रचूडांचें घराणें.

खेड तालुक्यांतील तिंबगांवचे राहणार यशवंतराव यांचे चिरंजीव गंगाधर ऊर्फ गंगोबा हे होळकरांचे दिवाण झाले. व त्यांनीं पेशवाई अव्वलीस मोठी दौलत कमावली. त्यांचें उपनांव चंद्रचूड होतें. त्यांचे पुत्र यशवंतराव, त्यांचे पुत्र महादेवराव, त्यांचे दत्तक गंगाधरराव व त्यांचे दत्तक बळवंतराव गंगाधर, हे हल्लीं असून यांस मोंगलाईत व इंग्रजींत सरंजाम चालत आहे. नाशिकच्या सुंदरनारायणाचें देऊळ वरील गंगोबांनीं बांधलें.

२१२. कोंकणप्रांताचे मुख्य सरदार.

कोंकणप्रांत सर करण्यांत खानविलकर व माणकर हे मुख्य मदत होते, यास्तव त्यांस 'नामजाद' असा किताब होता. दुसरे सरदार आंग्रे व घुळप हे होते आणि त्यांजकडे आरमार असे.

२१३. आंग्रे यांस सरखेल किताब दिला.

कान्होजी बिन तुकोजी आंग्रे यांनीं १६९८ सालीं बादशाहापासून कुलाबा व रायगड हीं दोन ठिकाणें घेतलीं. व पुढें मराठ्यांकरितां मुसलमानांपासून कोंकण प्रांत घेतला. म्हणून त्यांस सातारचे राजांनीं 'सरखेल' असा किताब दिला. त्यांचे पुढें संभाजी, तुळाजी, मानाजी, जयसिंग व रघोजी असे अनुक्रमानें गादीवर बसले.

२१४. आंग्रे व त्यांचा शिक्का.

कुलाब्याचे आंग्रे यांचा शिक्का खालीं लिहिल्याप्रमाणें आहे:—

राजाशाहुनृपतिचरणीं सादर।
राघवसुत मानाजी बजारतमाहा सरखेल निरंतर॥

२१५. अळीबागचे बिवलकर.

रावबहादुर धुंडिराज विनायक बिवलकर यांचे आजे परशराम श्रीधर हे आंग्रे सरखेल बजारतमाहा यांचे पदरीं होते. पुढें

आंग्रे यांचा निर्वंश होऊन त्यांस दत्तकाची परवानगी मिळाली नाही व कुलाबा संस्थान खालसा झालें. पुढें विनायकराव बाबासाहेब चिवलकर वारले. त्यांचे पुत्र धुंडिराज हे हल्लीं असून यांनीं लोकांस द्रव्य देऊन कितीएक सोम व कितीएक वाजपेय असे बहुत यज्ञ केले. यांची भक्ति यज्ञावर व श्रोत्रिय ब्राह्मणांवर फार आहे. याचप्रमाणें पुण्यांत सदाशिव नारायण कानिटकर वकील यांनींही सप्तसंस्था केल्या. याप्रमाणें हे एतद्देश्य या कलियुगांतील प्राचीनबर्हिच आहेत!

२१६. नरगुंदकरांविषयीं माहिती.

नरगुंदचा किल्ला मूळ इ० स० १६७३ त शिवाजीनें बांधला. पुढें आपाजी सुरो हेबळीकर जहागीरदार यांजपाशीं रामराव दादाजी ह्मणून एक कोंकणचा ब्राह्मण चाकरीस राहिला असून जहागीरदार यांची पागा कोल्हापूरकर राजांजवळ चाकरीस होती, त्या पागेवर त्यास ठेविलें होतें. त्या राजाची चौथाई वसूल करण्याकरितां जहागीरदार फिरत त्यांजबरोबर रामरावही फिरे. याप्रमाणें स०१७०२ पर्यंत चाललें. पुढें रामराव यांनीं १७०६ सालीं मुसलमानांपासून नरगुंद किल्ला घेतला. त्यामुळें कोल्हापूरकर राजानें चौथाई अंमल बसविण्याकरितां बारा पथकांची सरदारी व त्या किल्ल्याची सनद हीं रामरावांस दिलीं. नंतर रामराव यांनीं नरगुंदास व्यंकटेशाचें देऊळ बांधिलें. पुढें रामरावांचा पुतण्या दादाजी यास कोल्हापूरचे राजांनीं सचिवाचें पद दिलें. त्या दादाजींचा मुलगा भास्करराव, त्यांचा व्यंकटराव, त्यांचा दादाजी आणि त्यांचा भास्करराव. भास्करराव यांस बंड केल्यामुळें सन १८५७ सालीं फांशीं दिलें व नरगुंदची जहागीर खालसा झाली. ह्याप्रमाणें नरगुंद संस्थानाचा आद्यंत आहे.

२१७. हसबनीस.

शंकराजी केशव हसबनीस हे वसईचे मसलतींत उपयोगी पडले ह्मणून त्यांस कोंकणांत इनामें, गांव, व जमिनी दिल्या. शंकराजींचे पुत्र सर्वोत्तम आबा, त्यांचे नारायणराव, त्यांचे विनायकराव

हे शके १७६२ सालीं वारले; त्यांचे त्रिंबकराव, गणपतराव व शंकरराव हे तीन पुत्र होते.

२१८. मुजूमदार.

नारोपंत खरसीकर (वांई प्रांत) यांस मुजुमदारीचा दरक १७१३ इसवींत मिळाला. त्याचा मुलगा नीलकंठराव, त्याचा मुलगा नारायणराव आणि त्याचे पुत्र नीलकंठराव व जीवनराव. पैकीं नीलकंठराव यांचे पुत्र कृष्णराव, यांस वाळकी, बोपखेळ, मांजरी वगैरे गांवें सरंजामास असून त्यांचा पुत्र नारायण आणि जीवनरावांचा मोरेश्वर असे पुतणे चुलते हल्लीं आहेत.

२१९. कन्हाडकर मुतालिक.

यमाजीपंत शिवदेव हे प्रतिनिधींचे मुतालीक होते. त्यांचे पुत्र नमाजी यमाजी. त्यांची नकल (निर्वेश) झाली. परंतु यमाजी याचे भाऊ अंताजीपंत होते. त्यांस वासुदेव ह्मणून पुत्र होता; त्याचा अंताजी, त्याचा नारायण आणि त्याचे अंताजी मुतालीक; हे हल्ली कन्हाडास असून त्यांजकडे बारा हजारांचें इनाम चालत आहे.

२२०. सरलष्कर व सेनाकर्ते.

इ० स० १७२० ह्मणजे अशरीन मया व अल्फ (६०९) रजब रोजी श्री० छत्रपति यांनीं चिमणाजी बल्लाळ यांस सरलष्करची सरदारी दिली. त्यावेळीं जैताजी पाळकर हे सरनौबद होते. पुढें हैबतराव नाईक निंबाळकर हे सरलष्कर झाले, तेव्हां त्यांचे हाताखालीं मोहिते हे सेनाकर्ते होते.

२२१. राजाज्ञा.

राजाज्ञा हें पद प्रथम रंगराव उद्धव यांस इ० स० १७०९ मध्यें मिळालें. नंतर तेंच पद नारो राम, त्यानंतर चिमणाजी दामोदर, त्यापुढें दत्ताजी शिवदेव, त्यावर भवानीशंकर व त्यानंतर शाहू महाराजांनीं मोरेश्वर देशपांडे वांईकर यांस, याप्रमाणें दिलें. त्यावरून हल्लीपर्यंत वांईकर देशपांडे यांचे वंशास 'राजाज्ञा' ह्मणतात.

इतर मराठे सरदारांच्या गोष्टी.

२२२. नागपुरकर भोंसले सेनासाहेब सुभा.

शाहू महाराज औरंगजेबाचे कैदेंतून १७०७ सालीं सुटल्यावर त्यांजवर ताराबाईनें बंड उभें केलें. त्यासमयीं परसोजी भोंसले यांनी मदत केली. सबब त्यांस 'सेनासाहेब सुभा' हा किताब दिला; व चौथाई वसूल करण्यास पाठविलें. ते नागपुराकडचे प्रांत सर करावयास लागले. त्याचा मुलगा कान्होजी, नंतर रघोजी व त्यानंतर जानोजी वगैरे अनुक्रमानें त्याच पदावर बसले.

२२३. नागपुरचे भोंसले.

इसवी सन १७५५ सालीं रघोजी भोंसले सेनासाहेब सुभा यांनी गोंडवण व नागपूर प्रांतीं मराठ्यांचा अंमल बसविला. त्यांचे कारभारी भास्कर पंडित म्हणून होते. रघोजीस जानोजी, साबाजी, मुधोजी व बिंबाजी असे चार मुलगे होते. पैकीं मुधोजीचे मुलगे रघोजी, चिमाजी व व्यंकोजी असे तीन. रघोजीचा परसोजी व व्यंकोजीचा मुधोजी अप्पा, हा १८१८ त पदभ्रष्ट झाला. परसोजीचे दत्तक रघोजी हे ता० ११ दिसंबर १८५३ सालीं वारले. त्यांच्या अन्नपूर्णाबाई, आनंदीबाई, दर्याबाई व कमळजाबाई अशा चार बायका होत्या. त्यांनीं जानोजी भोंसले यांस दत्तक घेतलें, ते हल्लीं आहेत. हल्लीं त्यांस लाख रुपयांचें उत्पन्न असून त्यांचें राज्य खालसा झाल्यामुळें तेंहि हल्लीं इंग्रजी झाली आहे.

२२४. नारायणराव वैद्य वांईकर.

नारायणराव वैद्य वांईकर हे नागपुरास भोंसले सेनासाहेब सुभा यांजकडे पेशव्यांचें वकील होते. त्यांचें दातृत्व इतकें होतें कीं, त्यांनी सत्रा वेळ तर आपण व बायको घरांतून बाहेर निघून घरादाराचा सर्व दौलतीचें सर्वस्व दान केलें. तरी त्यांचा पुनः संसार जमून ते लाखों रुपयांचे धनी बनले. याकरितां पेशवाईत हे एक कर्णच होते असें म्हणण्यास अगदीं हरकत नाहीं. एके चंद्रग्रहणांत यांचे घरीं भोंसले सेनासाहेब सुभा यांजकडून एक लक्ष रुपयांचा भरणा झाला

असतां रात्रीं ग्रहणांत त्यांनीं तो सर्व वांटून दिल्यामुळें कांहीं राहिलें नाहीं. हें समजल्यावर भोंसले यांनीं पुनः एक लाख रुपये त्यांजकडे पाठवून दिले! पुढें बाजीरावाचा अम्मल होऊन सर्वत्र राज्याचा बिघाड झाला; कोणी कोणास धनी नाहीं; पत्रव्यवहार बंद झाले; तेव्हां अर्थात् या वकीलाशींही कोणी पत्रव्यवहार करीना. म्हणून ते नागपुराहून निघून काशीस गेले, ते तिकडेच वारले. परंतु पुढें त्यांचे घरास अगदीं गरीबी आली.

२२५. बुंदेले यांचा मूळपुरुष.

बाजीराव साहेब यांजवरोबर, वांईजवळ बावधन म्हणून गांव आहे, तेथील राहणारा गोविंदपंत म्हणून तरुण मुलगा, जातीनें कऱ्हाडा ब्राह्मण होता. तो त्यांच्या लष्कराबरोबर गेला. बाजीराव साहेब छत्रसाल राजाचे मदतीस जात असतां मध्यें नदीवर उतरले. तेथें या मुलानें एक प्रेत जळत होतें त्यांतून विस्तव घेऊन पदरांत पीठ होतें त्यांच्या दोन भाकऱ्या करून खाल्ल्या! तिकडे श्रीमंतांचें लक्ष्य होतेंच. तेव्हां त्यास विचारलें कीं, 'तूं कोठून आलास?' तेव्हां त्यानें सांगितलें कीं, 'मी श्रीमंतांचे लष्कराबरोबर दक्षिणेंतून आलों. परंतु आज तीन दिवस झाले खावयास मिळालें नाहीं, म्हणून थोडें खाऊन घेतलें.' तेव्हां श्रीमंतांस वाटलें कीं, हा मुलगा मोठा साहसी आहे. पुढें छत्रसाल राजाकडून झांशी, जालवण, गुलसराई, काल्पी, व सागर हे प्रांत मिळाले. तेव्हां श्रीमंतांनीं १७३३ त गोविंदरावास सांगितलें कीं, 'तूं हे संभाळ.' तेव्हांपासून तो मोठा जहागीरदार झाला. त्याचे दोन मुलगे होते, त्यांनीं राज्य वांटून सागर व जालवण अशीं दोन राज्यें केलीं. हा गोविंदराव पानपतच्या फौजेस रसद पोंचवीत असतां मारला गेला. पुढें कऱ्हाडे ब्राह्मणांचीं राज्यें कोट रुपयांचीं झालीं.

२२६. कोंकणचे व गुजराथचे सुभेदार.

पूर्वी रामाजी महादेव चिवलकर हे सुभेदार होते. त्यांचेनंतर वेंकराजी केशव फडके ऊर्फ हसबनीस हे कोंकणचे सुभेदार झाले. त्यानंतर विसाजीपंत लेले, पुढें जिवाजी गोपाळ जोग, त्यावर दादा

गद्रे, त्यानंतर दादो हरि मराठे, नंतर बाजीराव बर्वे (१८०१), नंतर खंडेराव रास्ते, नंतर नरसिंगराव भावे, नंतर आन्याबा राहतेकर (१८०८), असे सुभेदार अनुक्रमानें झाले. आणि याचप्रमाणें अहमदाबादचे सुभेदार प्रथम भवानी शिवराम, नंतर हरि चिंतामण दीक्षित, त्यावर फत्तेपुरचे कुळकर्णी आबा शेलूकर, त्यानंतर गायकवाड आणि नंतर त्रिंबकजी डेंगळे वगैरे झाले.

२२७. हिंगणे यांचा वंश.

देवराव हिंगणे हे महादेवभट हिंगणे नासिककर यांचे पुत्र होत. हे मोठे मसलती असून दिल्लीस वकिलीवर होते. यांची दौलत व मिजास फार होती. तीन लाख रुपयांच्या तर त्यांचे पायांत खडाव असत व दररोज तीनशें रुपयांचा खर्च एकाचे खिचडीकडे होत असें ह्मणतात ! त्यांचे पुत्र दामोदर, त्यांचे गणेश, त्यांचे कृष्णराव आणि त्यांचे दत्तक पुत्र दामोदरराव ऊर्फ नानासाहेब, हे हल्ली आहेत. यांस सात हजारांचे गांव इनाम आहेत.

२२८. पाटणकर दीक्षित.

कायगांवकर दीक्षित यांचा मूळ पुरुष नारायण दीक्षित पाटणकर, शांडिल्यगोत्री, होता. त्यास श्रीमंत थोरले बाजीराव देवले यांनीं गुरु केलें होतें. त्यास वासुदेव व बाळकृष्ण असे दोन पुत्र होते. पैकीं वासुदेवास रामचंद्र व गोविंद असे दोन मुलगे होते. रामचंद्र याचे पुत्र जगन्नाथ व त्यांचे नारायण जगन्नाथ हे हल्ली आहेत. गोविंद याचे वासुदेव व त्यांचा अनंत वासुदेव गोविंद उर्फ दादासाहेब हे नुक्तेच (पौष शु० ७ शके १८०१ रोजी) शेंदुर्णीस वारले. त्यांचा अनंत दीक्षित हा आहे. यांची अर्धी वांटणी आहे. पैकीं नारायण जगन्नाथ यांस हिस्सा आहे. बालकृष्ण याचा लक्ष्मीनारायण. त्याचा बालकृष्ण व त्याचा यज्ञेश्वर असे होते. यांस खानदेशांत वरील शेंदुर्णी महालांतील २५ गांव इनाम आहेत. खेरीज गोदावरीतीरीं कायगांव हें इनाम आहे. हल्ली हैदराबादचे दरबारांत यांची चांगली चलन आहे.

२२९. तंजावरचें राजघराणें.

शाहाजी महाराज भोंसले हे विजापूरचे बादशाहाजवळ चाकरीस होते. यांचा धाकटा मुलगा व्यंकोजी होता. शाहाजी इ०स० १६६४ सालीं मेल्यावर तंजावरची जहागीर व्यंकोजीकडे आली व शिवाजी हा दक्षिणप्रांतीं राहिला. पुढें इ० स० १६८३ त विजापूर बुडालें. तेव्हां तंजावरचें संस्थान कर्नाटकच्या नबाबाच्या ताब्यांत आलें. व्यंकोजीचा पुत्र शाहाजी, त्याचा पुत्र सरफूजी, त्याचा पुत्र तुकोजी व त्याचा पुत्र बाबासाहेब. पुढें बाबासाहेब याचा व त्याचे भावाचा तंटा लागला ह्मणून त्यानें इ० स० १७४९ सालीं इंग्रजांची मदत मागितली. परंतु तें काम सिद्धीस गेलें नाहीं. त्या वेळीं इंग्रजांस देवीकोटचा किल्ला मात्र मिळाला. पुढें कर्नाटकचे नबाबाचा व तुळाजी महाराज यांचा तंटा लागला त्या वेळेस इंग्रजांनीं आपली फौज नबाबाचे मदतीस दिली. तुळजाजी हा सदरील बाबासाहेबांचा मुलीकडून पणतू होता. त्या मोहिमेंत सन १७७१ सालीं आठ लाख रुपये खंडणी, बत्तीस लाख रुपये खर्चाबद्दल व सोळा लाख रुपयांचा मुलूख अशी मिळकत तुळजाजीकडून नबाबास मिळाली. तरी पुढें तीन वर्षांनीं नबाबानें तुळजाजीस अगदींच पदभ्रष्ट केलें; ह्मणून शेवटीं सन १७७६ सालीं त्याचा पक्ष कंपनी सरकारानें घेऊन त्यास गादीवर कायम केलें. तेव्हां त्यानेंही कृतज्ञताबुद्धीनें कंपनीसरकारची फौज चाकरीस ठेवून त्याजबद्दलचे खर्चास नागोर वगैरे चार लाख रुपयांच्या वसुलाचे महाल कंपनीस दिले. पुढें इसवी सन १७८७ सालीं हैदर नाईकावर मोहीम करण्याचें ठरून त्या कामी कंपनी सरकारास नबाब व अमरसिंग महाराज (तुळजाजीचा मुलगा) हे अनुकूल होऊन त्यांनीं कंपनी सरकारास फौज बादविण्याकरितां पुष्कळ पैसा दिला. नबाबानें तंजावरची सर्व खंडणी कंपनी सरकारास लावून दिली व कंपनी सरकारही तंजावरचे कर्जास जामीन झालें. पुढें इ० स० १७९२ सालीं तुळजाजीचा दत्तक मुलगा सरफूजी यासीं कंपनी सरकारचा तह होऊन त्यांत असें ठरलें कीं, सरफूजीनें दरसाल अकरा लक्ष होन कंपनी सरकारास द्यावे. आणि ते न दिल्यास सर्व मुलूख

कंपनी सरकारानें सरफूजीपासून घेऊन राजकुलांतील बायकांच्या खर्चाची व कर्जाची मात्र वारासार करावी. पुढें इ० स० १७९८ सालीं तुळजाजीचा औरस मुलगा अमीरसिंग यास इंग्रजांनीं पदच्युत करून त्यास पंचवीस हजार होन पेन्शन करून दिलें. आणि त्या जागीं सरफूजीस गादीवर बसवून इंग्रजी कायदाप्रमाणें दिवाणी व वसूली काम चालावें व त्याचप्रमाणें सरफूजीनें खाजगी खर्चास एक लाख होन मात्र घ्यावे असें ठरलें. पुढें सरफूजी हा तारीख ७ मार्च सन १८३२ रोजीं वारला. तेव्हां कंपनी सरकारानें त्याचा मुलगा शिवाजी महाराज छत्रपति यास गादीवर बसविलें. परंतु पुढें तोही निपुत्रिकच वारला. त्यास एक कन्या होती. परंतु आजपर्यंत तंजावरचा मुलूख बहुधा खालसा होत होतच आला असल्यामुळें या वेळीं इंग्रज सरकारानें सर्वच संस्थान खालसा करून त्याचे मुलीस पेन्शन करून दिलें. त्या मुलीस इंग्रज सरकारांत 'प्रिन्सेस ऑफ् तंजोर' असें म्हणतात व तें पेन्शन तिला चालू आहे. तिच्या नवऱ्याचें नांव प्रिन्स कॉन्सर्ट राजा सखाराम चव्हाण असें आहे.

मराठी राज्यांतील किरकोळ माहिती.

२३०. मराठी राज्यांतील शिक्के.

मराठी राज्यांत प्रत्येक सरदाराजवळ व प्रधानाजवळ शिक्के असत. या प्रकारचे अनेक शिक्के पाहण्यांत आले. त्यांतून खालीं लिहिलेले उतरून घेतले आहेत. ते कित्येकांस त्यांचे जुनेपणावरून वगैरे चमत्कारिक वाटतील. कोणीं वाटोळे, कोणीं अष्टपैलू, कोणीं लंबवर्तुळाकार, कोणी चतुष्कोणी असे असे केले.

सन १८१५ सालीं त्रिंबकजी डेंगळा याजकडे गुजराथ सुभा होता. त्याचे सनदेवर जे शिक्के आहेत ते:—

श्रीमंत पंतप्रधानचरणीं तत्पर ।
मल्हारजीसुत त्रिंबकजी डेंगळे निरंतर ॥

वाईकर देशपांडे भवानीशंकर मोरेश्वर यांस पंत राजाज्ञा [illegible]

पदवी होती. आतां त्यांचे वंशास पंत असें म्हणतात. त्यांचा शिक्का येणेंप्रमाणें:—

श्रीभवानीशंकर प्रसन्न.
श्रीराजा शाहु छत्रपति स्वामीचरणीं तत्पर ।
भवानीशंकर मोरेश्वर निरंतर ॥

भवानीशंकर पंत यांचा मुलगा हैबतराव याचा शिक्का:—

श्रीभवानीशंकर प्रसन्न.
श्रीराजा शाहुचरणीं दृढभाव ।
भवानीशंकरसुत हैबतराव ॥

रतनसिंग जाधव मालेगांवकर यांचा शिक्का:—

श्रीशंभोरमरसिंहस्य सुवर्णपदपंकजम् ।
यादवस्य कुलोत्तंसो रत्नसिंहो विराजते ॥

फत्तेसिंग भोंसले अक्कलकोटकर यांचा शिक्का:—

श्रीशिवशंभुस्वामिनि शाहूभूपे च पार्थिवोत्तंसे ।
परिणतचेतोवृत्तेः फत्तेसिंहस्य मुद्रेयम् ॥

दुसरे फत्तेसिंग यांचा शिक्का:—

राजाशाहुछत्रपतिचरणीं तत्पर ।
फत्तेसिंग भोंसले राजकुमर ॥

राघोजी आंग्रे यांचा शिक्का:—

श्रीराजारामनृपचरणीं सादर ।
मानसिंहसुत राघो बजारतमाहा सरखेल निरंतर ॥

तुळाजी आंग्रे यांचा शिक्का:—

श्रीशाहुनृपहर्षेण सरखेलसमुन्नते ।
तुलसिंहस्य मुद्रेयं सर्वोत्कर्षेण राजते ॥

उदाजी चव्हाण, ज्यानें विजापूर मुक्काम राजाकरितां घेतला त्याचा शिक्का:—

श्रीराजाशाहुछत्रपतिस्वामीचरणीं तत्पर ।
उदाजी चव्हाण हिंमतबाहादर ममलकतमदार निरंतर ॥

त्र्यंबक कृष्ण, राजाचे देशमुखीचे वहिवाटदार यांचा शिक्का:—

श्रीराजाराममहिपालक ।
सेवक कृष्णसुत त्र्यंबक ॥

रघोजी भोंसले नागपुरकर यांजकडे पांडवगड किल्ला व कसबे देऊर वगैरे गांव सातारच्याजवळचे सरंजाम्यास होते, पुढें पांडवगड त्यांजकडून काढून रास्त्याकडे पेशव्यांनीं दिला. त्या रघोजीचा शिक्का:—

शाहुराजपदांभोजभ्रमरायितचेतसाम् ।
बिंबात्मजस्य मुद्रेयं राघवस्य विराजते ॥

सदर्हू रघोजीस चार पुत्र होते; जानोजी, साबाजी, मुधोजी व बिंबाजी. पैकी तिघांस वंश नाहीं. मुधोजी यास ३ पुत्र, रघोजी, भिमाजी व व्यंकाजी. पैकी व्यंकाजीचा मुलगा मुधोजी आपासाहेब यास सन १८१८ मध्यें सितावळदीचे लढाईत राज्यभ्रष्टता प्राप्त होऊन तो पळून गेला. आणि नंतर रघोजीचा मुलगा परसोजी हा गादीवर बसला. तो ता० ११ डिसेंबर सन १८५३ इसवी रोजी मेला. त्याचे राज्य सरकारानें घेतलें. त्याच्या राण्या, अन्नपूर्णाबाई, आनंदीबाई, दर्याबाई व कमळजाबाई ह्या आहेत. त्यांचा दत्तक मुलगा रघोजी हा सरासरी निर्वाह करून आहे. याप्रमाणें नागपूरचे वंशाची हकीकत आहे. बंडाचे सालीं यानें सरकारास मदत केली ह्मणून मौजे देऊर गांव जप्त केलें होतें, तें परत या मुलास दिलें.

प्रतिनिधीनें आपल्यास एक मुतालिक नेमला होता. त्याचा मुलगा गमाजी बावा. हा मोठा पराक्रमी होता. निजामाचा दिवाण विठ्ठल सुंदर याचा हा व्याही आणि पेशव्याशीं हा बिघडून विठ्ठल सुंदर याजकडे जाऊन तेथील फौज घेऊन प्रतिनिधीसहित पुण्यावर येत होता. त्याचा राक्षसभुवनच्या लढाईत माधवराव पेशवे यांनीं सन १७६२ सालीं पराभव केला. त्या लढाईत हे उभयतां व्याही मेले. त्या गमाजीचा शिक्का येणेंप्रमाणें. त्याचें नांव सदाशिव होतें:—

श्रीशाहुनृपतिस्तस्य यमाजीतनुजन्मनः ।
सदाशिवस्य मुद्रेयं तनुते सर्वमंगलम् ॥

हल्लीं सदाशिव याचे भावाच्या वंशांतील अंताजी नारायण मुतालीक कऱ्हाडास आहेत, त्यांचे तीर्थरूप नारायणराव अनंत याचा शिक्का:—

श्रीभवानी प्रसन्न.
श्रीराजाप्रतापसिंहछत्रपतिमहिपालक ।
तस्य नारायणराव अनंत आज्ञाधारक ॥

सातारकर राजे यांचा सरदेशमुखीचा शिक्का:—

स्वस्ति श्रीसुखदा मुद्रा प्रतापोत्कर्षवर्धिनी ।
सरदेशमुखस्यैषा शाहुराज्ञः सुराजते ॥

शामराव आबाजी कोरेगावचे मामलेदार यांचा शिक्का:—

मार्तंडचरणीं तत्पर ।
शामराव आबाजी निरंतर ॥

२३१. जुने किताब.

प्राचीनकालीं राजास, 'नरपति,' 'गजपति,' 'हयपति,' 'छत्रपति' अशा पदव्या असत. मानकरी सरदारांस 'नाईक' अशी पदवी असे. ब्राह्मणांत सावकारास हीच पदवी असे व सातारप्रांतीं 'राव' ह्मणून बारा मराठे व धनगर वांस पदव्या असत. अष्टप्रधानांस 'पंडित' असें ह्मणत.

२३२. प्रधान.

१ पेशवे	६ सेनापति
२ सचीव किंवा सुरणीस	७ पंडित
३ डबीर किंवा सुमंत	८ न्यायाधीश
४ आमात्य किंवा मुजुमदार	९ प्रतिनिधि
५ मंत्री किंवा वाकनीस	१० राजाज्ञा

२३३. बारा राव.

पेशवे सरकारचे हुजुरातींत धनगर मंडळी फार असे त्यांस बारा राव ह्मणत. त्यांचे गांव तर्फे नीरथडीस आहेत, त्यांचा तपशील:—

रावांचीं नांवें.	गांवांचीं नांवें.
१ अडळराव.	... मौजे अहिरें.
२ अभंगराव.	... मौजे दरूली.
३ झुंजारराव.	... मौजे वाघोशी.
४ परमाळराव	... मौजे अंदोरी.
५ प्रचंडराव.	... मौजे पिंपरेखुर्द.
६ रविराव.	... मौजे कोपरडें.

७ भालेराव. मौजे खेडपुडुक.
८ गंभीरराव. मौजे सुखेड.
९ सर्जेराव. मौजे पाडळी.
१० शृंगारराव.... मौजे बोरी.
११ अंकुशराव मौजे पाडेगांव.
१२ विश्वासराव... मौजे मोरवें.

यांशिवाय नगर प्रांतीचे वणजारी लोकही होते; ते अद्यापि ग्वाल्हेरीस जनरल बापू आव्हाड वगैरे सरदार आहेत. मराठे व धनगर हे मेलेलें मनुष्य जाळतात व त्याजवर छत्र्या (समाधि) बांधतात. सदरील सर्व गांवीं छत्र्या पाहण्यांत येतात. त्याचप्रमाणें वानवडीस महादजी शिंद्यांची व खडकीस मल्हारराव होळकरांची छत्री आहे.

२३४. दरकदार.

१ फडणवीस
२ पोतनीस
३ चिटणीस
४ बक्षी

२३५. सरदार.

१ सेनाकर्ते
२ सरलष्कर
३ सरखेल
४ अलीजा बहादूर
५ राजे बहादूर
६ सेनासाहेब सुभा
७ समशेर बहादूर
८ उमदे तुल्मुल्क बहादूर
९ सेना खासखेल
१० सुभेदार
११ सरसुभेदार

२३६. मराठींतील किताब.

मराठी राज्यांत मोठ्या लोकांस किताब देत, ते येणेंप्रमाणें:—

१ नागपूरकर भोंसले–सेना साहेब सुभा.
२ आंग्रे–वजारतमाहा सरखेल.
३ शिंदे–अलिजा बहादूर.
४ नारो शंकर–राजे बहादूर.
५ सुरापूरकर नाईक–बहिरी बहादूर.

६ कंपनी–इंग्रज बहादूर.
७ टिपू–सुलतान बहादूर.
८ गायकवाड–सेना खासखेल समशेर बहादूर.
९ घोरपडे–सेना धुरंधर.
१० वाडीकर सावंत–राजे सावंत बहादूर.
११ विंचूरकर–उमदे तुल्मुल्क बहादूर.
१२ अष्टप्रधान–पंडित.

२३७. दाभाडे गुजराथेंत कसे शिरले ?

खंडोजी दाभाडे सेनापति हे गुजराथेंत चौथ घेण्यास ह्मणून शिरले, ते सोनगड व दाहोद या रानांत राहून स्वारांचीं ठाणीं ठेवून गांवावर धाड्या करून हल्ले करून वसूल घेत. त्यावेळेस मुसलमान आपसांत कडत यामुळें मराठ्यांस फार सोय पडली.

२३८. सिदोजीराव निंबाळकर.

कोल्हापूरचे राजवाड्यांत एक वेळ निपाणकर भेटीस जात असतां वरील चौकांत तेथील राजानें वाघ सोडून दिला होता. इतक्यांत सिदोजीराव निंबाळकर सरदेसाई सरलष्कर यांची स्वारी आली. तीं पुढें लोक होते त्यांनीं सांगितलें कीं, 'आंत वाघ आहे.' तेव्हां निपाणकर बोलले कीं, 'मी आतां मागें फिरावयाचा नाहीं.' असें ह्मणून ते आंत शिरले; तों वाघ अंगावर येतो असें पाहून त्यांनीं त्याचे पुढील पाय धरून त्यास उभें केलें व इतक्यांत मागील लोकांनीं तरवारीनें त्यास तोडिलें. मग निंबाळकर जाऊन राजास भेटले! याच मनुष्यानें कोल्हापूरकर महाराजांची मुलगी मागितली होती. परंतु ती त्यांनीं दिली नाहीं ह्मणून निपाणकरांनीं कोल्हापूर घेऊन अखरदस्तीनें मुलीशीं लग्न लाविलें. असा हा उग्रकर्मा मनुष्य होता.

२३९. दुष्ट मंडळी.

मागील कारकीर्दीत अत्यंत दुष्ट झाले त्यांत नामांकित, हरिद्वाराजवळील फत्तरगड येथील राहणार पठाण गुलाम कादर, जो दिल्लीस पठाण झाला होता; व ज्यानें बादशाहाचे डोळे काढिले; ज्यास महा-

दजी शिंदे पाटीलबुवा यांनीं धरून ठार मारिला, व बादशहास त्याचे हालांतून सोडवून बादशाहापासून गोवध बंद करण्याची सनद घेतली; तो रोहिला हा एक दुष्ट. दुसरा दुष्ट सर्जेराव सखाराम घाटगे, बाइजाबाईचा बाप, ज्यानें पुणें व नगर येथील हजारों माणसें विनाकारण मारिलीं व इंदूर लुटलें तो होय. तिसरा दुष्ट सिदोजीराव आपा देसाई निपाणकर, जो निंबाळकर निपाणकर सरलष्कर नांवानें बाजीरावाजवळ होता तोच. चवथा दुष्ट हरीपंत भावे, यशवंतराव होळकर यांचा सरदार, ज्यानें हरनाथ व अमीरखान पेंढारी या आपल्या सेनांनी मदत घेऊन पुणें लुटलें तो होय. पांचवा परशुरामपंत प्रतिनिधि, ज्यास थोटा ह्मणतात तो. या प्रतिमेचे दुष्ट पुरुष पूर्वी कधीं झाले नाहींत व पुढें होणारही नाहींत अशा यांच्या कृति होत्या.

२४०. दुष्ट व चांगल्या स्त्रिया.

स्त्रियांमध्यें अहिल्याबाई होळकरणीसारखी धार्मिक स्त्री कधींही झाली नाहीं व पुढेंही होणार नाहीं; आनंदीबाईसारखी दुष्ट स्त्री पुढें कधीं होणार नाहीं, व पूर्वी कधींही झाली नाहीं ! दादासाहेब मेल्यावर हिला कांहीं दिवसपर्यंत आनंदवल्ली ह्मणून नाशकाजवळ गांव आहे तेथें कैदेंत ठेविली होती. बाइजाबाईसारखी क्रूर स्त्री झाली नाहीं; झांशीवालीबाईसारखी शूर स्त्री झाली नाहीं; आणि थोरले माधवरावांची पत्नी रमाबाई इजसारखी पतिव्रता कोणी झाली नाहीं.

२४१. चांगले राजे.

उज्जनीस विक्रम राजा झाला; त्याची परोपकाराबद्दल फार प्रसिद्धि आहे, परदुःखभंजनाबद्दल त्यानें मोठमोठीं धाडसी कृत्यें केलीं. त्याचे पुढें राजा भोज ह्मणून धारेस झाला; तो विद्वानांस उत्तेजन देण्याबद्दल प्रसिद्ध आहे. सिद्धराज जयसिंग ह्मणून पाटणचा राजा होता; हा इमारती बांधण्याबद्दल मोठा प्रसिद्ध आहे. शिवाजी राजे भोंसले हे किले बांधण्याबद्दल प्रसिद्ध आहेत. तोडरमल व मलिकंबर हे जमिनीवर यथान्याय सारे ठरविण्याबद्दल प्रसिद्ध आहेत. अकबर बादशाह हा हिंदु लोकांस चांगले रीतीनें वागविण्याबद्दल प्रसिद्ध आहे. इतकेंच नव्हे तर, जें मोठमोठ्या विद्वानांस आज माहीत

जलें आहे तें त्यास पूर्वीच कळलें होतें. ह्मणजे, सती बंद करण्याबद्दल त्यानें हुकूम दिला होता व गोवध बंद करण्याबद्दल त्यानें फरमान दिला होता. जाणतीं मुलें झाल्याखेरीज लग्न करूं नये असाही ठराव प्रथम त्यानेंच केला. त्याचप्रमाणें विधवांनीं पुनर्विवाह करण्याबद्दल उत्तेजन दिलें, हिंदु व मुसलमान यांचा आप्तपणा केला, स्वधर्मास व हिंदुधर्मास सारखें मानिलें, आणि जिंकलेले लोकांवर विश्वास ठेवून त्यांस मोठ्या पदव्या व सरदाऱ्या दिल्या, अशी त्याची प्रख्याति आहे.

२४२. जातीस जात वाढविते.

गायकवाडांचे दौलतींत परभू फार असत, याचें कारण रावजी आपाजी हे परभू दिवाण होते. शिंद्यांचे दौलतींत शेणवी फार असत; जिवबा बक्षी वगैरे सर्व शेणवी होते. पुण्याचे दौलतींत कोंकणस्थ ब्राह्मण फार असत; व नागपूरचे दौलतींत देशस्थ फार असत असें ह्मणतात. एक जातीचा मनुष्य मोठेपणा पावला ह्मणजे त्याचे अनुसंगानें त्यांची जातही वाढते, हा साधारण नियम आहे.

२४३. शाश्वत आणि अशाश्वत अधिकारी.

'बुडाली पाटीलकी देशमुखाची, व बुडालें कुळकर्ण देशपांड्याचें' अशी एक ह्मण आहे. पाटील, कुळकर्णी, देशमुख, देशपांडे यांस शाश्वत अधिकारी ह्मणतात आणि सुभेदार व मामलेदार यांस अशाश्वत अधिकारी ह्मणतात. या वतनाची प्रतिष्ठा पुरातन काळापासून या देशांत इतकी मोठी गणली होती कीं, महादजी शिंदे दहा कोट रुपयांचे राज्याचे मालक होते तरी, ते दक्षिणेंत पाटिलकीच्या विकत होते. आणि लोकांनीं आपल्यास 'पाटीलबोवा' ह्मणावें ही त्यांस मोठी हौस असे ! तसेंच, शाहू महाराज हे आपल्यास सरदेशमुख ह्मणवीत असत. याचें कारण, पूर्वीचे सरकारांत जमीदाराची योग्यता फार मोठी होती. महालचा सर्व कारभार देशमुखाचे घरीं व गांवच्या पाटिलाचे घरीं चालत असे; कर, सारा, पंचाइती हीं सर्व त्यांचे मार्फत होत असत. सरकार, जमाबंदी करणें तरी त्यांचे मार्फत करीत असत. तेव्हां अशी ह्मण होती कीं, 'गांव करी तें राव न करी,'

म्हणजे राजाचा देखील त्यांजवर हुकूम नसे. गांवकरी हेच आपल्या जमिनीचे धनी असत. दुसरे गांवानें शींव दाबली तर त्या परस्परांत मोठे तंटे पडत व लढाया होत; तेव्हां गांवचे दहाजण अधिकारी मिळून ते तंटे तोडीत. बलुते व अलुते हे त्यांची चाकरी करीत. याप्रमाणें गांव हें स्वतंत्र राज्य असे. ते सरकारास खंडणी मात्र देत. पुढें कालेंकरून हें स्वातंत्र्य नष्ट झालें!

२४४. राज्यांचें मूळ.

बहुत राज्यांचें मूळ चोर व लुटारू यांजमध्येंच आहे. म्हणजे लुटारू लोक हे प्रथम लुटी करतात व त्यांत विजयी झाले म्हणजे पुढें होतां होतां राजे बनतात! हा इतिहास बहुतेक राज्यांना आहे.

२४५. बंडखोर लोक.

दक्षिणेंत रामोशी, भिल्ल, कोळी वगैरे लुटारू लोक आहेत तसे गुजराथेंतही कोळी आहेत. तिकडे इंग्रजी अमलांत गेंडाळ कासव्या हा जमात जमवून लूट करूं लागला तेव्हां त्यास मेजर फुल जेम्स यांणी मारिलें. तसाच तिकडे दुसरा एक जोबन वर्तोळिया नांवाचा मनुष्य असून तोही लूट करीत असे. परंतु वर्तोळास स्वामीनारायण जाऊन त्यांनीं त्यास उपदेशानें सुधारलें व त्याजकडून चोरटेपण सोडविला. दक्षणेंत उमाजीनें बंड केलें म्हणून त्यास १८३२ सालीं फांशी दिलें. त्याचप्रमाणें भागूजी, राघो भांगरे वगैरे यांणीं उपद्रव केला होता, परंतु त्यांचीही तीच गति झाली. आणि नुकतेच (१८७९ सालीं) हरी मकाजी रामोशी व वासुदेव बळवंत फडके हे दोघे बंडखोर, अनुक्रमें मारले व काळ्या पाण्यावर पाठविले!

२४६. प्रांताचे भाग.

प्रांतांत तर्फा असतात व तर्फेत मौजे असून एखादा कसबाही असतो. ज्या गांवची सीमा बारा गांवांस जोडलेली असते किंवा ज्या गांवीं बाजार असतो किंवा ज्या गांवास बारा बलुते व अलुते असतात अथवा ज्या गांवीं जमीदारांचें रहाणें असतें त्यास कसबा म्हणतात.

२४७. पेंढारी.

दिल्लीचे राज्याची मोडकळा आली व अमीर उमराव सर्व मूर्ख व जुलमी होऊन आपसांत फूट झाली, तेव्हां त्यांची अशक्तता पाहून यांच्या प्रदेशाचे तुकडे संपादन करण्याकरितां सभोंवतालचे राजे प्रयत्नास लागले. त्यांत काबूलचे पठाण, जाट, शीक, मराठे, व इंग्रज हे सर्वच होते. काबूलचे पठाणांनीं काबूल बळकाविलें; अहमदशाह अबदल्ली यानें पानपतावर लढाई देऊन अफगाणिस्तान आटपलें व तो दिल्लीचे बादशाहास मानीनासा झाला; शीख लोकांनीं पंजाब घेतला; मराठ्यांनीं दक्षिण व माळवा त्याप्रमाणें उत्तर हिंदुस्थानापर्यंत बळकाविलें; आणि इंग्रजांनीं बंगाल घेतला. पुढें हळू हळू बाकीचीं राज्यें सर्व इंग्रजांचे हातीं येऊन ते सार्वभौम पद पावले. तरी दक्षणचें राज्य पेशव्यांचे हातींच होतें. पुढें त्यांतही अंदाधुंदी फार होऊन शेदे होळकर आपसांत भांडूं लागले व पेंढारी यांनीं मनस्वी दंगा माजविला. घरें, हे पेंढारी कोण याचा विचार केला तरी त्यांत एकच जात नव्हती. ब्राह्मण, परभू, मराठे, रामोशी, भील, कोळी, मुसलमान, वगैरे सर्व जातींचे लोक लहान लहान टोळ्या करून लुटण्याचा क्रम चालवीत. एकेका पेंढाऱ्याजवळ पांच पांच हजार फौज असे. त्याशिवाय कोणाजवळ शंभर दोनशेही असे. त्यांचीं घोडीं फार जलद चालत. त्यांनीं नेहमीं गांवें व रस्ते लुटावे. तशांत शेदे, होळकर हे त्यांस आश्रय देत म्हणून तर ते सर्व मुलुखभर फिरत. कोंकणांत, देशांत, माळव्यांत वगैरे ठिकाणीं त्यांचा फार उपद्रव असे. त्यांनीं अनेक प्रकारचे जुलूम करावे. याचप्रमाणें कर्नाटकांतही काही, पुंड व पाळेगार यांचाही पेंढाऱ्यांसारखाच जुलूम चालत असे. ते एखाद दुसऱ्या वाटसरांस लुटीत येवढेंच नाहीं तर ते लमाणसारख्या मोठाल्या कार्यांकरितां जात असलेल्या मोठ्या समाजाच्या बऱ्हाड्यांसही लूटून फस्त करीत! हे इतके दुष्ट होते कीं, ते वाटसरास आधीं मारीत आणि मग त्याजवळ कांहीं सांपडलें तर शोधीत! या लुटाऱ्यांस कोणी विचारता नसे. उलटें राजे व राजांचे अधिकारी हे या चोरांपाशीं आपले हिशाचा ठराव करून त्यांस मदत देत! असा क्रम नाना फड-

णवीस गेल्यापासून बाजीराव जाईपर्यंत चालला होता. त्यांचा निःपात करण्याकरितां जनरल माल्कम साहेब जे पूर्वी लॉर्ड लेक साहेबाजवळ आडिक्यांप होते त्यांस नेमिलें. तेव्हां त्यांनी मोठी फौज व रिसाले जमवून त्या पेंढाऱ्यांचा पाठलाग करून त्यांस नाहींसें केलें. या पेंढाऱ्यांसारखाच दुसरा एक उपद्रव होता तो हा कीं, कित्येक गोसाव्यांच्या हत्यारबंद झुंडी देशभर फिरत असत. ते गांवोगांव लूट करीत नसत, पण दर गांवीं सिधा घेत व तो सिधा त्या गांवच्या लोकांस देणें भाग पडे ! परंतु त्या झुंडीही इंग्रजी अमलांत बंद झाल्या.

२४८. जुलूम.

पूर्वी उंच जातीचे लोकांचा जुलूम नीच जातीचे लोकांवर फार असे; तो आतां नाहींसा होऊन ज्याप्रमाणें वाघ व बकरीं एके ठिकाणीं पाणी पिऊं लागावीं तसेच नीच जातीचे लोक एके ठिकाणीं सारख्या न्यायानें राहूं लागले आहेत. एक वेळ निपाणकर यांच्या घोड्याचे अंगावर मळ दिसला म्हणून त्यांनी खासदारास फटके मारण्याचा हुकूम केला व तो बिचारा त्या मारानें प्राणास मुकला! कनोजचा एक क्षत्रिय ठाकूर होता, त्याचे आबदारानें विड्यांस अधिक चुना लाविल्यामुळें त्याचे तोंडास फोड आले, म्हणून बचकभर चुना आणून तो आबदारापुढें तरवार काढून उभा राहिला आणि त्याजकडून तो खावविला; व तेणेंकरून तो मरण पावला! याप्रमाणें पूर्वी अंदाधुंदी होती. जबरदस्तीनें कोणीं कांहीं केलें तरी त्यास कोणी कांहीं बोलत नसे. हल्लीं झुलू लोकांची वगैरे नीति याप्रमाणेंच आहे. यावरून ज्यांस शास्ता कोणी नाहीं त्यांची स्थिति अशीच असते.

२४९. पुणें.

शाहू महाराज मेल्यावर बाळाजी बाजीराव पंतप्रधान हे राजमंडळ मोडून पुणें मुक्कामीं आले तेव्हांपासून पुण्याची भरभराट चालली. त्यापूर्वी ३० वर्षे म्हणजे १७२० सालीं बाजीराव पेशवे यांनी पुण्याचे तळावर नदीचे कांठीं शनवारचा वाडा बांधून त्यांत ते कधीं कधीं राहात होते इतकेंच. त्याचप्रमाणें पुण्याभोंवते कुरणाचे गांवीं मराठे शिलेदार आपले घोडे चारून तयार करीत, व सरकारी पागाही तेथें

राहून दसऱ्यास बाहेर पडण्याकरितां तयार करीत. परंतु पुढें सदरप्रमाणें बाळाजी बाजीराव पुण्यांत वस्ती करून राहूं लागल्यापासून खराव प्रांतांतील शिलेदार व सरदार सर्जेराव, घोरपडे, नाईक, निंबाळकर, मावळ प्रांतचे मावळेमोकाशी, नीरवडीचे बारा राव धनगर मंडळी, नगराकडील वणजारी, शिलेदार, खानदेशाकडील कदम बांडे, सोलापुराकडील पांडरे, पुण्यानजीकचे वाघोलीकर जाधव, पुणेंकर पंवार, तळेगांवकर दाभाडे, पश्चिमेकडील तळेगांवचे दाभाडे सेनापति, जगताप बापर, कोंकणचे मोहिते, गुजर, शिरके, खानवेलकर, माणकर, सावंत, आंग्रे, आरमाराकडील धुळप वगैरे सरदार ही मंडळी तेथें येऊन राहूं लागली. त्या सरदारांचें लक्ष्य पुढील स्वारीवर असे. त्यांस महिन्याचे महिन्यास पगार मिळत नव्हता; परंतु जहागीर गांवें, इनाम गांवें, नक्त नेमणुका व तैनाती वगैरे असत. त्यांचा बारा महिन्यांनीं हिशेब होऊन कांपड आंख, नालबंदी व कांहीं रोख मिळून जमजूत करीत व कधीं कधीं बाक्याही पुष्कळ रहात. हशम, गडकरी, किल्लेदार व सरनोबत वगैरे हे मराठे असत. कारखानीस, पोतनीस, चिटणीस वगैरे परभू असत. फड म्हणून एक मोठें आफीस असे, त्यांत कारकून लोक (मुत्सद्दी) लिहीत व त्यांस दरक, वकिल्या, दुमेदाऱ्या, फुट मामलती वगैरे मिळत. सरदारांमधें दोन तर्फा असत; कांहीं हिंदुस्थानचे व कांहीं कर्नाटकचे. रास्ते, पटवर्धन, प्रतिनिधि, अक्कलकोटकर, त्रिंबकराव मामा पेठे हे कर्नाटकचे सरदार; आणि राजे बहादर, पानसे, विंचूरकर, चिंतो विठ्ठल रायरीकर, आणि ताजी माणकेश्वर वगैरे हिंदुस्थानचे सरदार. हे सर्व पेशव्यांचे हुजमांत चालून एकमतानें वागत. याप्रमाणें ही सर्व व्यवस्था खर्ड्याच्या लढाईपर्यंत चालली; पुढें नाना फडणीस वगैरे मेले व या

१. कापड आंख म्हणजे कापड १० रुपयांचें असून खाबर सरकारी ५० रुपयांचा आंख पडला म्हणजे तीच खाची किंमत झाली असें करीत.

२. हल्लीं जसे मिलिटरी आणि सिव्हिलिअन असे दोन वर्ग आहेत, तसे जुने मराठीशाहींत शिलेदार व मुत्सद्दी असे दोन वर्ग असत. शिलेदार म्हणजे तरवारबहादूर आणि मुत्सद्दी म्हणजे लेखकाचें काम करणारे.

मराठ्यांच्या भव्य दर्यास आटोपील असा कोणी राहिला नाहीं. बाजीरावानें सर्वांशीं द्वेष केला याजमुळें सर्व सरदार फुटले आणि एकामेकांशीं लढूं लागले व त्यामुळें पेंढारी माजले, मुलूख उजाड झाला आणि रयत त्रासून परदेशीय राजाची इच्छा सर्वांस वाटूं लागली!

२५०. राजगड व रायगड.

सातार्‍यास शाहूराजा राज्य करीत असे म्हणून त्यास शाहूनगर असेंही ह्मणतात. परंतु शिवाजीचें सिंहासन राजगड येथें असून तेथून तो राज्यकारभार करीत असे. शिवाजी हा संकटकाळीं कोंकणांत रायगडास जाऊन राहत असे. व तेव्हांपासून ती जागा छत्रपत्याची झाली आहे. नानाफडणीसही संकटकाळीं पुण्याहून पळाले ते रायगडींच आले. व त्याचप्रमाणें होळकरीचे वेळेस बाजीराव पळाले तेही रायगडावरच लपून बसले होते.

२५१. काळी फौज.

हिंदुस्थानांत येऊन फरांशिस (फ्रेंच) व इंग्रज यांनीं मद्रासेस व पुंडचरीस दुकानें घातलीं. पुढें येथील राजांमध्यें भांडणें होऊन फौजेची मदत मागण्याकरितां ते यांजकडे येऊं लागले. हिंदुस्थानचे राजे ह्मणजे केवळ बालकांसारखे होत. त्यांस जसा खेळविणारा भेटेल तसे ते खेळणार! प्रथम त्रावणकोरचे राज्यांमध्यें भांडण होऊन ते इंग्रजांपाशीं मदत मागूं लागले. एकानें मदत देण्यास अनमान केल्यास दुसर्‍याकडे जातों असें ह्मणत. याचा मासला हल्लीं काबूल कंदाहारास आहे. अब्दुल रेहमान हा एकदां रूसाकडे जाण्याचा बेत घालितो व दुसर्‍यानें इंग्रजांस मिळण्याचा आव घालितो, त्याचप्रमाणें फरांशिस यांचें राष्ट्र हिंदुस्थानांत कायम होतें तोंपर्यंत चालत असे. पुढें या राजांस फौजा कोठून द्याव्या असा विचार पडला. कारण विलायतेहून फौजा आणावयास खर्च फार पडतो, आणि इकडे जे युरोपिअन लोक आले होते ते कांहीं बादशाह नव्हते, तर कंपनीचे परवानगीनें सावकार लोकांचे गुमास्ते ह्मणून आले होते. तेव्हां बहुत दिवस हा विचार पडला होता. आणि युरोपांत स्वदेशाभिमानी स्वदेशीय लोक परदेशाचे हिताकरितां लढत नाहींत अशी

आहे; त्या धोरणावरून इंग्रज व फरांशिस लोकांस असें वाटे कीं, या देशांत जरी पुष्कळ लोक आहेत; तरी ते आह्मांकरितां आपल्या राजांशीं कसे लढतील? या अंदेशांतच त्यांचीं कितीएक वर्षें गेलीं. पुढें फरांशिसांनीं असें ठरविलें कीं, पांचशें काळे लोक ठेवून ते स्वदेशीयांशीं लढतात कीं नाहीं हें पाहावें. आणि त्याप्रमाणें एक पलटण ठेवून तीस कवाईत शिकवून तयार केलें, आणि एका राजास मदतीस दिलें. तेव्हां त्यांनीं परकीय लोकांप्रमाणें त्या राजाच्या शत्रूशीं लढाई दिली. तेव्हां त्यांचे असें ध्यानांत आलें कीं, हिंदुस्थानांतील लोकांस स्वदेश व परदेश ही समजूत मुळींच नाहीं; व स्वदेशीय लोकांशीं लढूं नये हा धर्म त्यांचे मनांतही नाहीं! त्यांस जो पोटास देईल त्याजकरितां ते लढतील. जो ज्याचें खातो त्याचें वेळेवर ऐकत नाहीं तर, त्यास निमकहराम ह्मणतात. त्यांस पोटास दिलें ह्मणजे ते आपला बाप असला तरी त्याजवर बंदूक उचलण्यास मागें पाहणार नाहींत! ही गोष्ट जेव्हां फुटली तेव्हां फरांशिस लोकांनीं सर्वत्र असें वर्तमान प्रसिद्ध केलें कीं, हिंदूंची फौज हिंदूंशीं लढण्यास कांहीं एक संकोच करीत नाहीं. याजकरितां हिंदूंचीं पलटणें ठेवावीं. त्यानंतर नेटिव्ह आर्मी जमत चालली. फरांशिसांचा हा शोध पाहून इंग्रजांनींही तशीं पलटणें जमविण्याचें सुरू केलें. याप्रमाणें जमत जमत फार मोठी काळी फौज उभी राहिली. कर्नाटक, कोंकण, व हिंदुस्थान येथील चांगले चांगले लोक पाहून ठेवून त्यांस पगार देऊं लागला कीं, ते आपले देशांतील राजांचा नाश करण्यास मागें घेत नव्हते. आणि याच फौजेनें फरांशिस व इंग्रज यांचें मोठें राज्य स्थापन केलें. याप्रमाणें काळ्या फौजेचा इतिहास आहे.

२५२. लोकांचा अभिमान आणि शौर्य.

लोक जेव्हां देशाभिमानी किंवा धर्माभिमानी असून लढतात, तेव्हां एक मनुष्य असला तरी तो शंभरांशीं लढतो. पूर्वी रामायणांत असें प्रसिद्ध आहे कीं, कर्णे ह्मणजे डोकीं कापलेलीं धडें ही आपल्या पूर्वावेशानें लढत. मुसलमान लोकही पूर्वी याप्रमाणेंच धर्माभिमानानें लढत. त्यांचा धर्माभिमान इतका दृढ होता कीं, त्यांच्या

मधील एक मुसलमानास मी एकटा व शत्रु शंभर असें कधीच वाटले नाही. धर्मकारितां लढणें व मरणें हेंच आपलें कर्तव्यकर्म असें समजून ते लोक समरास प्रवृत्त होत. अद्यापि जे ठिकठिकाणीं मुसलमानी पीर आहेत त्यांची कथा अशी सांगतात की, ते लढत असतां त्यांची डोकीं उडालीं तरी ते तसेच लढत लढत चार चार कोस येऊन तेथें पडले! याप्रमाणें वाई प्रांतीं मौजे केंजळ येथें एक व चांदवड येथें साजापीर असे पीर असून त्यांच्या विलक्षण कृत्यांच्या याप्रमाणें अनेक ठिकाणीं कथा आहेत. पूर्वावेशानें शिरच्छेद झाल्यानंतर कबंधाकडून अघटित कृत्य घडल्याचें एक आलीकडील उदाहरण आहे:— परशरामभाऊ पटवर्धन यांचे कारकीर्दीत मिरजेस एका रामोशी दरोडखोरास शिरच्छेदाची शिक्षा झाली. तेव्हां जलाद (शिरच्छेद करणारा मांग) हातांत तरवार घेऊन त्याजवळ गेला आणि त्यानें शिरच्छेद करण्यापूर्वी त्याचे कानांत असलेली मोत्यांची भिकबाळी त्याजवळ मागितली. परंतु रामोशानें ती त्यास देण्याचें नाकारून भिकबाळी तोडून घेऊन तोंडांत टाकिली आणि गिळून जाऊन मांगास 'एका वारानेंच शिरच्छेद कर' असें सांगितलें. त्या रामोशानें जटा वाढविल्या असून या शेवटच्या वेळीं तो आपल्या जटा हातांत धरून मांगास वार करण्यास सांगत होता. इतक्यांत जलादानें एका वारासरसें त्याचें मस्तक उडविलें. परंतु रामोशानें मेल्यावरही शिरच्छेद करणारास शिक्षा करण्याचा निश्चय केला असल्यामुळें धडापासून शिर तुटल्याबरोबर तेंच शिर गरगर फिरवून त्या मांगास मारिलें व धड खालीं पडलें; आणि त्या टोल्यासरसा मांगही धायतळ येऊन खालीं पडला व गतप्राण झाला! परंतु हल्लीं त्यांचा अभिमान अगदीं जाऊन संकटकाळीं ते पळूं लागले. परंतु हल्लीं इंग्रजलोकांत मात्र हा अभिमान असून त्यांची राज्यप्रसाराची लालसा व स्वोत्कर्षाभिमान ही फार वाढलीं म्हणून पुणें, कानपूर, लखनौ व काबूल वगैरे ठिकाणीं दोन दोनशें माणसांनीं दहा दहा हजार माणसांशीं टेंकीनें लढून आपलें रक्षण केलें व राज्याचे पायें मजबूत केले!

२५३. सोदेगिरी.

राजे वाईट झाले म्हणजे त्यांच्या संगतीनें प्रजा बिघडते. याप्रमाणेंच दिल्लीस गर्दी होऊन कोणाचा जोडा कोणाचे पायीं नाहीं अशी जेव्हां स्थिति झाली तेव्हांचे दिल्लीचे सोदे प्रसिद्ध आहेत. परंतु तेथें जशी दुर्दशा झाली तशी तेथून सोदेगिरी उडाली. ती बाजीराव यांच्या कारकीर्दीत पुण्यास आली. पुढें तेथून लखनौस गेली. तें राज्य बुडाल्यावर तिनें बडोद्यास मुकाम केला. परंतु तेंही स्वतंत्र राजकारण संपल्यावर आतां तेथून तिनें आपलें बिऱ्हाड आटपलें.

२५४. गड.

हिंदुस्थान देशांत उत्तरेकडे व दक्षिणेंत डोंगर फार असून ते सोईवार असल्यामुळें डोंगरी किल्ले फार आहेत व त्यांशिवाय भुईकोट किल्लेही आहेत. त्यांपैकीं कित्येकांचीं नांवें:—सातारचा किल्ला, मकरंदगड, नांदगिरी ऊर्फ कल्याणगड, कमलगड, भूषणगड, पांडवगड, संतोषगड, सदाशिवगड, जंगली जयगड, प्रतापगड, साखरगड, किल्ले मोरगिरी ऊर्फ गुणवंतगड, प्रचीतगड, राजगड, रायगड, प्रचंडगड, वारूगड, वितंडगड, विशालगड, बहिरवगड, भगवंतगड, मल्लिंद्रगड, वसंतगड, चंदन, चंदन, केंजळा, महिमानगड. वर्धनगड, व्याघ्र, परळी ऊर्फ सज्जनगड, मनमोहनगड, सुंदरगड, महिमंडण, महिपत, वैराट, रोहिडा, विचित्र, विजय, चंद्र, मंडण, सुपेणगड, गंभीरगड, अवचित, माहुली, मंगल, पन्हाळ, चांदवड, हर्ष, हरिश्चंद्र, तारागड, नारगड, त्रिवक, आंवडा, पटा, अरनाळा, कर्नाळा, मंगलगड, धाळनेर, मांडव, अशीरगड, पावागड, राघव, पुरंदर, सिवनेरी, देवगड, वगैरे. भुईकोट:— चाकण, आग्रा, प्रयाग, मिरज, मालेगांव, अहमदाबाद, विजापूर वगैरे. समुद्राचे किनाऱ्यास:—कुलाबा, खांदिरी, उंदेरी, रत्नागिरी, ठाणें, आरनाळा, मालवण, विजयदुर्ग, सुवर्णदुर्ग, रेवदंडा, जंजिरा, वगैरे.

२५५. तोतये.

नाना फडणिसांचे वेळेस पाणिपतांतील भाऊसाहेब म्हणून एका मनुष्यानें वेष घेऊन तोतया केला. त्याची भूल इतकी बाहली की, त्यास बहुत लोक सामील झाले व तो भाऊसाहेब म्हणून बहुत माही-

तगारीच्या गोष्टी सांगे. परंतु नानांची खातरी होती कीं, हा मनुष्य खोटा आहे. पुढें त्यांस आंग्रे यांनी कोंकणांत धरून पुण्यास पाठविलें. तेथें नाना व महादजी शिंदे यांनीं ठराव करून त्यास मरणाची शिक्षा दिली. इंग्रजी अम्मल झाल्यावर सवाई माधवरावांची बायको यशोदाबाई झणून एक बाई प्रगट होऊन तिनें सरकारांत कलकत्त्यापर्यंत अर्ज्या व फिर्यादी केल्या. ही बाई कितीएक दिवसपर्यंत पुण्यास असून खणआळींत रामाचे देवळांत राहात असे. शहाजी महाराज यांचा बाप राजे चतरसिंग झणून एक मनुष्य प्रगट झाला होता. त्याची चौकशी होऊन तो खोटा ठरला आणि त्यास इंग्रज सरकारानें पन्नास रुपये पेन्शन देऊन कैदेत ठेविलें होतें. चतरसिंग यानें १८०२ सालीं बाजीरावावर बंड केलें होतें. त्यानंतर परशुराम भाऊंनीं सातारा घेतला तेव्हां जो चतरसिंग पळून गेला, तोच मी झणून हा पुढें इंग्रजी झाल्यावर प्रगट झाला. परंतु त्याचे बायकोनें व पुत्रांनीं त्यास ओळखलें नाहीं सबब तो रद्द झाला. गोविंदराव घोरपडे यांचाही तोतया झाला होता परंतु तो असाच रद्द झाला. 'भागवतां'तही प्रतिवासुदेव झणून कृष्णाचा तोतया झाला होता, असा लेख आहे. त्याचप्रमाणें गुजराथेंत सोजित्रें येथें हरीकृष्ण महाराज झणून स्वामीनारायणाचा तोतया झाला होता. त्यानंतर हालीं धोळका येथील छोटमलाल मुन्सफ याचा मुलगा मयुरेश बुडाला, त्याचा एक बभूतगीर झणून तोतया झाला होता. परंतु तो अहमदाबादेंत आल्यावर त्याची आई, बायको, व सासरा यांनीं त्यास कबूल केलें. तरी बहुत लोकांस तो खोटा वाटला. ठाणें जिल्ह्यांतही थोडे दिवसांपूर्वी असाच एक मुलगा आपल्या आईबापांपासून १०।१२ वर्षेपर्यंत नाहींसा झाला होता. तो पुढें आईबापांकडे आला व त्यास आईबापांनीं २।४ महिने आपले जवळ ठेवून आपल्या तरुण सुनेचें गर्भाधानही केलें. परंतु २।४ महिन्यांनीं त्यांनीं त्यास खोटा झणून काढून दिलें. तेव्हां तो मनुष्य ठाण्यास येऊन लोकांच्या येथें वार लावून निर्वाह करीत राहिला होता. अशा अनेक प्रकारच्या भूली व लुबेगिच्या या जगांत चालू आहेत!

२५६. फांकडे नांवाची उत्पत्ति.

मराठे लोकांत शूर असेल त्यास 'फांकडा' झणावयाची चाल होती. मानाजी फांकडे झणून एक शिंद्याचे कुळांत होता. त्याचे अंगावर पन्नास जखमा होत्या असा तो वीर होता. परंतु तो नेहमी शिलेदारी करून असे, झणजे एक घोडें बाळगून होता. जे सरकारचे घोड्यावर बसत त्यांस 'बारगीर' म्हणत, व स्वतांचे घोड्यावर जे बसत त्यांस 'शिलेदार' झणत. राणोजी शिंदे याचे सर्व पुत्र मेले तेव्हां मानाजी यास त्या दौलतीवर नेमावें झणून राघोबादादांचा आग्रह होता. परंतु नाना फडणविसांस व सवाई माधवरावांस राज्यावर आणावयाचे कामांत व तळेगांवचे लढाईत वगैरे महादजी शिंदे फार उपयोगीं पडले होते, व राघोबादादाही कैद झाले, याजमुळें महादजी शिंदा जरी अस्सल वंश नव्हता तरी त्यांनीं त्यासच दौलतीचा अधिकार दिला. गुणांची योग्यता सर्वदां मोठी असते. गुण नसतील तर मात्र जातीची प्रतिष्ठा होते. असो. याप्रमाणें हाही एक फांकडा होता. दुसरा मेजर स्टुअर्ट झणून तळेगांवावर इंग्रजांची फौज आली होती त्यांत एक सरदार होता. त्यानें मराठी फौजेस फार दिवस रोखून धरलें होतें व त्याजमुळें त्यासही 'इडुर फांकडे' असें नांव पडलें होतें. पुढें 'इडुर फांकडे' हे त्याच लढाईत मेले.

२५७. पूर्वीची माहिती.

१ मलिकंबर निसबत निजामशाह नगरकर यांनीं जमिनीची पैमाश करून धारेबंदी केली ते शके १५४८ सालीं मेले.

२ शिवनेरी ऊर्फ जुन्नर या किल्ल्यांत शाहाजीचे पुत्र शिवाजी शके १५४९ सालीं जन्मले. तेथें शिवाई देवी आहे झणून तेंच नांव त्यास दिलें.

३ शिवाजीचे गुरु दादो कोंडदेव शके १५६७ सालीं मेले.

४ शके १५६९ सालीं शिवाजीनें पुण्याजवळ सिंहगड आहे घेतला.

५ शिवाजीस संभाजी नामक पुत्र पुरंदरावर मिती ज्येष्ठ शुद्ध १२ शके १५७९ सालीं झाला.

६ शके १६०२ त शिवाजी मेले.

७ माघ वद्य ९ शके १६०२ रोजीं शिवाजीचे गुरु रामदासस्वामी किला परळी येथें समाधिस्त झाले.

८ शके १६१० त संभाजी व त्याचा दिवाण कवजी यांस औरंगजेब यांनीं मारलें.

९ माघ वद्य ९ शके १६२१ रोजीं शिवाजीचा दुसरा पुत्र राजाराम सिंहगडावर मेला.

१० शके १६२९ सालीं संभाजीचा पुत्र शाहू छत्रपति हा औरंगजेबाचे कैदेंतून सुटून साताऱ्यास आला.

११ मिती मार्गशीर्ष वद्य ३ शके १६७१ रोजीं शाहूराजा मरण पावला.

१२ शके १६८२ त पानपतची लढाई झाली.

१३ वैशाख वद्य १२ रोजीं थोरले बाजीराव मेले.

१४ बाळाजी बाजीराव पेशवे शके १६८३ ज्येष्ठ वद्य ६ रोजीं पर्वतीवर मेले.

१५ माधवराव बल्लाळ पेशवे थेऊरास शके १६९४ सालीं मेले. त्यावेळीं त्यांची स्त्री रमाबाई सोलापुरकर यांची कन्या इणें सहगमन केलें.

१६ नारायणराव पेशवे यांस भाद्रपद शुद्ध १३ सोमवार शके १६९५ रोजीं त्यांचे चुलते राघोबादादा यांनीं मारेकऱ्यांकडून मारविलें. त्यावेळीं चापाजी टिळेकर व नारोजी नाईक जासूद हेही मेले. टिळेकर यांस जेजूरीजवळ वेखतपूर इणून आहे तें इनाम दिलें. मारेकरी सुमेरसिंग गाडदी, महंमद इसफ, खरकसिंग व दुसरे यांचें पारिपत्य केलें.

१७ नारायणराव यांची स्त्री गंगाबाई, कृष्णाजी हरि साठे यांची मुलगी ही तेव्हां गरोदर होती. हिला मग पुरंदर येथें ठेविलें. ही पोटीं वैशाख शुद्ध ७ शके १६९६ रोजीं सवाई माधवराव जन्मले.

१८ सवाई माधवराव यांस स्त्रिया २, रमाबाई थत्ते यांची मुलगी

व यशोदाबाई यांची मुलगी; हे आश्विन शुद्ध १५ मंगळवार शके १७१७ त मरण पावले.

१९ नारायणरावाचे बंधु विश्वासराव यांची स्त्री लक्ष्मीबाई पटवर्धन दीक्षित यांची कन्या ही पानपतांत श्रीमंत पडले त्या गर्दीत नाहींशी झाली.

२० रघुनाथ बाजीराव मार्गशीर्ष वद्य ३ शके १७०५ सालीं मेले.

२१ राघोबादादा मेले तेव्हां त्यांची स्त्री आनंदीबाई गरोदर होती. तीस कोपरगांव येथें चिमाजी आपा नामें मुलगा झाला.

२२ नानाफडणवीस शके १७२१ फाल्गुन वद्य २ रोजीं पुण्यांत मेले.

२३ शिंद्यांनी छापा घालून मल्हारराव होळकर यांस शके १७२४ त मारलें.

२४ बाजीराव रघुनाथ यांस ९ स्त्रिया झाल्या. पहिली भागीरथीबाई, भागवत यांची कन्या. दुसरी सत्यभामाबाई, मंडलीक यांची कन्या. तिसरी राधाबाई, फडके यांची कन्या. चवथी वाराणशीबाई, रास्ते वाईकर यांची कन्या. पांचवी कुसाबाई, हरिभाऊ देवधर यांची कन्या. सहावी सरस्वतीबाई, पेंडसे यांची कन्या. सातवी सत्यभामाबाई, अभ्यंकर यांची कन्या. आठवी लक्ष्मीबाई, मराठे यांची कन्या. नववी आठवले यांची कन्या.

२५ बाजीरावांची व इंग्रज सरकारची लढाई शके १७३६ सालीं आश्विन वद्य ११ पासून कार्तिक शुद्ध ८ पर्यंत पुण्यावर झाली. नंतर बाजीराव पळाले.

२६ त्याच सालीं माघ शुद्ध १५ स बापू गोखले पडले.

२७ शके १७४९ फाल्गुन शुद्ध ६ स शनवारचा वाडा जळाला.

मोगल बादशाहांच्या गोष्टी.

२५८. दिल्लीचे बादशाह.

औरंगजेब सन १७०७ सालीं अहमदनगरास मेल्यावर नऊ बादशाह झाले. यांत शेवटचा शाहअलम हा १७५९ सालीं बादशाह

झाला. हा पूर्वी म्हणजे बादशाह नसतांना बंगाल्यावर सुभेदार होता. तो व त्याचा वजीर सुजाउद्दौला हे दोघेही बक्सार येथें पराभव पावले. पुढें शाहअलम सानी म्हणजे दुसरा शाहअलम हा इ० स० १८०६ सालीं मेला. हा जिवंत असतां कधीं कधीं मराठ्यांचे, कधीं इंग्रजांचे व कधीं लखनौचे वजिराचे ताब्यांत असे व शेवटीं तो शिंद्याकडून निघून इंग्रजांचें पेन्शन घेऊन राहिला होता. यास आंधा बादशाह म्हणतात. हा मेला तेव्हां त्याचें वय ८३ वर्षांचें होतें. याचें राज्य एकंदर ४५ वर्षे गणितात. यास सव्वीस लाख रुपये नेमणूक पावत असून याचे नांवानें नाणें पडत असे. व हा पदव्या देत असे. लॉर्ड लेक कम्मांडर इन् चीफ यास यानें अमीर उल्उमरावची पदवी दिली होती. शाहअलमचा मुलगा अकबरशाह यासही तीच नेमणूक चालत होती, परंतु पदव्या देण्याची व शिक्क्यावर नांवें पाडण्याची बंदी केली. प्रथमतः अलमगीर तीस कोट रुपये वसूल घेत होता. तो तीस लाखांवर त्याचा वंश निर्वाह करूं लागला! हल्लीं त्या वंशाचे लोक पुष्कळ असून त्यांस शाहजादे म्हणतात. व त्यांस दरसाल अवघे दोन हजार रुपये पावतात!

२५९. शाहअलम बादशाह.

रोहिलखंडांतील साहारणपूरचा नबाब नजीबखान हा पानपतच्या लढाईत अब्दालीबरोबर होता, व तेव्हांही त्यानें मराठ्यांचा द्वेष केला. त्याचा मुलगा जाबतेखान व जाबतेखानाचा मुलगा गुलाम कादर हा मोठा कारभारी झाला असतां तो दिल्लीचा शाहअलम बादशाह ज्याचें पूर्वीचें नांव अली गौर होतें, त्याजजवळ सन १७८८ साली 'आपला सर्व पैसा कोठें आहे, तो काढून द्या' असें म्हणूं लागला. तेव्हां पारशाहानें आपले जनानखान्यांत जें काय होतें तें सर्व त्याला आणून दिलें; तरी त्याची तृप्ति होईना. पुढें त्यानें बादशाहास सिंहासनावरून खालीं उतरविलें आणि त्याची कटार हातांत घेऊन म्हणूं लागला कीं, 'तुला सर्व द्रव्य दिसत नसेल तर तुझे डोळेच फोडून टाकितों!' तेव्हां बादशाहानें उत्तर दिलें कीं, 'ज्या डोळ्यांनीं आपण शिवाजी महाराज हेही खतां आपला मुलगा संभाजी यास घेऊन पन्नास वर्षे कुराण वाचलें आहे ते तूं काढशील कीं काय?' परंतु

ऐकून त्या दुष्टानें त्या वृद्ध बादशाहास खालीं पाडलें आणि त्याचे छातीवर चढून दोन्ही डोळ्यांत कटारी मोंसकून त्याचे डोळे फोडून टाकिले! आणि त्यास तसाच रक्तबंबाळ झालेला उचलून दुसऱ्या ठिकाणीं नेऊन टाकला! असा अनर्थ झाला तेव्हां मोठा हलकल्होळ झाला. तैमुरच्या वंशाची ही दशा पाहून लोकांस अतिशय दुःख वाटलें. हें दुष्ट कृत्य पाहून बादशाहाचे मुलीनें आपल्या पोटांत कटार घालून जीव दिला! पुढें तें वर्तमान महादजी शिंद्यांस कळलें. तेव्हां त्यांनीं राणेखान व अब्बीबहादर यांस दिल्लीवर फौज देऊन पाठविलें. त्यांची फौज येते तों गुलाम कादर पळाला. नंतर तो साहारणपूर, फत्तरगड आणि मिरट या ठिकाणीं पळत असतां मिरट येथें गांठला गेला. परंतु तेथूनही तो जात असतां त्यास दुसरे लोकांनीं धरून आणिलें. अब्बीबहादर यानें त्यास सांगितलें कीं, 'बादशाहावर तूं एवढा जुलूम करून त्याची अमर्यादा केलीस; याचे पारिपत्याबद्दल तुझें नाक, कान व हातपाय तोडून टाकण्याचा ठराव झाला आहे. त्याप्रमाणें त्याचें अंगछेदन करून तसाच लोळा खाटल्यावर बांधला. इतक्यांत महादजी दिल्लीस येऊन पोहोंचले, त्यांजकडे तो रवाना केला. परंतु तो वाटेंतच मरण पावला. त्याचा सोबती नजीबखान यास हत्तीचे पायीं दिलें. मग शिंद्यांनीं बादशाहास सारंभानें गादीवर बसवून सर्व बंदोबस्त केला. याच सालीं त्यांनीं रोहिलखंड, हरिद्वार, कुरुक्षेत्र, रामपूर, संबळपूर, मुरादाबाद व अलीगड वगैरे ठिकाणें आपल्या ताब्यांत घेतलीं. त्याचप्रमाणें रोहिल्यांचा पार नाहींसा केला. या मोहिमेंत कोट्यावधि रुपयांची लूट सांपडली. बादशाहास दरसाल नऊ लाख रुपये नेमणूक ठरवून दिली. व त्याजजवळ मराठ्यांचे तर्फे शाह निजामउद्दीन यास ठेविलें. शाहअलम बादशाहाची कबर हल्लीं पुराणी दिल्लीत आहे.

२६०. दिल्लीचें महत्व.

पूर्वी दिल्लीस बादशाह असल्यामुळें तेथें सर्वांस जावें लागे. त्याप्रमाणें शिवाजी महाराज हेही स्वतां आपला मुलगा संभाजी यास घेऊन इ० स० १६६६ त दिल्लीस गेले होते. परंतु तेथें कांहीं दंगा

दिसल्यामुळें ते रातोरात मथुरेस पळून गेले. पुढें बाळाजी विश्वनाथ हेही गेले होते. जशी हल्ली विलायत तशीच त्या वेळेस दिल्ली होती. कोणतेंही गांव पाहिलें तरी त्यास उत्तरेकडील दरवाजास 'दिल्लीदरवाजा' असें नांव असतें. पुण्यास शनवारवाड्यास दिल्लीदरवाजा आहे. याप्रमाणें व सर्व गांवीं बहुतकरून दिल्लीदरवाजे आहेत.

२६१. मोंगलाई अमलांत झालेल्या मुलखाच्या पहाण्या.

तोडरमल यांनीं गुजरायेंत व मलकंबर यांनीं दक्षिणेंत पाहणी केली. मलकंबरीचे पहाणीस 'मलकंबरी धारा' म्हणतात. गांवचे हिशेबी, कमाल म्हणतात. ते त्यांनीं ठरविले, नंतर पुढें तनखा व त्यानंतर आकार ठरले.

२६२. जलूस शक.

दिल्लीचे बादशाह हे प्रत्येक जण आपले राज्याचें साल पहिलें धरून मरे तोंपर्यंत शके लिहीत, त्यास जलूस म्हणतात. प्रत्येक बादशाहाचा जलूस वेगळा आहे. बाबर बादशाह १४९६ इसवींत गादीवर बसला तो पहिला जलूस म्हणजे हिजरी सन ९००.

त्याचीं जलूसाचीं	वर्षे	२६.	जहानदरशाहाचीं	वर्षे	१.
हुमायुनाचीं	,,	२७.	फरुघसीराचीं	,,	
अकबराचीं	,,	५०.	महंमदशाहाचीं	,,	३०
जहानगीराचीं	,,	२४.	अहमदशाहाचीं	,,	
शाहजहानाचीं	,,	३०.	महंमद अलमगीराचीं	,,	
औरंगजेबाचीं	,,	५१.	शाहआलम सानीचीं	,,	४

पुढें १८०३ सालीं इंग्रजांनीं दिल्ली घेऊन बादशाहास पेन्शन दिले त्याचे पूर्वी तो दहा वर्षे महादजी शिंदे यांचे कबजांत होता.

२६३. सुगुणचंद.

हिंदुस्थानांत महादजी शिंदे व पुण्यांत सवाई माधवराव हे मेल्यावर त्यांचे राज्यांत फार धांदल उडाली. तेव्हां इंग्रजांचे सरदार लॉर्ड लेक यांनीं होळकर व शिंदे यांचा सर्व मुलूख घेतला. दक्षिणेंत जसा

नरल वेल्स्ली साहेब प्रसिद्ध आहे त्याचप्रमाणें हिंदुस्थानांत जनरल लेक साहेब प्रसिद्ध आहे. त्यानें दिल्ली, मथुरा, अजमीर, दुवाब व हरिद्वार हीं सर्व खालसा करून राजपुतान्यांतील राजांशीं तह केले, व मराठ्यांचा बळमोड केला. या लॉर्ड लेक साहेबानें त्या वेळीं प्रसिद्ध असलेले दिल्लीचे सावकार सुगुणचंद यांस त्यांच्या योग्य सहाय्याबद्दल जहागीर दिली. त्यांचे सनदेवरील फार्सी शिक्का खालीं लिहिल्याप्रमाणें आहेः—समसामुद्दौला, आपजाउलमुल्ख, खानदौरान, खान जनरल जीगर्ड लेक बहादूर, सीपाह सालर, फत्तेजंग, येके आज साहेबान् कौन्सल, वनीज लष्कर आफवाज बादशाह इंग्लिस्तान व कंपनी इंग्रेज बहादूर मुतालके किषवर हिंदुस्थान. फिदवी पाहआलम बादशाह गाजी. या सनदेवर तारीख १५ नोवेंबर सन १८०५ ही मिती आहे.

इतर मुसलमान बादशाहांच्या गोष्टी.

२६४. विजापूरचे बादशाह.

विजापुरास सुलतान यूसफ अदिलशाह यानें सन १४८९ पासून १५०० पर्यंत राज्य केलें. त्याचे मागून सुलतान इस्मायल अदिलशाह, त्यानंतर सुलतान मलु अदिलशाह, नंतर सुलतान इब्राम अदिलशाह बडे, नंतर सुलतान अली अदिलशाह, नंतर इब्राम अदिलशाह छोटे, मग महंमद अदिलशाह, त्यावर अली अदिलशाह छोटे आणि नंतर शिकंदर अदिलशाह झाला. याचे कारकीर्दीत सन १६८७ सालीं औरंगजेबानें विजापूर घेऊन त्याचें राज्यही खालसा केलें. याच बादशाहाचे कारकीर्दीत दक्षिणेंत मोजणी होऊन इदलशाही विधा चालू झाला व किरीटी रामराजा याचें राज्य खालसा झालें. याप्रमाणें नऊ बादशाह झाले. त्यांचें ऐश्वर्य कसें होतें हें त्यांची राजधानी पाहिली असतां समजेल.

२६५. चतुर साबाजी.

चतुर साबाजी हा शेणवी ब्राह्मण विजापूरचे बादशाहाजवळ होता. त्याचे शहाणपणाची तारीफ आहे.

ऐ० गो० १. १५.

२६६. विठ्ठलपंत जमीदार यांनीं रयतेच्या कल्याणाकरितां लक्ष्यांत ठेवण्यालायक केलेली कृति.

विजापूरचे कारकीर्दीत विठ्ठलपंत म्हणून जमीदार होता, त्याजकडे बादशाहानें पैमाश करण्याचें ठरवून तें काम सोंपविलें. तेव्हां त्यानें 'पांड किती वावांचा धरावा?' म्हणून बादशाहास विचारिलें. बादशाहानें, 'वीस वांवेचा पांड धरून पिच्यास रुपया धारा ठरवावा' म्हणून सांगितलें. तेव्हां विठ्ठलपंत म्हणाला कीं, 'वांवें कोणाचीं घ्यावीं?' बादशाहानें सांगितलें कीं, 'तुमचींच घ्यावीं.' तेव्हां विठ्ठलपंत म्हणाला कीं, 'हें आपलें वचन फिरलें नाहीं तर मी आपली वांव दाखवीन.' बादशाहानें त्याचें म्हणणें कबूल केलें, म्हणजे 'वचन फिरावयाचें नाहीं' असें सांगितलें. तेव्हां विठ्ठलपंत दूर जाऊन त्यानें आपलीं मनगटें व कोंपरें कापून लांब ओढून काढलीं आणि बादशाहाजवळ येऊन म्हणाला कीं, 'माझी वांव इतकी लांब झाली आहे, हीच घ्यावी कीं काय?' तेव्हां बादशाहानें सांगितलें कीं, 'लोकहिताकरितां तूं जर आपले हात दिलेस तर आम्ही आपलें वचनही फिरविणार नाहीं.' हल्लीं धारवाड जिल्ह्यांत हा मार 'विठ्ठलपंती मार' अशा नांवानें प्रसिद्ध आहे. तो दिडमाराचा एक मार (चाहूर) भरतो. हल्लीं सार्वजनिक सभा व तिचे पुरस्कर्ते गणेश वासुदेव जोशी, गोपाळ नरसिंह देशपांडे इंदापूरकर, वगैरे मंडळी रयतेकरितां ज्याप्रमाणें खपत आहे त्याप्रमाणेंच पूर्वीही जमीदार, रयतेचे कल्याणाकरितां झटत होते; पण मध्यंतरी दौलतराव शिंदे, बाजीराव पेशवे, वगैरे रत्नें उत्पन्न झालीं तेव्हां मात्र सर्व सद्गुण अस्तास गेले.

२६७. अहमदनगरचे बादशाह.

अहमदनगरास जे राजे झाले त्यांचीं नांवें:—मलिक अहमद निजाम मुलुक बहिरी १४८७; सुलतान बुऱ्हाण निजामशाह; सुलतान हुसेन निजामशाह; सुलतान मूर्तिजा निजामशाह; सुलतान मिरान हुसेन निजामशाह; सुलतान इस्माइल निजामशाह आणि नंतर सुलतान बुरान निजामशाह. हा बादशाह सन १५९४ सालीं मेला. हें राज्य जहानगीर बादशाहानें घेतलें.

२६८. निजाम सरकारचा वंश.

हल्लीं दक्षिणेत हैदराबाद येथील गादीवर जो वंश चालत आहे, त्याचे मूळपुरुष मीर कमरुद्दीन ऊर्फ चिनकिलिचखान हे होते. हे अलमगीर बादशाहाचे लष्करांत वाढत वाढत सरदार झाले. पुढे सन १७०७ या सालीं अलमगीर मरण पावल्यावर जो दंगा झाला त्यांत यास सन १७१३ या सालीं दक्षिणसुभा ही पदवी मिळाली, व निजामउल्मुल्क असफजहां हा किताबही प्राप्त झाला. मुसलमानी राज्यांत, हल्लींच्या गव्हर्नराप्रमाणें सुभा ही पदवी होती. दरएक सुभेदाराकडे मोठा प्रांत असे व त्याचे ताब्यांत पुष्कळ नबाब असत. गुजराथेचा सुभा, बंगाल्याचा सुभा, माळव्याचा सुभा, कर्नाटकाचा सुभा, पंजाबाचा सुभा, असें त्या काळीं विभाग होते.

निजामउल्मुल्क यास दक्षिणेचा सुभेदार नेमल्यावर, तो दक्षिणप्रांत आपले ताब्यांत घेण्यास फौजेसुद्धां फिरूं लागला. नादिरशाहाचे गर्दीत हा दिल्लीस गेला होता. पुढे कांहीं दिवस त्यास वजिराची पदवी दिली होती. नंतर यांजकडे माळव्याच्या सुभ्याचेंही काम झालें. परंतु थोरले बाजीराव पेशवे, मल्हारराव होळकर वगैरे सरदारांनीं दिल्लीचे सुभे जागोजाग गारद केले. त्याचप्रमाणें याजकडूनही माळवा प्रांत सोडविला. मग हा हैदराबादेस ठाणें देऊन राहिला. तेथून अहमदनगरपर्यंत याचा अमल होता. ते वेळीं मराठ्यांनीं चोहोंकडून धांदल चालविली होती; याकरितां पेशव्यास याच्याशीं बहुत लढाव्या कराव्या लागल्या. नंतर शाहूराजाचे मरणापूर्वी एक वर्ष सन १७४८ सालीं हा मरण पावला. तेव्हां यास सहा कन्या व सहा पुत्र होते. त्या पुत्रांचीं नांवें:—

१ गाजी उद्दीन	४ निजाम अल्ली.
२ नासरजंग नाशिरुद्दौला	५ महंमद सरीफ.
३ सलाबतजंग	६ मीर मोगलखान.

यांपैकी वडील गाजी उद्दीन यास अमीरउल्उमरावची पदवी दिल्ली येथे होती. तो फौज जमा करून सन १७५२ सालीं, सलाबतजंग यानें हैदराबादेचें राज्य घेतलें होतें तें घेण्याकरितां येत होता. तेव्हां

औरंगाबादेस आल्यावर नासरजंग याचे आईनें त्यास जेवावयास बोलावून विष घातलें. तेणेंकरून तो मरण पावला. नासरजंगही थोडे दिवसांत मेले. महंमद सरीफ व मीर मोगल हे विशेष प्रसिद्धीस आले नाहींत. सलाबतजंग यांजकडे विजापूर प्रांत होता. तो सदाशिव चिमणाजी पेशवे यांनीं सन १७५६ सालीं उदगीरची लढाई झाली, तेव्हां घेतला. आणि रायचूर अदोनी व गंटूर हे तीन महाल त्यांकडे जहागिरीदाखल राहिले. इतक्यांत इंग्लिशांनीं, दिल्लीचे बादशाहापासून गंटूर वगैरे पूर्वसमुद्रतीरचे चार महालांची सनद घेतली. मग त्यांनी ते आपले ताब्यांत घेण्याकरितां सलाबतजंगास तगादा लाविला. शेवटीं खंडणी देण्याचें कबूल करून ते महाल घेतले. टिपूसुलतान हा अदोनी वगैरे प्रांतावर स्वाऱ्या करी यामुळें सलाबतजंग याचा व त्याचा नेहमीं लढण्याचा प्रसंग पडे. शेवटीं १७८२ या सालीं तो मरण पावला. पुढें त्याच्या मुलानें कांहीं दिवस दंगा चालविला; परंतु इंग्रजांचे मदतीनें निजाम अल्ली यानें त्यांचा मोड केला. याप्रमाणें पुत्रांची वाट झाली.

आतां निजामउल्मुल्क याचे पुत्रांपैकीं चवथा मुलगा निजाम अल्ली यांनीं सन १७६२ पासून हैदराबादेचा कारभार चालविला. सलाबतजंग मेल्यावर त्यास निर्वैर होऊन गेलें. पुढें सन १७६६ सालीं त्यांनीं कंपनी सरकाराशीं तह करून इंग्रजी फौज चाकरीस ठेविली. मग बंदीगान अल्ली असा किताब चालू झाला. पूर्वसमुद्राकडील गंटूर वगैरे महाल, सात लाख रुपये इजारा ठरवून इंग्लिशांस दिले. सन १७६३ सालीं माधवराव पेशवे यांनीं राक्षसभुवनावर यांचा पराजय केला आणि नगर वगैरे बहुतेक मुलखांत आपला अंमल बसविला. पुढें मद्रास सरकारानें सलाबतजंग याजबराबर तहनामा केल्यामुळें निजाम अल्लीस राग आला. आणि त्यांनीं १७७९ या सालीं हैदर नाईक व मराठे यांस मिळून इंग्रजांशीं बेबनाव केला. तेव्हां कंपनी सरकारानें सलाबतजंगाबराबर केलेला तहनामा रद्द केला.

सन १७९२ त निजाम अल्ली, सवाईमाधवराव पेशवे व इंग्लिश या त्रिवर्गांनीं एकत्र होऊन टिपूस जिंकण्याची मसलत केली.

सन १७९६ त हैदराबादेस फरांशिस लोकांचा जमाव झाला होता. तो इंग्लिशांनीं मोडून काढिला.

सन १७९५ सालीं निजामाची व मराठ्यांची खर्डा येथें लढाई होऊन निजामाचा मोड झाला. पुढें १७९९ सालीं टिपूस मोडून श्रीरंगपट्टण घेतलें. त्या मुलखाबद्दल बीस लक्षांची धरणी निजामास आली; परंतु त्यांनीं तोच मुलूख, सन १८०० त इंग्लिश फौज चाकरीस ठेविली, त्याबद्दल लाऊन दिला. इंग्रजाकडील आठ हजार पायदळ, एक हजार स्वार व तोफा इतकें निजामाचे तैनातीस आहे. पुढें निजाम अल्ली १८०३ मध्यें १०० वर्षांचे होऊन मरण पावले. त्यास ८ मुलगे होते. पैकी शिकंदरजाह हे गादीवर बसले.

सन १८१७ सालीं पेशव्यांचें राज्य इंग्रजांनीं मोडलें, तेव्हां शिकंदरजाह यांनीं मदत केली. याकरितां त्यांस ६ लक्षांचा नवीन मुलूख मिळाला. नंतर सन १८२० सालीं यांचें राज्य एक कोट नव्वद हजारांचें होतें. खेरीज इंग्रजांची दहा हजार फौज यांचे तैनातीस आहेच. त्यांत मोठाले अंमलदार साहेब लोक पंधराशें आहेत. त्याजबद्दल दरसाल निजामास चाळीस लक्ष रुपये द्यावे लागतात. सन १८२१ सालीं यांचा व इंग्लिश सरकारचा तह होऊन सीगानदीची हद्द ठरली. सन १८२८ सालीं शिकंदरजाह मरण पावले. नंतर यांचे पुत्र नासिरउद्दौला हे गादीवर आले. त्यांचा किताब असाः— 'मुजफरउल्मुमालिक निजामउल्मुल्क नीरफर खंदे अल्लीखान बहादर नसिरजंग.' हीं नांवें फार लांब याकरितां हैदराबादेचे गादीवर जे बसतात त्यांस 'निजाम' असें म्हणण्याची चाल आहे. निजाम अल्लीचा दिवाण पूर्वी मशीरउल्मुल्क होता. त्यास खर्ड्याचे स्वारींत सरदारांनीं व नाना फडणिसांनीं कैद करून ओलीस ठेविलें होतें. यानंतर राजे चंदुलाल कायस्थ ब्राह्मण हे कारभारी होते. हा पुरुष मोठा धर्मात्मा असे.

सन १८५५ सालीं निजामाकडून रायचूर, वऱ्हाड वगैरे पन्नास लक्षांचे महाल कर्जाबद्दल घेतले. पुढें बंदांत उपयोगी पडल्यामुळें, रायचूर, नवदुर्ग, धारूर वगैरे महाल सोडून दिले. आतां फक्त व-

ऱ्हाड मात्र अमानतीस आहे. परंतु तेथील वहिवाटीचा खर्चव्यय भागून विशेष शिलक राहत नाहीं. नासिरउद्दौला हे सन १८५७ सालीं मरण पावले. त्यानंतर अफजलउद्दौला हे इंग्लिशांचे संमतीनें गादीवर बसले. सर सालरजंग हे त्यांचे दिवाण होते. या निजामास 'नाईट स्टार आफ इंडिया' ही पदवी महाराणी सरकारांतून मिळाली होती.

अफजल उद्दौला हे ४३ वर्षांच्या वयाचे होऊन सन १८६९च्या फेब्रुअरी महिन्याच्या २६व्या तारिखेस मरण पावले. नंतर त्यांचा पुत्र मीर मैबुब झास त्याचे गादीवर बसऊन मुख्य दिवाण सर सालरजंग व इंग्लिशांचा रेसिडेंट ह्यांनीं राज्यकारभार चालविला. हाच पुरुष सध्यां गादीवर आहे.

निजामानें इंग्लिशांचा आश्रय केल्यामुळें त्याचा परिणाम लागला. नाहीं तर मराठे व हैदर अली यांनीं त्यास कधींच नाहींसा केला असता. थोरले निजामउल्मुल्क मेल्यावर भावाभावांत बहुत तंटे लागले. शिवाय टिपू व मराठे त्यांस ग्रासण्यास पाहतच होते. आपसांतील तंट्यामुळें कधीं फ्रेंच व कधीं इंग्लिश यांची फौज ठेवून त्यांच्या आश्रयानें आपलें संरक्षण करीत. दिल्लीचा बादशाह हा तर अगदीं अशक्त होऊन पराधीन झाला होता. त्याचा अंमल कोणी मानीनासें होऊन, सुभेदार आपणास स्वतंत्र राजे ह्मणवूं लागले. अशा प्रसंगी निजामानें इंग्लिशांशीं सलोखी राखून निभाव करून घेतला. हली निजामाकडे खालीं लिहिल्याप्रमाणें प्रांत आहेत:—

१ प्रांत हैदराबाद अथवा भागानगर—तेलंगण.
२ प्रांत बेदर. भाषा मराठी.
३ प्रांत नांदेर. भाषा मराठी.
४ प्रांत औरंगाबाद, पैकीं कांहीं भागांत भाषा मराठी.
५ प्रांत विजापूर, पैकीं कांहींत भाषा कानडी.
६ प्रांत वऱ्हाड, कांहींत भाषा मराठी.

निजामाचे राज्याचे उत्तरेस तापी आणि वर्धा ह्या नद्या, दक्षिणेस कृष्णा आणि तुंगभद्रा नद्या, मध्यें गोदा आणि भीमा नद्या, अशा आहेत. या मुलखांत मुर्‍हकोट आणि पाहाडी असे पुष्कळ किले आहेत.

हैदराबाद, गोवळकोंडे, नादर, दौलताबाद, बेदर, इलिचपूर, सगर, कलबुर्ग इत्यादि मोठमोठीं शहरें आहेत.

हैदराबाद हें मोठें शहर असून तेथें बहुतेक मुसलमान लोकांची वस्ती आहे. राज्याची व्यवस्था चांगली नाहीं, याचें मुख्य कारण मुलूख मक्तानें देण्याची चाल सुरू आहे. दिवाणी व फौजदारी कामें चराचर चालत नाहींत. उनाड लोक वंडवाल्याप्रमाणें नेहमीं दंगे करीत असतात. या राज्यांत हिंदूस मोठी जागा देऊं नये, असा नियम नाहीं. चंदुलाल हे दिवाणगिरीचे कामावर होतेच, खेरीज सरदार व मोठमोठे कामदार हिंदु लोक पुष्कळ आहेत. मुसलमान लोकांचा श्रेष्ठपणा आहे. ही गोष्ट आश्चर्य करण्यासारखी नाहीं. शहरांत मोठमोठे सावकार व श्रीमान लोक अनेक आहेत. मुलूख सुपीक व सर्व पैसा तेथेंच मुरत असल्यामुळें लोक सधन आहेत. राज्याची व्यवस्था चांगली राहत असेल तर याहींपेक्षां लोक सुखी होतील.

२६९. विठ्ठल सुंदर.

विठ्ठल सुंदर हे संगमनेरचे ब्राह्मण असून पुढें ते निजाम अलीचे दिवाण झाले. पुढें दादासाहेबाचें व पटवर्धन व प्रतिनिधि यांचे वांकुडें पडलें. कारण कीं, यांचीं संस्थानें व पदव्या राघोबा दादांनीं हिरावून घेतल्या व त्या राजेबहादर यांस दिल्या. राजेबहादर यांनीं प्रतिनिधि हें पद सन १७६१ या सालीं घेऊन तें एक वर्ष राखिलें. त्याच वेळेस त्यांनीं मिरज घेतली; व तेव्हां तेथें गोपाळराव पटवर्धन यांचा एक चंदनाचा वाडा होता तो त्यांनीं जाळला. पुढें प्रतिनिधींचे मुतालिक यमाजीपंत ह्मणून कुडाळचे शिवदे यांचे घराण्यांतील होते व त्यांचा बाप गमाजी ह्मणून होता. त्या उभयतांच्या स्वभावावरून लोकांमध्यें अशी ह्मण पडली होती कीं, 'यमाजीला भिऊ नये पण गमाजीला भ्यावें.' त्यांचे व्याही विठ्ठल सुंदर हे होते. तेव्हां त्यांनीं प्रतिनिधीस सांगितलें कीं, 'आम्ही विठ्ठल सुंदरास सांगून निजामाकडे पटवर्धन, व प्रतिनिधि यांस सरदारी देववितों.' पुढें त्याप्रमाणें ते उभयतांही तिकडे गेले. पुढें त्यांनीं निजामास सांगून रास्तभुवनची लढाई उभी केली. त्यांत थोरले माधवराव यांनीं वि-

हल सुंदराचें डोकें कापून, ते राघोबास धरून नेत होते त्यासही परत आणिलें. आणि पुढें माधवरावांनीं आपले सरदार आपलेकडे घेऊन त्यांस पूर्ववत् जहागिरी व पदव्या देऊन प्रतिनिधि, पटवर्धन व मुतालीक यांस परत आणिलें.

२७०. दक्षिणचे सुभे.

दक्षिणेचे मुसलमानी राज्याची राजधानी विजापूर दारुल जफर येथें होती. नंतर खुजस्तेबुन्याद औरंगाबाद येथें मुख्य सुभा झाला. त्यानंतर फरखुन्होबुनियाद हैदराबाद येथें दक्षिणचे सुभे निजाम हे राहूं लागले.

२७१. दक्षिणचे सुभे.

दक्षिणचे साडेसहा सुभे होते ते असे—

१ बन्हाणपूर; नर्मदादक्षणतीरापर्यंत.
२ ईलिचपूर, बन्हाड, बंगाल; पूर्वसमुद्रापर्यंत.
३ विजापूर; पश्चिमसमुद्रापर्यंत.
४ सुभे बेदर व हैदराबाद; पूर्वसमुद्रापर्यंत.
५ सुभा अर्काट व कर्नाटक; दक्षिणसमुद्रापर्यंत.
६ सुभे अमदाबाद; तमाम गुजराथ.
॥ दौलताबाद; मध्यदेश.

२७२. सावनूरचे नवाबांचा वंश.

सावनूरचे नवाबांचा मूळ पुरुष अबदुल हुसेनखान यानें कांहीं दिवस अकबर बादशाहाची वजिरी केली. त्याचा मुलगा बहिलोलखान हा विजापूरचे बादशाहाचा सरदार होता. त्याचा मुलगा अबदुल रहिमखान यास सरकार नांदेर हें जहागीर मिळालें. पुढें त्याचा मुलगा अबदुल करीमखान बहादूर दलेलजंग यास सरकार धंकापूर व कर्नाटक सुभा हे मिळाले. त्याचा मुलगा दलेलखान यास बेळगांव ऊर्फ अजीमनगर व तोरगळ सरकार हे जहागीर दिले. त्याचा मुलगा फत्तेखान, त्याचा मुलगा अबदुल मजीदखान, त्याचा गफारखान, त्याचा सतारखान व त्याचा अबदुल हकीमखान, यांनी

जहागीर टिपूनें हिसकून घेऊन त्याची मुलगीही मागितली, म्हणून तो पेशव्यांचे आश्रयास आला व परशुराम भाऊंबरोबर श्रीरंगपट्टणचे स्वारीस गेला. तेव्हां त्यास पेशवे चार हजार रुपये महिना देत होते. पुढें टिपूनें आपली बहीण याचे मुलास दिली. त्याचें नांव दलेलखान. यास एल्फिन्स्टन् साहेबांनीही चार हजार रुपये नेमणूक करून दिली होती, व पुढें त्याचेबद्दल सापूर वगैरे ४० हजारांची जहागीर दिली.

२७३. मच्छलीबंदरचे नवाब.

मच्छलीबंदरचा नवाब अनवरुद्दीनखान हा निजामउल्मुल्क याचे पोटांत होता. परंतु त्याचे अमलांत धांदल होऊन ज्यानें त्यानें महाल बळकाविले. या धांदलीचा बंदोबस्त अनवरुद्दीन याचे पुढें रुस्तुमखान यानें केला. त्यांत त्यानें जमीनदार वगैरे फार मारले. त्याचे पुढें हुसेनखान हा नवाब झाला. तेव्हांच इ० स० १७६५ त इंग्रज कंपनीनें दिल्लीदरबारकडून राजमहेंद्री, वेळूर, कोंडापिली व गंटूर हे चार परगणे त्याजपासून देण्याची सनद आणिली तरी कांहीं दिवस त्यांची वहिवाट नवाबाकडेसच ठेविली होती. पुढें कंपनीनें इ० स० १७७९ मध्यें ते महाल आपल्या ताब्यांत घेतले व त्यास १॥ लाख रुपयांची नेमणूक करून दिली. पुढें हुसेनखान मेल्यावर चौकशी होऊन त्याचे वंशजांस पन्नास हजार रुपये देण्याचें ठरविलें व तींच नेमणूक हल्लीं चालू आहे. येणेंप्रमाणें त्या प्रांतांत इंग्रजी अम्मल सुरू झाला.

२७४. गुजराथचे राजे.

गुजराथेंत भील, कोळी, वाघेर व काठी इत्यादि जातीचे लोक अजमासें अडीच हजार वर्षांपूर्वी राहात होते. नंतर यदुवंशाचे यादव येऊन त्यांनी काठेवाड किंवा सौराष्ट्र प्रांत जिंकिला व ते जीर्णगड ऊर्फ जुनागड येथें किल्ला बांधून राहिले. त्यांचें राज्य कितीएक वर्षे निर्वेध चाललें. पुढें हा प्रांत दाम या नांवाच्या राजांचे हातीं लागला. त्यांचे शिक्के अद्यापि सांपडतात, त्यांजवर जयदाम, जीवदाम, रुद्रदाम, यशदाम अशीं नांवें लिहिलेलीं आढळतात. पुढें तो प्रांत

इसवी सन २५० चे सुमारास यवन लोकांचे हातीं गेला होता. त्यांतील राजे साह झणून झाले. त्यांचीं नांवें रुद्रसाह, श्रीसाह, विजयसाह, क्षेत्रसाह इत्यादि आहेत. पुढें गुप्त या नांवाचे राजे झाले. त्यानंतर ६५० सालीं शिलादित्य हा जैनधर्मी राजा झाला. त्याचें राज्य साळुंखी यांनीं घेतलें. व साळुंखी यांजपासून वनराज चावडा यानें घेतलें. तो राजा शैव असून त्यानें पट्टण राजधानी केली होती. पुढें योगराज, क्षेम, श्रीवीरसिंह, रत्नादित्य, असे अनुक्रमें इ० स० ९३५ पर्यंत राजे झाले. पुढें मूळराज झाला. त्यानेंच सितपूरची रुद्रमाळा व कीर्तिस्तंभ ही बांधिलीं. यानें अर्बु ऊर्फ अर्बुदाचलपर्वती प्रमार राजे राहात होते त्यांजपासून खंडणी घेतली व ब्राह्मणांस सिहोर व सितपूर हीं दान दिलीं. त्याचे पुढें चामुंड राजा झाला; त्याचे कारकीर्दींत मुसलमान हिंदुस्थानांत उतरून सोमनाथपर्यंत लूट झाली. ते गेल्यावर पुढें दुर्लभराज भीमदेव हा इ० स० १०२४ इसवींत राज्य करूं लागला. त्याचे वेळेस माहमूद गजनवी यानें येऊन मथुरा लुटली. या राजाची स्त्री उदयमती नांवाची होती तिनें बहुत देवळें बांधिलीं. त्यापुढें वीसलदेव राजा झाला, त्यानें वीसलनगर वसविलें. पुढें सन १०७२ सालीं कर्णराजा झाला; त्याणें कर्णसागर तलाव व मुंढेरा बांधला. मुंढेरा गांवच्या ब्राह्मणज्ञातीस मोढ झणतात. यानें असावळ गांवीं साबरमतीचे कांठीं कर्णावती शहर वसविलें. त्यासच हली अहमदाबाद झणतात. त्यापुढें इ० स० १०९४ सालीं सिद्धराज जयसिंग हा राजा झाला. त्यानें धोळक्यास व वीरमगांवीं तलाव केले, सितपुरास सरस्वतीचे तीरीं घांट बांधिला, गिरनारावर देवळें बांधिलीं, झिंझुवाडास इमारती बांधिल्या आणि कर्णावतीचें नांव श्रीनगर असें ठेविलें. हा राजा शैव होता. त्याचे पुढें कुमारपाल नांवाचा श्रावकधर्मी राजा इ० स० ११५० त झाला. त्याजवळ हेमाचार्य झणून मोठा पंडित होता. त्यापुढें अजयपाल राजा झाला. त्यानंतर दुसरा भीमदेव हा राजा झाला. त्याचेच वेळेस झणजे इ० स० ११९३ सालीं पृथ्वीराजाचा पराभव करून कुतुबुद्दीनही गुजरायेंत आला. त्यापुढें दुसरा वीसलदेव, अर्जुनदेव, सागरदेव, व कर्ण असे अनुक्रमें

झाले. सन १३०० इसवींत अलेफखान यानें खंबायत घेतलें आणि सितपूर व पट्टण हीं लुटून तेथील इमारती पाडल्या. याच वेळेस देवगिरीचे जाधवराजे यांची कन्या कालादेवी ही कर्णास द्यावयाची होती. परंतु ती खिजरखान यानें हरण केली. पुढें महंमद तघलख आला. नंतर तैमुरशाह दिल्लीस आला. पुढें सुलतान मुजफरशाह गुजरायेंत येऊन तो स्वतंत्रपणें राज्य करूं लागला. त्याजपुढें अहमदशाह हा अहमदाबाद येथें आपल्यास गुजराथी बादशाह असें नांव घेऊन राहिला. त्यापुढें कुतुबशाह हा व नंतर महंमद बेगडा झाला. बेगडा यानें चांपानेर लुटिलें व जीर्णगड ऊर्फ जुनागड घेतला. व याजवरूनच त्याचें नांव बेगडा (दोन गडांचा विध्वंसक) असें पडलें. ही गोष्ट सन १५११ त झाली. पुढें बहादुरशाह, महंमदशाह व अहमद सानी (१५७२) हे झाले. त्यानंतर मुजफर व अहमद झाले. त्या वेळेस दिलीहून अकबरशाह येऊन त्यानें गुजराथ घेतली. पुढें, गुजराथचा अम्मल अभयसिंग रजपूत याजकडे व बाबीकडे होता तो कांहीं ठिकाणचा त्यांजपासून इ० स० १७०० त खंडोजी दाभाडे सेनापति यांनीं घेतला. पुढें गायकवाड, पेशवे, शिंदे, व होळकर या मराठे सरदारांनीं मिळून सन १७५३ सालीं अहमदाबाद घेतली. ती शेवटीं १८१७ मध्यें इंग्रजांनीं घेतली. फिरंगी यांनीं गुजरायेंत दीव झणून बंदर आहे तें १५११ त घेतलें. व इंग्रजांनीं गुजराथपैकीं सुरत येथें १६१२ सालीं प्रथम वखार घातली. याप्रमाणें त्या दोन लोकांचा मूळ पाया येथें स्थापन झाला.

२७५. अहमदाबादचा गुजराथी बादशाह महंमद बेगडा.

महंमद बेगडा हा अहमदाबादेस राज्य करीत असतां त्यानें दोन जांस ताकीद लिहिली की, 'तुझी मुसलमान व्हाल तर राहाल.' ते

१. 'बाबी' हा वंश गुजराथ व काठेवाड इकडे फार मोठा आहे. 'बाबी' याचा मूळ फार्शी भाषेंत 'दार' असा अर्थ असून पूर्वी बादशाहाचे या वंशाचे पूर्वज दारावरील मोठ्या अधिकाऱ्यांपैकीं असावे असें वाटतें.

राजे, एक जुनागडचे यादवराजे व दुसरे चांपानेरचे पटईरावळ हे होते. पैकीं जुनागडचे राजांनीं तें मुसलमान राजाचें ह्मणणें कबूल करून मुसलमान झाले. परंतु चांपानेरचे राजांनीं सांगितलें कीं, 'लढाईस यावें.' तेव्हां मुसलमानांचा हला होऊन त्यांत ते शहर अगदीं उजाड झालें. तें अद्यापि ओसाडच आहे. चांपानेर हें शहर फार मोठें होतें. तेथें गडावर राजा राहात असे; त्यानें आपलीं बायकापोरें टार मारून झांवरतलाव नांवाच्या तळ्यांत टाकलीं आणि जवाहिराचे दागिने होते ते जात्यांत घालून दळून टाकले. सारांश, ह्याप्रमाणें शत्रूच्या हातीं कांहीं लागूं नये ह्मणून असा सर्व प्रकारें आपल्या चीजवस्तूंचा व मनुष्यांचा नाश करून टाकला. मग पुरुष राहिले त्यांनीं केशरी पोषाख करून सतीचे वेष घेतले आणि 'लढाईतून पुन्हा परतून यावयाचें नाहीं' असा संकल्प करून गडाखालीं उतरले; ते लढून लढून शेवटीं सर्व मेले. क्षत्रियांमध्यें, अशा मारूं किंवा मरूं ह्या निर्वाणीच्या संकल्पास 'जोहार' ह्मणतात. या गडावर त्याचे माहाल, वाडे, राण्यांचे माहाल, तोरणें, दरवाजे हीं फारच चमत्कारिक आहेत. व खालीं शहर, मांडवी, व चंपेश्वर महादेव वगैरे स्थलें असून त्यांचे भोंवतीं पुष्कळ तलाव व विहिरी आहेत; आणि त्याजवरूनच ती मोठी राजधानी होती असें दिसतें. यांचें माहात्म्य 'पावकाचलमाहात्म्य' ह्मणून आहे त्यांत वर्णिलें आहे. या पावागडास पावकाचल ह्मणतात व त्याजवर कालिकेचें एक देऊळ असून तामसमार्गी लोकांच्या अनुष्ठानाची ही जागा आहे.

२७६. अहमदचतुष्टय.

अहमदशाह बादशाहाचे वेळेस अहमदाबादेस चार अहमद होते ते—१ अहमद बादशाह, २ शेख अहमद, ३ मलीक अहमद आणि ४ काजी अहमद.

२७७. अहमदाबादचे सुभे.

अहमदाबाद पेशव्यांनीं सुरुसन् सलास् खमसैन् मय्या तैन् व अलफ ह्मणजे इ० स० १७५३ सालीं घेतली व तेथें दामोदर महादेव हे सुभेदार नेमिले. पुढें श्रीपत बापूजी, भवानी शिवराम व आपाजी

गणेश हे सुभेदार झाले. नंतर गुजराथ सुभ्याचे कामदार हरी चिंतामण दीक्षित, फत्तेपूरचे कुलकर्णी, आबा शेलूकर, राघोबा काका परभु (इ० स० १८०२ पासून पुढें दहा वर्षें), विठ्ठलराव बाबाजी, रामचंद्रपंत गोद्रेवाले, रामचंद्रपंत मुल्हेरकर, नारायणराव ताकटे निसबत त्रिंबकजी डेंगळे, नंतर नगरकर यांचे वेळेस—नागोपंत आबा देवचके, कुशाबा मामा परभु आणि पुढें खेड्याहून आलेले बाबशा दामोदर असे सुभेदार येऊन नंतर इंडलाप साहेब व ऐरन साईड साहेब हे दाखल झाले. व तेव्हांपासून इंग्रजी अम्मल सुरू झाला.

२७८. मोहना राणी.

मोहना राणी ही अहमदाबादेपासून ४० कोसांवर गुजराथेंत आमदानगर ह्मणून संस्थान आहे तेथील राणी असून तिचें लावण्य फार असल्यामुळें तिला वश करण्याकरितां चेलबटाव या नांवाचा एक दिल्लीचा मनुष्य येऊन त्यानें प्रयत्न केला. ही गोष्ट गोंधळी लोक गात असतात. त्या राणीचे महाल अद्याप आमदानगरांत आहेत.

२७९. चंद्रावळ ब्राह्मणकन्या.

चंद्रावळ ह्मणून एक ब्राह्मणाची मुलगी लग्न झालेली असतां तिला सय्यद मुसलमानांनीं नेलें. परंतु तिनें न घाबरतां आपल्या सासऱ्यास असा निरोप पाठविला कीं, 'तुम्ही कांहीं काळजी करूं नका.' पुढें तिला मुसलमानांनीं आपल्या घरीं नेल्यावर तिनें विहिरींत जीव दिला! हिचें गाणें हिंदुस्थानांत प्रसिद्ध आहे.

२८०. अंबाशंकर यांचा प्रामाणिकपणा.

अंबाशंकर क्षत्रिय हे भडोच येथें सदरअमीन होते. त्यांस हरिभक्ती यांचे दुकानची पंचाईत करण्यास बोलाविलें होतें व त्यांनीं त्यांचा न्याय केला. तें स्मरून हरिभक्ती हे त्यांस कांहीं द्रव्य देऊं लागले परंतु तें त्यांनीं घेतलें नाहीं. पुढें अंबाशंकर वारले. यांनीं केलेले पंचाइतीचे ठराव विलायत सरकाराकडेही मंजूर झाले! पुढें चार पांच वर्षांनीं अंबाशंकर यांचे चिरंजीव हरिलाल यांजकडे हरिभक्ती यांचा गुमास्ता सात हजार रुपये घेऊन आला, आणि ह्मणाला

कीं, 'आपले वडिलांनीं आमचें काम चांगल्या रीतीनें पार पाडलें तेव्हां त्यांस शेटजी कांहीं ऐवज देत होते, परंतु त्यांनीं त्या वेळेस तो घेतला नाहीं, म्हणून आतां आपणांकडे हा ऐवज घेऊन आलों आहें, तर तो घ्यावा.' तेव्हां हरिलाल यांनीं उत्तर दिलें कीं, 'आमचे वडिलांनीं कांहीं घेतलें नाहीं व ते आतां स्वर्गी आहेत. ते म्हणतील कीं, आह्मीं ऐवज घेतला नाहीं परंतु आमचे चिरंजीव यांनीं आमचा निश्चय तोडून ऐवज घेतला, असें म्हणून ते आमची निंदा करतील! यास्तव असें होणें रास्त नाहीं. तुह्मीं ऐवज परत न्यावा!'

२८१. अंबाशंकर.

अंबाशंकर हे ब्रह्मक्षत्रिय अहमदाबादेंत प्रिन्सिपाल सदर अमीन असतांना त्यांचे कोडतांत जेठाभाई नांवाचे मोठे सावकार, जो चाळीस लाख रुपयांची असामी होती असें म्हणत, त्यांच्या मुलानें त्यांजवर आपल्या हकाविषयीं फिर्याद केली. त्या कामीं अंबाशंकर यांस जेठाभाईनीं सांगितलें कीं, 'मी तुह्मांस एक लाख रुपये देतों, व तुह्मी मुलाचा दावा रद्द करावा.' तेव्हां अंबाशंकर म्हणाले कीं, 'आह्मी कोणापासून पैसा घेत नाहीं हें तुह्मांस ठाऊक असेलच.' त्यावर जेठाभाई म्हणाले कीं, 'तें खरें, पण लाख रुपये देणारा तरी तुह्मांस कधीं मिळाला नसेल!' तेव्हां अंबाशंकर यांणींही उत्तर दिलें कीं, 'लाख रुपये देणारा आह्मीं पाहिला नाहीं हें खरें आहे, परंतु लाख रुपयांस नाहीं म्हणणारा असाही मनुष्य तुह्मीं कधीं पाहिला नसेल, हें ध्यानांत ठेवावें!'

२८२. सुरजराम भाईचा धर्म.

नडियादेस सुरजराम भाई यांनीं धर्मशाळा व सदावर्ते ठेविलीं आहेत व स्वज्ञातीस भांडीं वगैरे मिळावीं अशी तजवीज करून ठेविली आहे. त्याचा तपास करितां असें समजलें कीं, हे सुरजराम बडोद्याचे रेसिडेंट औटरम यांजजवळ होते तेव्हां त्यांनीं लाखों रुपये मिळविले. पुढें त्यांस पेन्शन झालें. तेव्हां त्यांस वैराग्य प्राप्त झालें आणि पेन्शनावर चरितार्थ चालविण्याचा निश्चय करून आपली सर्व जिनगी धर्मादाय केली. त्यांस पुत्रसंतान नव्हतें, सबब त्यांनीं असा

विचार केला कीं, आपले मागें धर्म हाच आपला पुत्र आहे. आणि पुढें त्यांनीं घरदार वगैरे सर्व धर्म करून पैसा होता त्याची एक मोठी धर्मशाळा व सदावर्ते करून ठेविलें आहे. अशी ज्या कोणास सद्बुद्धि होते त्यांचा नांवलौकिक पुत्रापेक्षांही चिरकाल चालतो!

२८३. अहमदाबाद सर केली.

पुण्याहून बाजीराव पळून गेल्यानंतर अहमदाबाद घेण्याकरितां संवत् १८७४ सालीं खेड्याहून दंडलाप, हेरन, आणि डागली असे तीन साहेब आले; त्यांजबरोबर सामल खेमचंद टंकसाळी म्हणून एक मनुष्य असून त्याशिवाय आणखी दोन तीन गृहस्थ होते. त्यांत नालचंद म्हणून होता त्यास तिजोरीचें काम दिलें. पुंजासा यास शिरस्तेदारी दिली व मोती गोविंद यास दप्तरदारी दिली. खेड्यास प्रथम रॉबर्ट्सन् साहेब कलेक्टर झाले. व दाजी व्यास यांजकडे सायर (जकातीचा कारभार) दिली. प्रथम खेड्यास क्यांप होता, तो मोडून दिसा, पारसूल व कानपूर येथें छावण्या झाल्या. अस्तु. अहमदाबादेस पुढें लिहिल्याप्रमाणें अनुक्रमें कलेक्टर झाले:—प्रथम कलेक्टर दंडलाप, नंतर जाकसन्, नंतर काफर्ड, त्यावर अर्बथनॉट, व पुढें फॉसेट (१८४८ मध्यें), ब्यारी बारोडेल, वैट, हाडो साहेब (१८२४), एल्फिन्स्टन्, शेफर्ड, थोरले बारोडेल व शेवटीं त्यांचे पुत्र धाकटे बारोडेल.

२८४. त्रावणकोर.

श्रीअनंतपुरम् या गांवचें नांव इंग्रजांनीं 'त्रावेन्द्रम्' असें पाडलें. तेथील राजाचा किताब खालीं लिहिल्याप्रमाणें दोन हात लांब आहे.

'हिज् हायनेस् श्री पद्मनाभ दोसाबानजी बलरामवर्मा कुलशेखर कीर्तिपति मुनी सलतान महाराज राजाराम राजाबाहादूर सर समशेर जंग म्यांट ऑस स्टार आफ इंडिया महाराज त्रावणकोर.'

या किताबावरून या देशांत कसकशा कारकीर्दी झाल्या त्या सर्व लक्षांत येतात. म्हणजे प्रथम संस्कृत, नंतर प्राकृत, नंतर मुसलमानी आणि नंतर इंग्रजी. या चारींचीं स्वरूपें या अलंकारांत (पदवींत) आहेत.

२८५. इब्रामखान गारदी.

इब्रामखान गारदी या नांवाच्या सरदारास पाणिपतच्या लढाईत कैदेंत पकडून अहमदशाह अबदाली याजकडे नेल्यावर त्यास विचारिलें कीं, 'तूं मुसलमान असून मुसलमानांविरुद्ध काफरांस कां सामील झालास?' तेव्हां त्यानें सांगितलें कीं, 'काफर व मुसलमान हा भेद मी समजत नाहीं; परंतु ज्यानें माझें पालन केलें त्याचा मी निम्मकहराम होणार नाहीं. याजकरितां जर मी तुमचे हातून सुटलों, तर दक्षिणेंत जाऊन पुन्हा फौज घेऊन यावें व लढाईचा सूड उगवावा असा माझा इरादा आहे.' असें ऐकतांच अहमदशाहानें त्यास ठार मारण्याचा हुकुम केला. या इब्रामखानाचे वंशज आडेकर नवाब या नांवानें प्रसिद्ध आहेत.

रजपुतांच्या गोष्टी.

२८६. क्षत्रियराज्यें.

हिंदुस्थानचे वायव्य प्रांतावर मुसलमानांनीं हल्ले करून पंजाब, दिल्ली वगैरे घेऊन मोठीं मोठीं क्षत्रियांचीं राज्यें होतीं तीं नाबूद केलीं. पूर्वी दृष्टसूमीवर क्षत्रियांचें राज्य होतें. त्याचप्रमाणें काबूल, इराण व बुखारापर्यंत क्षत्रिय होते. ब्रह्मदेशांतही तेच होते. दक्षिणेकडे लंकेतही चव्हाण राजांचें राज्य होतें. तेथलीच पद्मिनी नांवाची प्रख्यात स्त्री चितोडगढचे राजानें आणिली होती व तिजकरितां जें मोठें युद्ध झालें, तें प्रसिद्धच आहे. मुसलमानाप्रमाणें कोंकण प्रांतीं फिरंगी लोकांनीं जहाजें व फौजा पाठवून मोठ्या लढाया दिल्या व तिकडील राजे हतवीर्य करून सर्व कोंकण हस्तगत केलें. कितीएक वेळ चौल लुटलें व दाभोळची लूट तर प्रसिद्धच आहे. ठाणें, वसई वगैरे घेऊन दर्याकांठीं जे मोठाले किल्ले बांधिले त्यांस चारशें वर्षें झालीं. जमिनीवरून मुसलमानांचा हल्ला व दर्यांतून युरोपियन लोकांचा हल्ला हे एकच समयीं झाले.

२८७. रजपूत लोकांचीं गोत्रें व आडनांवें.

रजपूत व क्षत्रिय लोकांमध्यें शाखा म्हणजे गोत्र किंवा आडनांव

बहुत आहेत. जसें–जेटवा, चूडासमा, साळुंखी, चावडा, झाला, प्रमार, गोहेल, जाडीज, राठोड, कच्छवाह आणि सिसोदे वगैरे बहुत शाखा आहेत. हिंदुस्थानांत ही जात मोठी आहे. पंजाब, हिंदुस्थान, सिंध, अजमीर आणि काठेवाड या प्रांतीं यांची वस्ती फार आहे. ती वस्ती फार वाढल्यामुळें त्यांचीं नांवें प्रांतांस पडलीं आहेत. जसें–झालावाड, गोहेलवाड वगैरे. जोधपूरचे राजे राठोडशाखेचे आहेत. जयपूरचे कच्छवाहशाखेचे आहेत. उदेपूरचे सिसोदे म्हणवितात. भावनगरचे गोहेल म्हणवितात. कच्छचे राव जाडीज म्हणवितात. क्षत्रियांपेक्षां रजपूत कमी आहेत. त्यांचें कारण त्यांचा आचारांत फरक आहे. दक्षिणेंत जसे मराठे व कुळंबी आहेत तसाच तो फरक आहे.

२८८. सवाई जयसिंग.

सवाई जयसिंग यानें ब्राह्मणांच्या सहा ज्ञाती एकत्र केल्या व क्षत्रियांचे घरीं त्यांस जेवावयास लाविलें. या ज्ञातींचीं नांवें:–दायमा ब्राह्मण, पारीख ब्राह्मण, गौड ब्राह्मण, सनाढ ब्राह्मण, गुजर गौडब्राह्मण, व सारस्वत ब्राह्मण. या सर्वांस आतां छजात ब्राह्मण म्हणतात. हे पुष्कर व जयपूर येथें आहेत.

२८९. उदेपूरची राजकन्या किशनकुंवर (कृष्णाकुमारी).

उदेपूरचा राणा भीमसिंग यास कृष्णाकुमारी म्हणून १६ वर्षांची मुलगी होती. तिचें लावण्य, स्वरूप व स्वभाव इतका चांगला होता कीं, पूर्वी जशा सीता, द्रौपदी, रुक्मिणी प्रसिद्ध होत्या त्याप्रमाणें हिची प्रसिद्धि झाली. तिला जोधपूरचे राजास देण्याचें ठरलें होतें. परंतु पुढें तो मेला. त्याचे जागेवर सन १८०४ सालीं मानसिंग बसला. त्यानें उदेपूरचे राजाकडे वकील पाठविले कीं, 'मुलगी आम्हास द्यावी.' इतक्यांत जयपूरचे जगतसिंग यांनींही ती मुलगी मागितली आणि उभयतांनीं आपसांत लढाई सुरू केली. अमीरखान गफूरखान म्हणून एक पेंढारी यांचा सरदार होळकरानें पाळगला होता, (त्यास हल्लीं टोंकचे नवाब म्हणतात,) तो व त्याचे शिपाई अत्यंत दुष्ट व लुटारू असत.

तो एकदां जोधपूरचे राजास मिळे व पुनः जयपूरचे राजास मिळे. असें करून सर्व मुलूख त्यानें खराब केला. असें कोणतेंही पाप या पृथ्वीवर नाहीं कीं, जें त्यानें केलें नाहीं! इतका तो पातकी असे. शेवटीं उदेपूरच्या राजाची सुटका होईना ह्मणून अमीरखानानें त्यास सांगितलें कीं, 'मानसिंगास मुलगी द्या, किंवा तिला मारून टाका, नाहीं तर तुमची दुर्दशा होईल.' शेवटीं दरबारांत अजितसिंग कारभारी याचे विद्यमानें असें ठरलें कीं, मुलीस मारून टाकावी ह्मणजे सर्व अनिष्ट जाईल. ही मसलत घरांत प्रसिद्ध होतांच राणीनें फार आकांत केला. तेव्हां असें ठरलें कीं, तरवारीनें न मारतां विष द्यावें! तें विष तिला घरांतील दासी हिनें तयार करून दिलें. एक वेळ तें पचलें नाहीं ह्मणून दुसऱ्यानें आणि तिसऱ्यानें कुसंबा ह्मणून अफूचा अर्क पाजला. नंतर ती स्वस्थ निजली ती उठली नाहीं! तिनें तें पितेवेळेस सांगितलें कीं, 'यांत माझे बापाचा कांहीं अपराध नाहीं. माझें प्रारब्ध होतें तसें झालें! मरण हें नेमलेंच आहे. आज काय, व उद्यां काय. याजकरितां मी कांहीं भीत नाहीं. राजाचें कल्याण होत असलें तर माझें मरण माझे लग्नासमान आहे!' पुढें जयपूरचा राजा संग्रामसिंग हा अजितसिंगास भेटला. तेव्हां तो त्याची निंदा करून म्हणाला, 'दुष्टा, तूं अमीरखान याचे सांगण्यावरून हें कर्म केलेंस! तुझ्यासारखा दुष्ट कोणीही नाहीं! पृथ्वींतील तीर्थें देखील तुझें पाप काढूं शकणार नाहींत. तुझा सत्यनाश होईल! सिसोद्याच्या वंशास तूं काळोखी लावलीस! बाप्पा रावळ याचें नांव बुडविलेंस! अशी गोष्ट कबूल करण्यापेक्षां तूं हातांत तरवार घेऊन कां लढला नाहींस? व मेला असतास तरी तुझें यांत नांव राहतें. तुझे वडील असे मेले आहेत कीं नाहींत?' या निंदेप्रमाणेंच या कारभाऱ्याची लौकरच स्थिति झाली. त्याचीं बायकापोरें मेलीं. व अखेरीस त्याला माळ घेऊन यात्रा करीत फिरण्याचा प्रसंग आला. वाईट कामाचा असाच परिणाम असतो.

२९०. ताजकुंवर इचें शौर्य.

ताजकुंवर ह्मणून ठाकूर जातीच्या क्षत्रियाची मुलगी कानपुराजवळ किसोरा गांवांत राहात असतां, तिला नेण्याकरितां पठाणांनीं हल्ला केला. तेव्हां तिचे बाजूस कोट व बुरूज होते त्यांजवर तिनें जाऊन तीरकमठ्यानें ८० पठाण मारले! परंतु शेवटीं तिचा कांहीं उपाय चालत नाहीं असें तिच्या भावानें पाहून तिचें शीर उडवून दिलें! या तिच्या शूरत्वाचें वर्णन हिंदुस्थानांत घरोघर करीत असतात.

२९१. धर्मयुद्ध.

क्षत्रियजातीचे लोकांचा असा नियम असतो कीं, मैदानांत मात्र ते शत्रूंशीं लढतात, परंतु एकीकडे कोणत्याही प्रकारचा दगा करीत नाहींत. ते विश्वासघाताचें महापातक समजतात. अद्यापही निजलेला वाघ असला तरी त्याजवर क्षत्रिय गोळी टाकीत नाहींत. गोळी टाकणें झालें तर त्यास जागृत करून मग टाकतात!

२९२. बुंदेलखंड व तेथील राजे.

ज्या प्रांतास हल्लीं बुंदेलखंड ह्मणतात त्यांत पूर्वी क्षत्रिय राजे होते त्यांचीं नांवें:—भीमनाग, स्कंदनाग, बृहस्पतिनाग, गणपतिनाग, व्याघ्रनाग, वसुनाग, देवनाग वगैरे. यांनीं इ० स० २०० वर्षेपर्यंत राज्य केलें. पुढें भोजराजाकडे हा प्रांत झाला. नंतर उदयादित्य, सूर्यसेन, कीर्तिवर्मा, जयवर्मा, मदनवर्मा, असे राजे झाले. त्यांनीं तारागड व ग्वाल्हेरचे किल्ले बांधिले. या प्रांतीं गौंड, चांडेल, बुंदेले व रजपूत हे लोक राहात असून त्यांत झांशी, चंदेरी, काल्पी हीं शहरें आहेत. या प्रांतावर शाहबुद्दीन मुसलमान यानें इसवी सन १२०० त स्वारी करून प्रथम इंद्रप्रस्थ घेतलें आणि नंतर कनोज, काल्पी, काशी, ग्वाल्हेर हीं घेतलीं. ह्याप्रमाणें सर्व बुंदेलखंड मुसलमानांचे ताब्यांत आलें. तें त्यांजकडे ५०० वर्षें राहिलें. पुढें इ० स० १७३४ सालीं, महंमदखान बंगष यानें छत्रसाल राजावर हल्ला केला ह्मणून त्यानें बाजीराव पेशवे यांचा आश्रय मागितला. तेव्हां बाजीरावानें त्यांस साह्य करून महंमदखानाचा पराभव केला. त्या वेळीं छत्रसाल राजानें कृतज्ञतापूर्वक जो एक तृतीयांश मुलूख मराठ्यांस दिला त्यांत झांशी,

जालवण, ललितपूर, सागर, कालपी, सिरोज वगैरे ३१ लाखांचा प्रांत पेशव्यांस मिळाला. हा प्रांत मिळाल्यावर मराठ्यांस हिंदुस्थान घेण्यास सुलभ पडलें. माळव्याचा सुभेदार राजा गिरधर हा धारेजवळ लढाईत मेला. म्हणून पुढें त्या जागीं राजे जयसिंग जयपूरवाले यांस सुभेदार नेमिलें. तेव्हां त्यांनीं सर्व माळवा मराठ्यांचे स्वाधीन केला तेव्हांपासून होळकर वगैरे बुंदेलखंडांत राहून, पुढें जेव्हां हिंदुस्थानांत स्वाऱ्या करूं लागले, त्या वेळीं चमेल (चंबळ) नदी ही पेशव्यांच्या राज्याची मर्यादा झाली होती; व मल्हारराव होळकर, पिलाजी जाधव हे वीर दिल्लीपर्यंत चौथाई व सरदेशमुखी घेत गेले होते. पुढें बादशाहानें दिल्लीहून निजामउल्मुल्ख यास माळव्याचे बंदोबस्तास पाठविलें. परंतु मराठ्यांनीं भोपाळजवळ त्याचा पराभव केला. त्या वेळेस त्या उभयतांमध्यें तहनामा होऊन त्यांत चंबळ नदी पर्यंत मराठ्यांची हद्द आहे असें लिहून घेतलें. पुढें बाजीराव मेले तेव्हां बाळाजी पंडित यांचे तर्फे नारो शंकर राजेबहादर हे इ० स० १७४२ सालीं बुंदेलखंडांत आले आणि उर्चीच्या राजापासून आणखी मुलूख घेऊन झांशीचा किल्ला दुरुस्त केला व शहर वसविलें. तसाच यांनीं पन्हा येथील हिऱ्याच्या खाणींत निम्मे हिसा घेतला. पुढें नारो शंकर परत आले आणि महादाजी गोविंद हे तेथें गेले. त्यानंतर बाबूराव यांस नेमिले होतें. तेही परत येऊन पुनः नारो शंकर १७६१ सालीं गेले. याच सालीं जालवणचे सुभेदार गोविंदपंत बुंदेले हे पानपतांत मारले गेले. आणि समशेरबहादूर यास बुंदेलखंडांत पुण्याहून पाठविलें. पुढें त्यांचे मागून विश्वासराव लक्ष्मण व नंतर १७७० सालीं रघुनाथराव हरी त्यांनीं २४ वर्षे पर्यंत स्वतंत्रपणें कारभार केला. याचे दरम्यान रघुनाथराव यांचें प्रकरण झालें तें सालप्याचा तहनामा होऊन संपलें. नंतर १७९० पासून १८०२ पर्यंत समशेर बहादुराचा मुलगा अलीबहादर हा बुंदेलखंडांत होता. त्याचे वेळेस राजा हिम्मत बहादर म्हणून एक गोसावी असून त्याजवळ लखनौच्या वजिराचे तर्फे फौज होती. त्यानें अलीबहादर यास आपलेकडे मिळवून चाळीस हजार फौजेनिशीं ते उभयतां बुंदेलखंडांत शिरले. तेव्हां